१८५६


म. ग्रं. सं. ठाणे

विषय — चरित्र

सं. क्र. १८०२

REFBK-0008922

म. ग्रं. सं. ठाणे
विषय—चरित्र
ग्रं. नं. ७२८०८



## अमेरिकेचा बहुगुणी शास्त्रज्ञ

# बेन फ्रँकलिन

विश्वसाहित्य :८:

# अमेरिकेचा बहुगुणी शास्त्रज्ञ

# बेन फ्रँकलिन

[ BEN FRANKLIN OF OLD PHILADELPHIA या पुस्तकाचा अनुवाद ]

REFBK-0008922

[illegible] प्रसिद्ध

अनुवादक :

भा. रा. भागवत

अनु. क्र. विभाग क्र. नों. दि.


: एकमेव विक्रेते :

चित्रशाळा प्रेस [प्रकाशन विभाग], पुणें २

मूल्य दीड रुपया

प्रकाशक :
ग. पां. परचुरे
ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर
गोरेगांवकर चाळ क्र. २
गिरगांव, मुंबआी ४

आवृत्ति पहिली
दि. १५–१–१९[illegible]



Marathi Translation of the Book
Ben Franklin of Old Philadelphia
By Margaret Cousins
Copyright 1952 by Margret Cousins
Published by Permission of the
Copyright-owner.

मुखपृष्ठ व रेखाचित्रें
गोपाळकृष्ण भोबे

मुद्रक :
वि. पु. भागवत
मौज प्रिन्टिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय



# जलबालक

१७०६ सालच्या जानेवारी महिन्यांतला एक रविवार. कडाक्याची थंडी पडली होती. बॉस्टन शहरांत साबू नि मेणबत्त्या बनवणाऱ्या एका माणसाची बायको प्रसूत झाली आणि तिला एक घाऱ्या डोळ्याचें पुत्ररत्न झालें. आपला हा लहानगा बाळ मोठा झाल्यावर, दुसऱ्या कोणाही अमेरिकन माणसानें केली नसेल अशी बहुविध कामगिरी आपल्या आयुष्यांत करील हें त्या वेळीं जर त्याच्या आईबापांना कळतें तर तीं दोघें खरोखर चकित झालीं असतीं.

हा मुलगा जन्मला त्याच दिवशीं त्यानें एक यात्रा केली. वडिलांच्या बाहुपाशांत बसून ही स्वारी हिमाच्छादित मिल्क स्ट्रीटवरून ओल्ड साऊथ चर्चकडे गेली. तिथें बाप्तिस्म्याचें पवित्र पाणी अंगावर शिंपडून या बालकाचें 'बेंजामिन फ्रँकलिन' असें नामकरण करण्यांत आलें.

बेंजामिनचें घर भावाबहिणींनीं भरलेलें होतें. फ्रँकलिन कुटुंब जेवायला बसलें कीं पाहावें, मेजाभोवतीं बहुधा तेरा माणसें असायचीं. यांतल्या कुणाच्याही पायदळीं न सांपडतां सावधानपणें दूर कसें राहावें तें बाळ अगदीं लहानपणींच शिकला.

एवढ्या मोठ्या कुटुंबाचें सैंपाकपाणी, धुणींभांडीं नि शिवणटिपण यांत आई इतकी अडकलेली असे कीं बेनवर बारीक नजर ठेवणें तिला अशक्यच होतें. आणि बाबा तरी काय, साबण-मेणबत्त्या करण्यांत अष्टौप्रहर मग्न असत.

बॉस्टन शहराला रात्रीच्या पाहऱ्यासाठीं मेणबत्त्या लागत त्या मि. फ्रँकलिनच पुरवीत. त्या काळीं बॉस्टनच्या रस्त्यांत दिवे अर्थात् नव्हतेच. इतकेंच काय, पण रस्त्यांना नंबरसुद्धा नव्हते. बेनच्या घरासमोर एक पाटी होती आणि पाटीवर एक निळा चेंडू काढलेला होता. साबू किंवा मेणबत्त्या हव्या असतील तर या 'ब्ल्यू बॉल' ('निळया चेंडू'च्या) च्या दुकानांत जायचें एवढें लोकांना माहीत होतें. तिथें नेहमींच कामाची धामधूम चालू असे आणि घरांतल्या लहान लहान मुलांनासुद्धा या ना त्या कामाची माहिती असायचीच.

त्या काळांत बॉस्टनमधला प्रत्येक नागरिक कामांत मग्न असायचा. तुमच्या आमच्या हिशेबीं तें अगदीं लहान शहर होतें; आणि अगदीं नव्या नि असंस्कृत मुलखांत वसलेलें होतें. तिथल्या लहानमोठ्या प्रत्येक माणसाला आपला कामाचा वांटा उचलावाच लागे; एखाद्यानें काम केलें नाहीं तर त्याला खायलाच मिळायचें नाहीं अशी स्थिति होती. मॅसॅच्युसेट्सच्या त्या वसाहतीचें सरकार आळशी माणसांकडे नेहमींच वाकड्या डोळ्यानें पाही. एखाद्यानें काम करायचें नाहीं असें ठरवलें तर त्याच्या पाठीवर कोरडे हाणायलाही हें सरकार कमी करीत नसे.

बॉस्टन हें त्या काळीं मोठेंसें सुरेख किंवा सुखवस्तु ठिकाण होतें असें नाहीं. पण कोणाही मुलावर मोहिनी पाडण्याची जादू त्याच्यांत होती. बंदर आणि धक्का यांच्या अवतींभवतीं शहर वसलेलें होतें. बंदरांत इंग्लंडहून आलेलीं जहाजें उभीं असायचीं. वसाहतवाल्यांसाठीं त्यांनीं जगांतल्या बातम्या आणलेल्या असत, माल आणलेला असे. एखादें जहाज दिसलें रे दिसलें कीं लोकांच्या झुंडी धक्क्यावर जमत आणि मोठ्या उत्साहानें आरडाओरडा करीत.

बंदर मागें टाकलें कीं लहानसर टेकड्या लागत. टेकड्यांवरून चिंचोळे नागमोडी रस्ते वर चढले होते. रस्त्यांच्या दुतर्फा चौकोनी घरें दिसत. त्यांना रंग दिलेला नसे; आणि वारा, पाऊस व ऊन यांनीं तीं राखी बनलेलीं असत. या घरांच्या पलीकडे मोठमोठीं अरण्यें दूरवर पसरलेलीं होतीं. कुणीं सांगावें, किती दूरपर्यंत तें?

पण मुलांना काय? वर चढून जायला झाडें होतीं; गळ टाकून पकडायला मासे होते; शिडाचीं गलबतें होतीं आणि वल्हवायची हौस असेल तर साध्या होड्याही होत्या. कुरणें होतीं—कीं जिथें बॉस्टनचे गांवकरी आपल्या गायींना

चरायला नेत;—दलदली होत्या, डबकीं होतीं, नदी होती आणि समुद्र पण होता. मुलगे गड बांधीत, लाकडी कुंपणाचे तट तयार करीत आणि स्वतःला रेड इंडियन समजून खेळ खेळत. कधीं कधीं फळ्या ठोकून घरच्या घरीं होड्या तयार करीत आणि त्यांत बसून डबक्यांमधून चांचे लोक म्हणून हिंडत. कधीं रानाचा शोध घेत भटकत; कधीं निळ्या निळ्या पाण्यांत पोहत.

बेंजामिन तर पक्का जलबालक होता. दिवसाचा बहुतेक वेळ त्याचे पाय ओले असायचे. तो चालायला नि पोहायला एकदमच शिकला म्हणा ना. होडी पण अशी हाकारी कीं जसा कांहीं कप्तानच. सबंध उन्हाळाभर तो एखाद्या सीलमाशाच्या पिल्लासारखा पाण्यांत डुंबायचा आणि त्याच्या मागोमाग त्याचे सोबतीही डुंबायचे. त्या मुलांचीं नांवें आतां कोणाच्या लक्षांत नाहींत. पण आपण एवढें निश्चित समजायला हरकत नाहीं, कीं त्यांत जॉन, पीटर, डेव्हिड, क्विन्सी, ओबॅडिया आणि रॉजर असल्या नांवांचे कुणी ना कुणी असणारच!

या सगळ्या टोळक्याचा बेन पुढारी होता. कारण त्याच्या मित्रांना एवढें माहीत होतें कीं ही स्वारी जिथें असेल तिथें कांहीं ना कांहीं भानगड चालू असणारच. कांहीं ना कांहीं करण्याची कल्पना त्याच्या डोक्यांतून निघायची हें ठरलेलेंच.

एकदा असेच ते खाचरांत मासळी पकडायला गेले होते. ओल्या चिंब पायांनिशीं बेन उभा होता—एखादा मासा येऊन चावतो का म्हणून वाट पाहात. इतक्यांत त्याला कांहीं लोक दिसले. ते घर बांधण्याच्या बेतांत होते. आणि त्यासाठीं ढीगभर दगड जमवून त्यांनीं कामाला सुरवात केली होती. हें पाहून तिथल्या तिथें बेनच्या डोक्यांत एक कल्पना चमकली.

"ए!" त्यानें आपल्या मित्रांना हाक मारली. "आपण इथें एक धक्का बांधूं या का?"

"तो कशाला?" जॉननें शंका काढली. हें बाळ सगळ्यांत लहान होतें आणि नेहमीं बावळटासारखे प्रश्न विचारायचें.

"वेडबंबू कुठचा!—अरे, म्हणजे आपल्याला त्याच्यावर उभं राहतां येईल अन् मासे पकडतां येतील" बेन म्हणाला. शिवाय आपल्या होड्याही तिथें बांधून ठेवतां येतील."

"हें बघ, बेन—" ओबॅडिया म्हणाला, "हा धक्का आपण बांधणार कशाचा असं तुला वाटतं?" हा मुलगा क्वेकर पंथाचा; अर्थात् आस्तेकदम वृत्तीचा नि

मोठा व्यवहारी होता.

बेननें आपली गळाची काठी हलवून त्या दगडाच्या ढिगाचा निर्देश केला. ते कामगार लोक एव्हांना हात झटकून घरीं जेवायला गेले होते.

"कातळाचा" तो म्हणाला.

"म्हणजे ते दगड हलवायचे नि इथें आणायचे म्हणतोस?" पाहिलंत? निघालं कांहीं तरी काम.

"मग काय तर?" बेन म्हणाला आणि लगेच त्यानें गळाची काठी खालीं टाकली आणि त्या ढिगाऱ्याकडे तो धावला सुद्धा. दुसरे मुलगेही त्याच्या मागोमाग गेले. काय असेल तें असो, बेन करील तें आपणही करावें असें त्यांना वाटायचें.

तोंडांतून 'मॅसॅच्युसेट्स्' हा शब्द उच्चारायला जेवढा वेळ लागेल त्याच्या आंत या सगळ्या पोरांनीं ते मोठमोठे फत्तर ओढून न्यायला सुरवात केली. घाम गाळीत नि धापा टाकीत त्यांनीं ते दगड ओढीत तळ्याच्या कांठावर आणले. मग बेननें एक काठी घेऊन जमिनीवर आपला धक्क्याचा आराखडा काढून दाखवला आणि स्वतःच्या देखरेखीखालीं काम सुरू केलें. रात्र पडायच्या आंत त्यांनीं दगड एकमेकाला जुळवून एक झकास फलाट तयार केला आणि ते थकले-भागलेले पण सुखी जीव घरीं गेले.

खरें म्हणजे सकाळपर्यंत थांबण्याइतकासुद्धा त्यांना धीर निघत नव्हता. कधीं एकदा जातों नि आरामांत मासे पकडतों असें त्यांना झालें होतें.

पण या गोष्टी घडल्याच नाहींत. बांधणारे लोक पुन्हा कामावर आले. पाहतात तों आपले दगड पसार झालेले. प्रत्येक दगड हलवून तळ्याच्या कांठीं नेलेला. लगेच गांधीलमाशांचा थवा चवताळून उठतो तसे गलबला करीत ते बॉस्टनमध्यें शिरले आणि मुलांच्या वडिलांना त्यांनीं हें जोरांत सुनावलें. मग हें प्रकरण पेटलें.

सबंध बॉस्टन गांवांत मग पोरांची चांगलीच खरडपट्टी निघाली.

जोसिया फ्रँकलिन मोठा नेकजात माणूस. त्यानें आपल्या मुलाला विचारलें, "बेंजामिन, तूं ही गोष्ट कां केलीस?"

"आम्हांला मासे धरण्यासाठीं धक्का हवा होता" बेन म्हणाला. "आणि पा, तुम्ही बघा तर खरे किती छान धक्का बांधलाय् आम्हीं!"

"पण तो तुमचा नाहीं" मि. फ्रँकलिननीं कठोर आवाजांत सुनावलें.

"ओः!" बेन म्हणाला.

बेन आणि त्याचे मित्र यांनीं सर्व दगड उचलून पुन्हा पहिल्या जागीं ठेवले तेव्हां एक गोष्ट त्यांच्या लक्षांत आली. ती ही कीं परतीचा प्रवास करतांना दगड दुप्पट जड लागतात! आणखीही एक गोष्ट ते शिकले. ती ही कीं दुसऱ्याच्या वस्तूंना हात लावूं नये. त्यांच्यापैकीं प्रत्येक जण तापला होता नि चिडला होता; आणि जॉन तर दगड ओढतां ओढतां खालीं पडला नि त्याच्या पायाच्या नळीवरचें सालडें निघालें.

"मीं तुला म्हटलं नव्हतं?" ओवेडिया बेनला म्हणतो.

या खेपेस मात्र बेनला कांहीं उत्तर सुचलें नाहीं.

पण त्याच्यावरचा कुणाचाही राग फार काळ टिकत नसे. हो, रागवून चालेल कसें? एखादी गंमत जायची! यानंतर फार काळ गेला नाहीं तोंच त्यानें माशांच्या सारखे कल्ले कसे बनवावेत याची एक युक्ति शोधून काढली. पायांच्या घोट्यांना हे कृत्रिम कल्ले बांधून पोहायला गेलीं कीं हीं पोरें दुप्पट गतीनें सुर्रकन् पोहूं शकत; इतकेंच नाहीं, तर तीं पोहून पुढें गेलीं कीं त्यांच्या मागें फेसाची एक मजेदार रेघ दिसायची.

बेन पुढें काय करणार आहे हें कधींच कुणाला सांगतां येत नसे. त्याच्याजवळ अनेक आश्चर्यें सांठलेलीं असत. बेन आपला पतंग घेऊन तळ्यावर आला होता तेव्हांचाच प्रसंग घ्या. एक दिवस तो असाच पतंग उडवीत होता, पण वाऱ्यामुळें पतंग ओढ घेतो आहे असें त्यानें पाहिलें आणि त्याच्या मनांत आलें, "बाप रे! जवळजवळ मला ओढण्याइतकी ताकद आहे या पतंगांत!" आणि मग त्याला वाटलें, "मी पैज मारून सांगतों—मी जर पाण्यांत असतों तर नक्कीच त्यानें मला ओढलं असतं!"

पुढच्या खेपेस आपल्या मित्रांना घेऊन तो जेव्हां तळ्यावर पोहायला गेला तेव्हां त्यानें आपला पतंग बरोबर नेला.

"पाण्यांत पडून पतंग उडवतां येत नसतो!" ओवेडिया म्हणाला.

"तुला कसं हें माहीत?" बेननें विचारलें.

त्यानें पतंग हवेंत उडवला आणि मग कपडे काढले नि पाण्यांत बुडी मारली. पतंगाची दोरी हातांत धरून तो तरंगायला लागला होता आणि पतंग वाऱ्यानें ढकलला जाऊन त्यानें बेनला ओढीत तळ्यापार नेलें होतें. बुइल्यम् आणि क्वेन्सी कांठावर त्याचे कपडे धरून उभे होते. ते हा प्रकार पाहून थक्क झाले. यांनाही मग वाटायला लागलें कीं आपणही हा प्रकार पाहावा.

मग किती तरी दिवस बेन म्हणजे सर्वांचा 'हीरो' बनला होता.

बेंजामिननें आयुष्यभर पाण्यावर प्रेम केलें; आणि पोहण्याच्या कलेंतली एकही गोष्ट शिकायची त्यानें बाकी ठेवली नाहीं. त्यानंतर कित्येक वर्षांनीं तो जेव्हां लंडनमध्यें राहात होता, तेव्हां उत्तम पोहणारा म्हणून त्याची कीर्ति सगळीकडे पसरली आणि तिनें त्याला मित्र मिळवून दिले. एकदा त्यानें टेम्स नदींत आपल्या पोहण्याच्या कलेचे प्रयोग करून दाखवले; त्या वेळीं कांठावर जमलेल्या प्रेक्षकांनीं कडकडून टाळ्या पिटल्या. किती तरी इंग्रज तरुणांना त्यानें अगदीं आपल्यासारखें पोहायला शिकवलें. फिलॅडेल्फियांत त्यानें जेव्हां एक शाळा स्थापन केली तेव्हां तिथल्या अभ्यासक्रमांत 'पोहणें' हा एक विषय ठेवावा असा त्यानें आग्रह धरला. त्या काळांत अशी गोष्ट कधीं कुणीं ऐकलेली नव्हती.

खलाशी होणें ही बेंजामिन फ्रँकलिनची महत्त्वाकांक्षा होती. पण त्याला ज्या थोड्याशा गोष्टी करणें कधींच शक्य झालें नाहीं त्यांपैकींच ही एक गोष्ट ठरली.

## २



# शाळकरी मुलगा

आयुष्य म्हणजे नुसतें पोहणें नव्हतें, नुसता वसंत ऋतु नव्हता किंवा नुसतें मजेंत तरंगत जाणेंही नव्हतें. बॉस्टनचा हिंवाळा भारी दुष्ट, भारी कडाक्याचा. उशींतून पिसें बाहेर पडावींत तशी आकाशांतून हिमवृष्टि होई आणि अंग ओलें करणारे, गारठवणारे वारे समुद्रावरून वाहात येत. खिडक्यांच्या तावदानांवरून बर्फाचे थर सांचत आणि घराबाहेरच्या भिंतींवरून बर्फाचे लांबलांब लोलक लोंबत. हिंवाळा आला कीं कधीं नव्हेसें वैराण अन् एकलकोंडें वाटूं लागे.

बेनला त्याची एवढी फिकीर वाटत नसे, कारण हिंवाळ्यांत त्याला वाचायला वेळ मिळे. आपण वाचायला केव्हां शिकलों हें त्याला आठवत नव्हतें, पण वाचनाची त्याला एवढी आवड होती कीं तो काय वाटेल तें वाची, धार्मिक प्रवचनेंसुद्धा ! बेंजामिनच्या लहानपणीं कुणाजवळ फारशीं पुस्तकें नसत आणि बेनच्या वडिलांसारखे जे गरीब लोक होते त्यांच्याजवळ तर तीं अगदींच थोडीं असत. मि. फ्रँकलिन यांच्याजवळच्या पुस्तकांतून फारशीं चित्रेंही नव्हतीं. सगळीं

गंभीर विषयांवरचीं आणि लांब लांब दुर्बोध शब्दांनीं भरलेलीं. पण तरी बेन, काय वाटेल तें करून तीं वाची; एकदाच नाहीं, पुन्हा पुन्हा वाची.

तो शेकोटीजवळ ठाण मांडून बसायचा आणि विस्तवाच्या उजेडांत वाचायचा. कधीं कधीं दुकानांत ज्या वाकड्यातिकड्या मेणबत्त्या उरलेल्या असत त्यांच्या प्रकाशांत वाचायचा. अर्धकच्च्या बनावटीच्या, विक्रीला अयोग्य ठरलेल्या अशा या मेणबत्त्या असत; आणि त्या अगदीं मिणमिण जळत.

बेननें वाचलेल्या सगळ्या पुस्तकांत 'पिलग्रिम्स प्रोग्रेस' त्याला सर्वांत जास्त आवडे. कारण त्याला कथानक होतें.

बेन सात वर्षांचा असतांना त्यानें एक कविता लिहिली. ही गोष्ट इतकी अपूर्व होती कीं त्यामुळें त्याला शाळेंत घालण्याचे विचार त्याच्या वडिलांच्या मनांत घोळूं लागले. शाळा म्हणजे खर्चाची बाब होती, आणि मि. फ्रँकलिन-सारख्या लोकांना आपल्या सर्व मुलांना शिक्षण देणें परवडण्यासारखें नव्हतें. पण पुढल्याच वर्षी बेनची रवानगी बॉस्टन ग्रामर स्कूलमध्यें झाली.

त्या वेळीं तो मध्यम बांध्याचा होता. बुटका व सशक्त; डोकें लांबट आणि त्यावर कुरळ्या केसांचा एक झुबका. त्याचे डोळे मोठाले, चमकदार आणि घारे होते. एक वर्षाच्या आंतच त्यानें वर्गांत आघाडी मारली आणि आपल्या 'प्रगति तक्त्या'ची लाज वाटण्याचा प्रसंग त्याच्यावर कधींही आला नाहीं. तरी पण बॉस्टन ग्रामर स्कूलमध्यें त्याला जें लॅटिन शिकवलें जात होतें तें त्याला फारसें पसंत नव्हतें असें दिसतें.

"कशाला मीं लॅटिन घ्यायचं ?" त्यानें तक्रार केली. "कोणीसुद्धा आतां ती भाषा बोलत नाहीं."

"बेटा, तूं हें आतां मन लावून शिकला नाहींस तर पुढें पश्चात्ताप करण्याची वेळ येईल" त्याचे वडील म्हणाले.

बेनला पुढें खरोखर वाईट वाटलेंही असेल, पण त्यानें तशी निश्चित कबुली कधीं दिली नाहीं. तो मोठा झाला आणि मग स्पॅनिश, इटालियन आणि फ्रेंच भाषा बोलायला शिकला, तेव्हां त्यानें पुन्हा एकदा लॅटिनकडे दृष्टि वळवली आणि त्याला तें अगदीं सोपें वाटलें, त्याचें असें मत होतें कीं, आपण या भाषा आधीं शिकाव्यात कारण त्या जास्त सोप्या आहेत; आणि त्या शिकून झाल्या म्हणजे लॅटिन शिकणें सोपें जातें. आपल्या आयुष्यांत त्याला फ्रान्समध्यें राहावें लागलें होतें; तिथें त्याला नेहमीं फ्रेंचच बोलावें लागे. कांहीं लोक म्हणत कीं,

'या त्याचं भाषेचं व्याकरण फारसं चांगलं नाहीं.' त्याला लॅटिन येत असतें तर तो फ्रेंचच अधिक चांगलें बोलूं शकला असता असें त्यांना वाटे.

खरें म्हणजे, लहान असतांना त्याला लॅटिन शिकायला कधीं वेळच मिळाला नाहीं. कारण बॉस्टनची प्राथमिक शाळा त्यानें एक वर्षांतच सोडली आणि मि. ब्राउनेल यांच्या 'लेखन व अंकगणिता'च्या शाळेंत तो दाखल झाला.

तिथें तो चांगलें हस्ताक्षर काढायला शिकला, पण अंकगणितांत नापास झाला!

याच विषयांत बेंजामिन फ्रँकलिन एवढा कच्चा कां राहिला तें कोणीही सांगूं शकत नाहीं. मि. ब्राउनेल तर फार चांगल्यापैकीं शिक्षक म्हणून ओळखले जात. बेनचें मन दुसऱ्याच एखाद्या गोष्टींत गुंतलेलें असावें हेंच खरें—बहुतकरून 'पिलग्रिम्स प्रोग्रेस' मध्यें.

अंकगणित मात्र त्यानें नंतर शिकून घेतलें. त्यासाठीं त्यानें स्वतःच, कोणाचीही मदत न घेतां उरस्फोड केली. आणि पुढें तो आंकड्यांचा जादूगार झाला. आंकड्यांचे खेळसुद्धा त्यानें बसवले—केवळ गंमत म्हणून. ह्या वेळपर्यंत त्यानें शाळा सोडली होती आणि वडिलांच्या धंद्यांत त्यांना तो मदत करीत होता. साबणाच्या कढया ढवळणें आणि मेणबत्त्यांच्या सांच्यांत मेण ओतणें हीं कामें तो करायचा. मेणाचा तो ओशट वास त्याच्या नाकांत नेहमीं भरलेला असे आणि त्यामुळें त्याला अंकगणितापेक्षां मेणाची शिसारी जास्त वाटे.

बेनला मेणाचा इतका तिटकारा वाटायचा कीं त्याच्या वडिलांनीं मेणबत्ती-वाल्याचा धंदा शिकवण्याचीं दोन वर्षें खटपट केल्यावर अखेरीस तो नाद सोडला आणि मुलासाठीं दुसरें काम शोधायला सुरवात केली. बेनचा हात धरून ते सबंध बॉस्टनभर भटकत; गवंडी, सुतार, तांबट आपापलीं कामें करीत असलेले ते दोघे पाहात. मि. फ्रँकलिनना वाटे कीं अशा प्रकारें बेन आपल्याला कोणतें काम करायला हवें तें नक्की करील.

पण तसें कांहींच घडलें नाहीं. मात्र या निरीक्षणाच्या दौऱ्यांतून बेन गवंडी-काम, सुतारकाम आणि यंत्रकाम हें सर्व शिकला. हळुहळू, घरांत असलें कांहीं काम निघालें कीं बेन फारच उपयोगी पडूं लागला. पण त्याचबरोबर तो अधिकाधिक अस्वस्थही बनत चालला आणि त्यामुळें मि. फ्रँकलिन अधिकाधिक सचिंत बनले. काय तरी पाहा! बारा वर्षें झालीं बेनच्या वयाला, अन् अजून त्यानें चरितार्थासाठीं काय करावं तें ठरवलेलं नव्हतं!

"तुला काय करायला आवडेल?" मि. फ्रँकलिननीं विचारलें.

"समुद्रप्रवास!" त्यांच्या चिरंजीवांनीं तात्रडतोत्र उत्तर केलें. "मला खलाशी व्हायचंय्."

बॉस्टनमधल्या बहुतेक मुलांना दर्यावर्दी व्हायचें होतें; आणि निळ्या अथांग ॲटलांटिकची ओढ किती जबरदस्त आहे तें मि. फ्रँकलिननाही ठाऊक होतें. पण खलाशाचें जीवन धकाधकीचें, त्यांत केल्या श्रमाचें चीज होत नाहीं, असें त्यांना वाटे. बेंजामिनला 'हो' म्हणायला ते धजेनात. तो तसा घिम्या स्वभावाचा गृहस्थ होता आणि प्रेमळ पिता होता. पण त्याला एवढें कळून चुकलें कीं आपण तांबडतोब कांहीं तरी ठरवलें पाहिजे.

बेंजामिनला पुस्तकें आवडत. मग पुस्तकें कशीं तयार करावींत हेंच त्याला शिकवलें तर? मि. फ्रँकलिन यांचा मोठा मुलगा जेम्स इंग्लंडला जाऊन छपाईकाम शिकून आलेला होता; आणि त्यानें बॉस्टनमध्यें स्वतःचें दुकान थाटलें होतें. झालें! प्रश्नाचें उत्तर मिळालें. वडिलांनीं बेंजामिनला त्याच्या मोठ्या भावाकडे शिकाऊ उमेदवार म्हणून अडकवून टाकलें आणि आतां सर्व कांहीं उत्तम होईल अशा आशेवर ते स्वस्थ बसले.

बेन तेव्हां बारा वर्षांचा झाला होता. त्याची शाळा आतां सुटली आणि खऱ्या शिक्षणाला सुरवात झाली.

२०० नों. दि. ७३/५१
नालय



# शिकाऊ कामगार

बेननें एका कागदावर सही केली होती. आपण एकवीस वर्षांचे होईपर्यंत आपला भाऊ जेम्स याच्याकडे मदतनीस म्हणून काम करूं असें त्यांत त्यानें वचन दिलें होतें. कराराची आपली बाजू म्हणून जेम्सनें बेनला जेवणखाण, राहायला जागा आणि छपाईकामाचे धडे देण्याचा वायदा केला होता.

एकवीस वर्षांचा होईपर्यंत ! म्हणजे अजून लांबच लांब अशीं नऊ वर्षें जायचीं होतीं, आणि त्यांपैकीं फक्त शेवटच्या वर्षीं बेनला पगार मिळणार होता. पहिल्या आठ वर्षांत त्याला मुळींच पैसे मिळायचे नव्हते. पण या एकंदर व्यवस्थेंत कांहींच चांगलें नव्हतें असें नाहीं. छपाईच्या दुकानांत काम करीत असल्यानें, पुस्तकांच्या दुकानांत जे पुस्तकें विकणारे लोक असत त्यांना भेटण्याची संधि बेनला मिळाली होती. कधीं कधीं तर अशा एखाद्या प्रेमळ विक्रेत्याकडून बेन रात्रीं वाचण्याकरतां एखादें पुस्तक उसनें आणी अन् सकाळीं तें परत करी. तें स्वच्छ राहावें म्हणून तो काळजी घेई. अशा प्रकारें पुष्कळशीं काव्याचीं पुस्तकें वाचून काढल्यानंतर त्यानें स्वतः कविता लिहिण्याचें ठरवलें.

त्यानें एक 'दि लाइटहाऊस ट्रॅजेडी' (दीपगृहाची दुःखान्तिका) नांवाची कविता लिहिली. एका खऱ्या घडलेल्या प्रसंगावर ती आधारलेली होती. एक दर्यावर्दी कप्तान व त्याच्या दोन मुली हीं कशीं बुडून मरण पावलीं याची कथा होती ती. जेम्स फ्रँकलिननें ही कविता छापून एक लहानसें कागदी पुठ्याचें पुस्तक काढायचें ठरवलें. तें तयार झाल्यावर त्याच्या प्रती विकण्यासाठीं त्यानें बेंजामिनला गांवांत पिटाळलें. पुस्तक चांगलें खपलें, कारण आजच्यासारखीं वर्तमानपत्रें त्या काळच्या लोकांना माहीत नव्हतीं; आणि त्या बुडालेल्या कप्तानाची ती करुण कहाणी वाचायला त्यांना आवडली.

हें यश पाठीशीं असतांनाच बेननें एक खलाशाचें गाणें* लिहिलें. (कारण त्याचें मन सारखें समुद्राकडेच धावत असायचें!) या गाण्यांत टीच नांवाच्या चांच्याचा पाडाव कसा झाला तें वर्णिलेलें होतें.

बेनच्या वडिलांना या कवितेंत विशेष अर्थ वाटला नाहीं, आणि खरोखरीच ती फारशी चांगली नाहींही. आणि आपल्या मुलानें स्वतःचीं पुस्तकें विकीत दारोदार हिंडावें हेंही त्यांना आवडलें नाहीं. तेव्हां त्यांनीं बेनची टर उडवली. हें झालें नसतें तर, बेननें जे किती तरी प्रकारचे इतर गुण प्रकट केले त्याऐवजीं तो कवि झाला असता.

तो लेखक झालाही. पण नुसतें लेखक व्हायचें असें ठरवून तो लेखक झाला नाहीं. लेखन कसें करतात हें शिकण्यासाठीं त्यानें अतोनात मेहनत घेतली. एखाद्या पुस्तकांतलें एक प्रकरण तो वाची आणि मग पुस्तक ठेवून देई. कांहीं दिवसांनीं आपण काय वाचलें होतें याची तो आठवण करी आणि तें आपल्या शब्दांत पुन्हा लिहून काढी. मग आपण लिहिलेल्या मजकुराची तो वाचलेल्या पुस्तकाशीं तुलना करून पाही. पुस्तकांतल्या इतकें आपलें लिहिणें चांगलें नाहीं

---

* Will you hear of a bloody battle,
Lately fought upon the seas?
It will make your ears to rattle
And your adimiration cease.
Have you heand of Teach, the Rover,
And his knavery on the Main;
How of gold he was a lover,
How he loved all ill-got Gain?

असें त्याला आढळून येई आणि मग त्याला कळून चुके कीं आपल्याला पुरेसे शब्द माहीत नाहींत हेंच याचें कारण. एवढ्यासाठीं बेननें यमकबद्ध लिहायचें ठरवलें. यायोगें, ज्यांचें यमक तर जुळेलच पण यमक न जुळणाऱ्या शब्दांपेक्षां ज्यांचा वेगळा अर्थ नसेल असे शब्द शिकणें आतां त्याला भागच पडणार होतें. वाचीत असलेल्या पुस्तकांतले बरेचसे परिच्छेद तो घेई आणि त्यांचें कवितांत रूपांतर करी. पुढें, ज्या गद्यावरून त्यानें हें काव्य केलें त्याचा जवळजवळ विसर पडल्यानंतर, तो आपल्या या कविता घेऊन त्यांचें पुन्हा, स्मरणशक्तीच्या जोरावर मूळच्या गद्यांत रूपांतर करी. या पद्धतीनें तो नवीन शब्द शिकला.

बेन आपला भाऊ जेम्स याच्याकडे काम शिकण्यासाठीं राहिल्यावर, दिवसा त्याला पुष्कळच गुंतून राहावें लागलें. जेम्स तरुण होता आणि आपल्या धाकट्या भावावर त्यानें चांगलीच मालकशाही गाजवली. खरी गोष्ट अशी होती कीं बेनला जेम्स सारा दिवसभरच कांहीं ना कांहीं ने-आण करायला पिटाळीत असे; आणि एखाद्या साध्या 'ॲप्रेंटिस' शीं वागला नसता इतक्या वाईट रीतीनें तो त्याच्याशीं वागत असे.

बेनला आतां पूर्वीसारखा वाचायला वेळ मिळेनासा झाला. रात्रीं काम संपल्यानंतर, किंवा सकाळीं काम सुरू होण्यापूर्वी, किंवा रविवारीं जो काय वेळ मिळे तेवढाच. सर्व जण झोपीं गेल्यानंतर तो मेणबत्तीच्या उजेडांत आणि लवकर उठून पहाटेच्या झुंजूमुंजू प्रकाशांत वाची.

रविवारीं सर्वांच्याप्रमाणें बेननेंही चर्चमध्यें जावें अशी अपेक्षा होती. काम शिकायला राहण्यापूर्वी बेनला चर्चमध्यें जावेंच लागायचें; कारण दुसरा मार्ग नव्हता. त्याचे वडील त्याला जायलाच लावीत, जेम्सकडे कामाला राहिल्यावर बेनला असें आढळून आलें कीं आपल्याला आहे तोच वेळ मुळीं पुरत नाहीं. रविवार तर त्याचा वाचनाचा, नवीन शब्द शिकण्याचा नि कविता करण्याचा एकुलता एक दिवस. तेव्हां तो रविवारीं घरींच राहून हीं कामें करूं लागला. पण त्याची सदसद्विवेकबुद्धि त्याला टोचायची. त्यामुळेंच कदाचित् तो जास्त श्रम घेऊन शिकला असेल, कारण वास्तविक चर्चमध्यें जाणें तो आपलें कर्तव्य समजत होता.

अतिशय कष्ट घेऊन आणि आपणच आपला गुरु बनून बेन फ्रँकलिन लिहायला शिकला. असें असून, ज्या गोष्टी त्यानें उत्कृष्ट प्रकारें करून दाखवल्या त्यांपैकीं लेखन ही एक होती.

"माझ्या जीवनांत मला लेखनाचा फार मोठा उपयोग झाला; आणि माझ्या प्रगतीचें तें एक प्रमुख साधन बनलें." त्यानें पुढें कित्येक वर्षांनंतर लिहून ठेवलें.

कधीं कधीं भावाभावांना एकत्र काम करणें किंवा भांडणापासून अलिप्त राहणें अशक्य होऊन बसतें—विशेषतः दोघां भावांतला एक जर दुसऱ्यावर शिरजोरी करणारा असेल तर. बेन आणि त्याचा भाऊ जेम्स यांचें असेंच झालें. त्यांचें कांहीं केल्या सूत जमेना. यामुळें बेनला आपली उमेदवारी फारच जड गेली—बाळपणीं त्यानें जे बेफिकीरपणें दिवस घालवले होते त्यांपेक्षां हें वातावरण किती वेगळे होतें! जेम्सकडे जे दुसरे उमेदवार होते त्यांचीही फारशी मदत होण्यासारखी नव्हती; छाप पाडण्यासारखें त्यांच्यांत विशेष कांहींच नव्हतें. यामुळें बेन फार एकलकोंडा बनला. आपली आई, बहिणी, मित्र यांची आठवण होऊन त्याला चुकल्याचुकल्यासारखें वाटूं लागलें.

जेम्सनें लग्न केलेलें नव्हतें. त्याला स्वतःचें घर नसल्यामुळें तो आपल्या सर्व कामगारांना घेऊन एका ओळखीच्या कुटुंबांत राहात असे. असें 'बोर्डिंग हाऊस'-मध्यें राहणें बेनला मुळींच आवडत नसे; कारण त्यानें मांस खाणें बंद केलें असल्यामुळें तिथें सर्वजण त्याची टर उडवीत. (तो नेहमीं पुस्तकें वाचायचा आणि वाचलेल्या गोष्टी प्रत्यक्ष करून बघायचा. असेंच एकदा, शाकाहाराचें महत्त्व वर्णन करणारें एक पुस्तक त्यानें वाचलें आणि त्याचा प्रयोग करून पाहण्याचें ठरवलें.) त्या काळांत कुठच्याही जेवणांत मांस हेंच प्रमुख अन्न असल्यामुळें जो तो बेनची टिंगल करूं लागला. आणि आपल्या या कामगाराकडे ज्याचें त्याचें लक्ष लागलेलें पाहून जेम्सलाही अवघड वाटायला लागलें.

"दुसरीं सगळीं खातात तें तुला खायला काय होतं, मला समजत नाहीं!" जेम्स त्राग्यानें म्हणाला.

"मी शाकाहारी आहें" बेननें उत्तर दिलें.

"तुझा धनी तुला मांस पुरवूं शकतो हें भाग्य समज" जेम्स म्हणाला.

"पण मला नको आहे तें" बेननें सांगितलें.

"हा आणखी एक तुझा शिष्टपणा आहे!" जेम्स लालबुंद होऊन ओरडला.

"मी असं करतों—माझ्या मालकाशीं एक सौदा करायला मी तयार आहें" बेन व्यंग्य सुरांत म्हणाला, "बोर्डिंग हाऊसमध्यें माझ्यासाठीं दर आठवड्याला जेवढा खर्च करतोस त्याच्या निम्मे पैसे तूं मला देत जा. मी माझ्या पोटाची व्यवस्था स्वतः पाहीन, आणि तुलाही मग आपल्या हलक्या नोकराच्या पंगतीला

जेवावें लागणार नाहीं!"

"कबूल!" जेम्स म्हणाला. त्याला हा सौदा इतका चांगला वाटला कीं ही गोष्ट घडेल हें त्याला खरेंसुद्धा वाटेना.

तेव्हांपासून बेन स्वतःचा सैंपाकी बनला. त्यानें जें पुस्तक वाचलें होतें त्यांत दिलेले भाज्या शिजवण्याचे कांहीं प्रकार त्यानें वाचून पाहिले. मग छपाईच्या दुकानांतच तो भात नि बटाटे उकडून त्याचें झटपट पुडिंग बनवूं लागला— मक्याच्या पिठाची दाट खीर करतात तसें कांहींसें हें पक्वान्न लागे. गूळ मिसळून तें खात असत.

स्वतःचा सैंपाकी स्वतःच होण्याचें बेननें अगोदरपासून योजलें होतें थोडेंच? परिस्थितीनें तो झाला. तो कोणत्या श्रेणीचा सैंपाकी होता हें कोणालाही ठाऊक नाहीं; पण एवढें खरें कीं त्याच्या सैंपाकानें फार मोठी छाप पाडल्याची निदान इतिहासांत कुठें नोंद नाहीं. खरें म्हणजे तो स्वतःच सांगायचा कीं आपण अगदींच माफक जेवण घेतों—कधीं कधीं तर मूठभर मनुका, एखादें बिस्कीट किंवा पावाची एखादी फाक अन् प्यालाभर पाणी, यापेक्षां जास्त कांहीं नाहीं. इतर वेळीं, केक वगैरे बनवणाऱ्या आचाऱ्याकडे विकत घेतलेला टार्ट खाऊनच आपण पोट भरतों. म्हणजे तें झटपट पुडिंग करणें त्याला एकंदरींत त्रासदायकच जात असावें!

बेननें जेम्सशीं केलेल्या सौद्यांतला सर्वांत महत्त्वाचा फायदा हा होता कीं दुकानांतले बाकीचे कामगार जेवायला गेले असतांना त्याला वाचायला फावत होतें. या सौद्यामुळें बेनच्या खिशांत थोडेसे सेंटही खुळखुळूं लागले. जेम्स हे जे थोडे पैसे त्याला देत होता ते खर्चून टाकण्यापेक्षां त्यानें बहुधा उपासमारही पत्करली असती. मिनिटभर उसंत मिळाली कीं तो या उमेदवारींतून बाहेर पडण्याचे मार्ग शोधीत बसे. आणि असा मार्ग सांपडला कीं आपल्याला पैशाची जरूर लागेल हें त्याला माहीत होतें.

बेन सुमारें चौदा वर्षांचा झाल्यावर जेम्स फ्रँकलिनच्या मनानें घेतलें कीं वर्तमानपत्र काढावें. बॉस्टनमध्यें निघणारें हें तिसरें वर्तमानपत्र होतें आणि त्याला 'दि न्यू इंग्लंड कूरांट' असें नांव देण्यांत आलें. कांहीं लोकांच्या मतें जेम्सनें हा मूर्खपणा केला. कांहीं झालें तरी बॉस्टनमध्यें अगोदरच दोन वर्तमान-पत्रें होतीं. एक 'बॉस्टन न्यूज–लेटर' नि दुसरें 'बॉस्टन गॅझेट'. आणखी तिसऱ्याची काय गरज होती? पण जेम्सनें आपला नाद सोडला नाहीं आणि लवकरच 'दि न्यू इंग्लंड कूरांट' नें रस्त्यावर पदार्पण केलें.

वर्तमानपत्राच्या कल्पनेनें बेनच्या मनाची एकच गडबड उडाली होती. जेम्सचे मित्र संपादकीय कचेरींत जमत आणि आपल्या पत्रांत येणाऱ्या लेखांवर चर्चा करीत, कोणते नवीन लेख लिहायचे त्यांची आंखणी करीत; त्या वेळीं बाहेर घोटाळत राहण्याचा बेन प्रयत्न करी.

एक दिवस जेम्सनें त्याला म्हटलें, "मोठ्या माणसांच्या वाटेंत अडमडत राहण्यापेक्षां तूं कांहीं टायपाच्या ओळी जुळवल्यास तर बरं होईल. 'कूरान्ट'-मधल्या मजकुराशीं तुला कांहीं कर्तव्य नाहीं, तुझा संबंध छापण्याशीं आहे."

बेनची पुन्हा कंपोज़कामाच्या खोलीकडे ढकलंपट्टी झाली. तिथें तो नुसता टाईप जुळवायचा असें नाहीं, तर तो छापण्याच्या कामींही मदत करायचा. तेवढें झाल्यावर त्याला अंगांत कोट चढवून रस्त्यांतून ओरडत वर्तमानपत्र विकायला जावें लागे. 'पेपरविक्या'च्या कामांत तो गुंतलेला असतांना त्याचें मन दुसरीकडे गुंतलेलें असे. आपलेंही असें कांहीं तरी वर्तमानपत्रांत छापून येऊं शकेल का, कीं लोक जें वाचूं शकतील? 'कूरान्ट' मधल्या एखाद्या लेखाची किंवा निबंधाची जेम्सच्या मित्रांनीं स्तुति केलेली ऐकली कीं आपल्याही लेखन-प्रयत्नांची अशीच स्तुति कधीं ऐकायला मिळेल अशी त्याला तळमळ लागून राही,

आपण लिहिलेलें कांहींसुद्धा जेम्स कधींही छापणार नाहीं हें त्याला माहीत होतें. एक तर तो अजून पोर होता. आणि दुसरें असें कीं जेम्सच्या मतें त्याची हुशारी इतकी वाढली होती कीं खुद्द त्याच्यादेखील ती हिताची नव्हती. पण या गोष्टींनाही तोंड देण्याचा एक मार्ग बेनला सुचला. एकदा तो उशिरापर्यंत जागत बसला; मनांत आले ते विचार त्यानें लिहून काढले. मग त्यानें नेहमींपेक्षां वेगळ्याच हस्ताक्षरांत आपल्या लिखाणाची नक्कल केली. या हस्तलिखितावर त्यानें आपलें नांव घातलें नाहीं; आणि तशा अपरात्रीं अंधाऱ्या रस्त्यांतून धावत-पळत, तो दिवसाउजेडीं जिथें घाम गाळायचा त्या छपाईच्या दुकानाकडे गेला आणि दाराच्या खालच्या फटींतून त्यानें आपला लेख आंत सारून दिला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं जेम्सनें जेव्हां कुलूप उघडलें तेव्हां त्याला तें हस्त-लिखित मिळालें.

"हें काय आहे बुवा?" तो त्या नीटनेटक्या लेखावरून नजर फिरवीत अन् लेखकाचें नांव सांपडतें का म्हणून पाहात म्हणाला. "निनांवी दिसतंय्!"

"लेखकानें जर आपलं नांव घातलेलं नसेल तर मला नाहीं वाटत त्यांत कांहीं अर्थ असेलसं!" बेननें एकदम ठोकून दिलें.

"उलट दिसतंय्" जेम्स म्हणाला. बेनशीं कुठच्याही विषयावर त्याचें कधीं एकमत होत नसे. "मला तर चांगलं मनोरंजक वाटतंय्. मी म्हणतों, हें बाकीच्या मंडळींना दाखवावं."

जेम्सचे मित्र नेहमीं येत तसे आले तेव्हां त्यानें, 'कूरान्ट' लोकांचें लक्ष कसें वेधूं लागलें आहे याचा पुरावा म्हणून तें हस्तलिखित त्यांच्यापुढें टाकलें.

बेन दारांत चोरट्यासारखा उभा होता त्या वेळीं तो लेख मोठ्यानें वाचण्यांत आला. प्रत्येकानें लेख उत्तम असल्याचें मत दिलें आणि लेखक कोण असावा याबद्दल त्यांनीं तर्कवितर्क चालवले. बेनला ओरडून सांगावेंसें वाटलें कीं "मीं लिहिलाय् तो लेख!"

बेननें असे गुप्त, निनांवी स्फुट लेख पुष्कळ लिहिले आणि त्याच्या मित्रांनीं जेव्हां त्यांचीही अशीच स्तुति चालवली तेव्हां अखेरीस अहंकारानें त्यच्यावर विजय मिळवला आणि त्यानें आपणच लेखक असल्याची कबुली दिली. जेम्सला तें कितपत रुचलें असेल याची तुम्हीच कल्पना करा. त्याचे मित्र आतां बेनला आपल्या वर्तुळांत ओढूं लागले आणि त्यामुळें जेम्स आणखीच चिडला. शिवाय आपल्या धाकट्या भावानें आपल्याला बनवलें ही गोष्ट त्याला मुळींच आवडली नाहीं. त्याला वाटलें, बेंजामिनचा जो उदोउदो चालला आहे त्यामुळें तो आणखीच चढून जाईल. आणि मग ते दोघे आणखीच हिरिरीनें भांडायला लागले.

त्यांचीं भांडणें बहुधा निर्णयासाठीं वडिलांपुढें जायचीं. वडील जरी पुष्कळदा आपल्या धाकट्या मुलाची बाजू घेत, तरी बेनच्या मनावर ते एक गोष्ट बिंब-वण्याचा प्रयत्न करीत. ती ही कीं, "जेम्सचा दर्जा कांहीं झालं तरी मालकाचा आहे. तूं त्याच्याकडे नोकरीला आहेस, तेव्हां तूं लीनताच दाखवायला हवी."

जेम्सनें ही सर्व परिस्थिति मनाला लावून घेतली. तो मोठा तापट डोक्याचा, शीघ्रकोपी माणूस होता आणि बेंजामिननें जर त्याला नावडणारी एखादी गोष्ट केली तर तो त्याच्या अंगावर धावून त्याला मारूं लागला. बेनला राग यायचा; त्याला हें मुळींच आवडायचें नाहीं. कारण मुख्यत्वेंकरून त्याला आपल्या अप-राधाच्या मानानें ही शिक्षा कांहींच्या बाहींच आहे असें वाटे. या मारहाणीचा त्याला तिटकारा येई आणि जेम्सला असें करण्याचा मुळींच अधिकार नाहीं असें मनापासून वाटत असल्यामुळें त्याला त्याचा राग येई.

बेन स्वतंत्र बाण्याचा होता आणि एका माणसानें दुसऱ्यावर संपूर्ण सत्ता गाजवावी हें त्याला मुळींच पटत नसे. सबंध आयुष्यभर त्याची हीच भावना

कायम होती; आणि आपल्या स्वतःच्या भावाची तावेदारी करतांना आपण जीं दुःखें भोगलीं त्यांतूनच हुकूमशहांबद्दल आपल्याला वाटणारा द्वेष व अविश्वास जन्माला आला असें तो बोलून दाखवी.

जेम्सच्या तापट स्वभावामुळें अखेरीस मॅसाच्युसेट्स् असेंब्लीशीं जेम्सचें वाकडें आलें. त्यानें आपल्या वर्तमानपत्रांत छापलेल्या एका लेखामुळें विधिमंडळाच्या सभासदांना राग आला आणि जेम्सला आपलें डोकें नि टांचा निववण्यासाठीं महिनाभर तुरुंगाच्या हवेंत पाठवण्यांत आलें.

जो बेन इतकीं वर्षें आपल्या भावावर रागावलेला होता त्यानें आपला राग आतां असेंब्लीकडे वळवला. वर्तमानपत्रांना आपले विचार मांडण्याची मुभा असावी असें त्याला वाटे. जेम्स तुरुंगांत असतांना 'न्यू इंग्लंड कूरान्ट' चें संपादन बेननें केलें आणि जेव्हां जेव्हां संधि सांपडली तेव्हां तेव्हां त्यानें आपल्या लेखांतून मॅसाच्युसेट्स् असेंब्लीच्या सभासदांची अवहेलना करणारे शेरे मारले.

ही जी त्यानें निष्ठा दाखवली त्यामुळें जेम्सला त्याच्याबद्दल जरा अधिक माया वाटूं लागली. अर्थात् या बदललेल्या भावनेचें कदाचित् दुसरेंही एक कारण असूं शकेल. तें म्हणजे जेम्स तुरुंगांत होता आणि बेंजामिनचें त्याला फारसें दर्शन घडत नव्हतें. तें कांहीं असलें तरी, मोठा भाऊ जेव्हां शिक्षा भोगून परत आला आणि असेंब्लीकडून त्याच्यावर जेव्हां नोटिस बजावण्यांत आली कीं, "जेम्स फ्रँकलिन यांस यापुढें 'न्यू इंग्लंड कूरान्ट' छापण्याची मनाई करण्यांत येत आहे," तेव्हां त्यानें आपलें पत्र बेनच्या नांवानें काढण्याचें ठरवलें.

हा बदल घडवून आणण्यासाठीं जेम्सनें बेनला त्याचे 'ॲप्रेंटिस करारा' चे कागद परत करून टाकले—त्याच कागदांच्या मागील बाजूवर बेनला आपण पूर्णपणें मुक्त करीत आहों असें त्यानें लिहून दिलें. बेन स्वतंत्र आहे, तो वर्तमानपत्र काढूं शकतो हें दाखवण्यासाठीं याची आवश्यकता होती. पण खाजगी रीतीनें जेम्सनें काय केलें, आपल्या भावाच्या उमेदवारीच्या उरलेल्या वर्षांकरितां म्हणून नवीनच कागद तयार करून त्यानें ते बेनपुढें ठेवले. हे कागदपत्र हुबेहूब जुन्यांबरहुकूम होते. जेम्सला गाजर खायलाही हवें होतें आणि पुंगी वाजवायलाही हवी होती.

बेननें नव्या कागदपत्रांवर सही केली आणि 'कूरान्ट'चें प्रकाशन चालू ठेवलें. पण जेम्सच्या स्वतःच्या जरी तें लक्षांत आलें नव्हतें तरी बेनला त्यानें एक पळ-वाट ठेवली होती. या दुसऱ्या कागदपत्रांची माहिती यांच्याव्यतिरिक्त आणखी कोणालाही नव्हती आणि 'कूरान्ट'शीं असलेल्या संबंधामुळें आपल्याजवळ ते

कागद आहेत ही गोष्ट कबूल करणेंही त्याला शक्य नव्हतें.

पुढच्या खेपेस जेव्हां दोघां भावांतल्या भांडणाचें पर्यवसान' जेम्सनें मारहाण करण्यांत झालें तेव्हां बेननें त्याचा प्रतिकार केला आणि आपण स्वतंत्र आहों हें त्याच्या निदर्शनाला आणून दिलें.

जेम्स भडकला. पण कांहीं झालें तरी आपल्या भावाशीं केलेला गुप्त करार जाहीर करणें त्याला शक्य नव्हतें. त्यामुळें त्याच्यावरच कठीण प्रसंग ओढवला असता. घडलेला प्रकार जर मॅसाच्युसेट्स् असेंब्लीला कळला तर त्याची रवानगी कदाचित् पुनश्च तुरुंगांत झाली असती.

"मीं तुझ्यासाठीं एवढं जें केलं त्याची ही छान फेड करतो आहेस!" जेम्स ओरडला.

"टाळक्यावर रट्टे खाणं हें छपाई धंद्याचं झकास शिक्षण आहे, नाहीं?" बेननें उलटून प्रश्न केला.

"मला नाहीं वाटत, छपाईच्या धंद्यांत तूं फार काळ राहशील असं" जेम्स थंडपणें म्हणाला. "तेवढी व्यवस्था करीन मी."


"माझ्या प्रेमळ भावानें दिलेल्या शिक्षणाचीं इतकीं सगळीं वर्षं फुकट घालवणं अगदींच वेडेपणाचं होईल!" बेन म्हणाला, "या दुःखमय जागेंत छपाईच्या दुकानासंबंधीं मी शिकलों नाहीं अशी एकही गोष्ट नसेल!"

"इथें शिस्त मात्र तूं अजिबात शिकला नाहींस ही गोष्ट दुसऱ्या मालकांना कळूं देणं किती लज्जास्पद वाटेल मला!" जेम्स म्हणाला.

आणि मग त्यानें बॉस्टनमधल्या प्रत्येक छापखानेवाल्याकडे जाऊन त्याला ही सर्व हकीकत सुनावण्याचा चंगच बांधला. त्यामुळें बेनला कोणीही नोकरी देईना.

आतां कुणीकडे वळावें हें बेनला कळेना. मॅसाच्युसेट्स् असेंब्लीवर त्यानें जे वैयक्तिक हल्ले चढवले होते त्यामुळें बॉस्टनमध्यें तो मोठासा लोकप्रिय नव्हताच. तो चर्चमध्यें जात नसे त्यामुळें आणि धर्माबद्दल त्यानें जीं कांहीं मतें बोलून दाखवलीं होतीं त्यामुळें लोक त्याच्याकडे भिऊन पाहात असत; त्याला पाखंडी म्हणत असत. त्याच्या वडिलांचें मन दुखावलें गेलें होतें आणि त्यांना त्याच्याबद्दल घृणा वाटत होती.

बेनला कळून चुकलें कीं आपल्याला खऱ्या जीवनाला प्रारंभ करायचा असेल तर बॉस्टनहून पळालें पाहिजे. आणि मग त्यानें तीच गोष्ट केली.



# परागंदा

ऑक्टोबर महिन्यांतल्या एका उदासवाण्या पहाटे उजाडायच्या आधींच बेंजामिन चोरासारखा घराबाहेर पडला आणि बॉस्टन बंदरांत न्यूयॉर्ककडे जाणारें एक जहाज उभें होतें त्यावर चढला. त्याचा एकुलता मित्र जॉन कॉलिन्स यानें कप्तानाला सांगून बेनला गुप्तपणें जहाजावर घेण्याची व्यवस्था केली होती. भाड्याचे पैसे उभे करावेत म्हणून त्यानें आपलीं अत्यंत आवडतीं आणि मोठ्या कष्टानें जमवलेलीं पुस्तकें विकलीं होतीं. घरापासून दूर नेणारा तो जलमार्ग जसा अधिकाधिक रुंद बनूं लागला, तसें बेनचें अंतःकरण जड झालें.

वारा अनुकूल होता आणि जहाज झपाट्यानें चाललें होतें. तीन दिवसांच्या सफरीनंतर—त्या काळांत बॉस्टनहून न्यूयॉर्कला जायला तीन दिवस लागत—बेननें पाहिलें तों आपण एका अनोळखी शहरांत आलों आहों. तो त्या वेळीं सतरा वर्षांचा होता, त्याच्याजवळ फक्त थोडेसेच पैसे होते आणि त्याची

कोणाशींही ओळख नव्हती.

न्यूयॉर्क हें त्या काळीं एक खेडेगांव होतें म्हटलें तरी चालेल. वुइल्यम ब्रॅडफोर्ड तिथें एकटाच छपाईकाम करणारा मनुष्य होता, त्याला बेन लगेच जाऊन भेटला. पण मि. ब्रॅडफोर्ड म्हणाले, "धंद्याची अवस्था भयंकर आहे. शिवाय आधींच माझ्या हाताशीं नकोत इतकीं माणसं आहेत."

"फिलॅडेल्फियांत माझा मुलगा असतो" ते पुढें म्हणाले. "त्याचा मुख्य मदतनीस अलीकडे गेलेला आहे, तेव्हां तिकडे गेलास तर तो तुला कामावर ठेवील असं एक मला वाटतं." काम मिळवणें भागच होतें, तेव्हां बेंजामिननें लगेच तिकडे जायचें ठरवलें.

फिलॅडेलफिया शंभर मैल दूर होतें; आणि त्या काळांत रेल्वे वगैरे नव्हती. बेन धावत धावत समुद्रकांठावर गेला आणि पर्थ ॲंब्रॉयकडे कांठाकांठानें जायला निघालेल्या एका मचव्यांत चढला. (पर्थ ॲंब्रॉय गांवाचाच पुढें विस्तार होऊन न्यू जर्सीचें राज्य अस्तित्वांत आलें.)

मचवा अगदीं मोडकळीला आलेला दिसत होता, शिडें जुनीं अन् कुसकीं होतीं, आंत माणसें खचून भरलेलीं होतीं आणि मचवा हलला तेव्हां त्यांनीं बेनला रेटीत रेटीत कठड्यापर्यंत नेलें. आकाश धूसर, अभ्राच्छादित होतें आणि खालपर्यंत आलेल्या ढगांतून मधूनच विजेच्या जिभल्या लळकन् फिरत होत्या. ही मंडळी धक्क्यापासून दूर होत आहेत तोंच वाऱ्याचा जोर वाढत चालला आणि त्यानें मचव्याला ढकलीत, पर्थ ॲंब्रॉयच्या वाटेऐवजीं दूर समुद्रांत नेलें. बेनला नौकांची माहिती होती. त्यामुळें या डगमगणाऱ्या होडक्याचें चाक धरून नाखव्यानें कशी धडपड चालवली आहे तें त्यानें पाहिलें आणि त्याला फार भीति वाटली.

लवकरच जबरदस्त वेगानिशीं वादळ मचव्यावर येऊन आदळलें. पन्हाळ्यांतून पाण्याचे लोट कोसळावेत तसा पाऊज आकाशांतून धबाधबा पडूं लागला. वारा मचव्याभोवतीं रिंगण घालून किंचाळूं लागला, आणि तीं कुसलेलीं शिडें हिसकूं लागला. शेवटीं या धडाक्यापुढें हार खाऊन डोलकाठ्या काडकन् मोडून पडल्या. उतारू ओलेचिंब झाले, आणि आरडाओरडा करीत आसरा शोधूं लागले; त्यांतच किनतान टरटर फाटल्याचा आवाज मिसळला. इतक्यांत या सर्वांवर ताण करणारी कर्कश किंकाळी कोणी तरी फोडली.

"माणूस पडला! माणूस पाण्यांत पडला!"

बेन धावतच कठड्याकडे गेला. आणि त्या खवळलेल्या समुद्रांतून एक डोकें

वर निघालेलें त्यानें पाहिलें. तो विचार करायलाही थांबला नाहीं. तसाच कठड्यावरून वेंघून त्यानें त्या माणसाचे केस पकडले. मग त्याला केसांना धरूनच ओढीत, हिसकीत त्यानें वर काढून घेतलें; तेव्हां कुठें त्याचा हात त्याला पकडतां आला. बाकीच्या उतारूंच्या मदतीनें त्यानें त्या अर्धमेल्या प्राण्याला एकदाचें मचव्यांत ठेवलें. लगेच बेनच्या वीरश्रीचें कौतुक सुरू झालें.

"जमीन—जमीन!" खलाशी ओरडले. आणि खरोखरच त्यांच्या अगदीं समोरच एक खडकाळ किनारा दिसत होता. पण पर्थ अँबॉय कुठच्या कुठेंच राहिलें! हा होता लाँग आयलंडचा किनारा.

उतारूंनीं मुक्ततेचे निःश्वास टाकले; पण या आनंदोत्सवांत नाखवा सामील झाला नाहीं. त्या खडकावर आपटून गलबताचे तुकडे होऊं नयेत म्हणून त्याला केवढी तरी मेहनत घ्यावी लागली! वारा जरासा पडला होता. पण पृष्ठभागावर उंच उंच नि विस्तीर्ण लाटा उसळत होत्या, त्या प्रचंड लाटा तें होडकें जणूं वेंघेंत पकडून भिरीभिरी फिरवीत होत्या.

जवळजवळ आटोक्यांत आलेल्या त्या जमिनीकडे उतारू आशेनें पाहात होते. पण ते कधींच तिथपर्यंत पोचले नाहींत. रात्रभर लाटा आणि फवारे मचव्यावर आदळत होते आणि खलाशी नि उतारू भीतीनें थरथर कांपत कोपऱ्यांत बसले होते, झोपेचा प्रयत्न करीत होते. पण त्यांना झोप कुठून येणार? तहानेनें नि भुकेनें ते कासावीस झाले होते. याप्रमाणें तीस तास अन्नपाण्यावांचून काढल्यावर एकदाचें वादळ ओसरलें आणि त्यांनीं अखेरीस पर्थ अँबॉयच्या खाडींत नांगर टाकला.

तुम्हीं नकाशाकडे पाहिलेंत तर तुम्हांला असें दिसेल कीं, पर्थ अँबॉयपासून सुद्धा फिलॅडेल्फिया किती तरी दूर आहे; आणि बेंजामिन फ्रँकलिनच्या आतां लक्षांत आलें कीं यापुढचा प्रवासाचा टप्पा आपल्याला पायीं उरकावा लागणार आहे. पन्नास मैलांवर असलेल्या बर्लिंगटनला जाऊन तिथें फिलॅडेल्फियाला जाणारें दुसरें गलबत त्याला घ्यावें लागणार होतें. या त्रासांत भर घालण्यासाठीं कीं काय, उघड्या होडींतून केलेल्या प्रवासामुळें त्याला ताप आला होता आणि औषध घेण्याइतके पैसे त्याच्याजवळ नव्हते. तेव्हां नुसतें खूपसें पाणी पिऊन तो झोपीं गेला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं तो उठला आणि चालायला लागला. पाऊस धो धो पडत होता. मध्यान्हापर्यंत तो ओलाचिंब झाला आणि अतिशय दमला. आपण घर सोडलें नसतें तर बरें झालें असतें असें त्याला वाटूं लागलें. एक

पाऊलही टाकण्याची शक्ति राहिली नाहीं, तेव्हां त्या दिवशीं दुपारीं नि रात्रभर त्यानें एका दरिद्री खाणावळींत मुक्काम ठोकला. पण तिथेंही जास्त रेंगाळण्याची त्याला भीति वाटत होती. त्याचा अवतार अस्ताव्यस्त नि ओंगळ बनला होता आणि कपडे प्रेक्षणीय दिसत होते. त्यानें आपलें सामान न्यूयॉर्कमध्येंच टाकलें होतें आणि तो आतां आपले कामाचे कपडेच अंगावर घालून होता. आपले शिलकींतले मोजे नि शर्ट त्यानें आपल्या सगळ्या खिशांतून कोंबलेले होते. खाणावळींतल्या प्रत्येकाला असें वाटे कीं हा कोणाचा तरी पळून गेलेला गडी असावा. आपल्याला पकडतील नि तुरुंगांत टाकतील अशी त्याला भीति वाटूं लागली.

बेननें तिथल्या भिकार आंथरुणांत अस्वस्थपणें रात्र काढली. आजारामुळें त्याला अजूनही थकवा वाटत होता; आणि हवाही थंडगार, झोंबरी होती. त्याला सर्वांत जास्त भीति वाटत होती ती ही कीं जिन्यावर पटकन् पावलें वाजतील, तीं पोलिस अधिकाऱ्याचीं ठरतील आणि आपल्याला पकडून तुरुंगांत टाकण्याच्या तयारीनें तो आलेला असेल. तो पळून आलेला नोकर नव्हता, किंवा तुरुंगांत टाकण्यासारखें कोणतेंही दुष्कृत्य त्यानें केलेलें नव्हतें ही गोष्ट खरी; पण त्या काळीं राजेसाहेबांच्या अंमलदारांना त्याची विशेष पर्वा नसे. बेनला कोणीही मित्र नव्हता; एकलकोंडें वाटत होतें. एवढा त्रास घेऊन आल्यानंतर पुन्हा बॉस्टनला परतण्याचीही त्याची इच्छा नव्हती.

उजाडल्याबरोबर तो उठला; काय त्याची थोडी चीजवस्त होती ती त्यानें घेतली. ती पण सर्व खिशांतच कोंबली आणि फिलॅडेल्फियाच्या वाटेकडे निघाला. तो शनिवारचा दिवस होता. आणि शेवटीं एकदाचा तो जेव्हां बर्लिंग्टनमध्यें येऊन पोचला तेव्हां रस्त्यांत खूप बाजारहाट चालू होता.

"जिंजरब्रेड ! गरमागरम जिंजरब्रेड !" कोणी तरी ओरडत होतें.

बेनला एकदम आपण उपाशी असल्याची जाणीव झाली. 'आपण त्यांतली कांहीं विकत घेतली पाहिजे.' तो म्हणाला आणि आपल्या रोडक्या पाकिटांत एखादें नाणें सांपडतें का म्हणून पाहूं लागला.

सुंठीचा पाव विकणाऱ्या त्या गुलाबी वर्णाच्या म्हातारीनें त्याच्याकडे पाहून स्मित केलें आणि त्याला एक मोठा तुकडा दिला. बिचारा किती कोंवळा दिसत होता !

बेननें पावावर झडप घातली आणि तो धावतच धक्क्यावर गेला. तिथल्या एका माणसाला त्यानें सांगितलें, "मला फिलॅडेल्फियाला जाण्यासाठीं मचवा हवा आहे. कुठें असेल ?"

"आज तरी तुला इथें कुठेंही मिळायचा नाहीं" त्या माणसानें उत्तर दिलें. "तासाभरापूर्वींच गलबत निघून गेलं."

बेननें एक सुस्कारा सोडला. खडतर नशीब त्याची जणूं पाठ पुरवीत होतें!

"मग आतां केव्हां?" त्यानें विचारलें.

"मंगळवारपर्यंत नाहीं" त्यानें माहिती दिली. "तें गलबत आतां परत येईल अन् विश्रांति घेईल तेव्हां जाणार!"

बेनला आत्तांच्या इतकें हताश कधीं वाटलें नव्हतें. मंगळवारपर्यंत आपण राहायचें तरी कसें हेंच त्याला समजत नव्हतें; कारण त्याच्याजवळचा पैसा बहुतेक संपला होता. "फिलॅडेल्फियाला जाणारं दुसरं कुणीच नाहीं का? मी हाताशीं माणूस म्हणून त्यांच्याबरोबर जाऊं शकेन."

"मला तरी माहीत नाहीं" तो मनुष्य म्हणाला. "मंगळवारपर्यंत तरी कुणी नाहीं."

बेन मागें वळला आणि पुन्हा त्याच रस्त्यावरून विषण्णतेनें चालूं लागला. त्याच्या सहनशक्तीचा कडेलोट व्हायची वेळ आली होती.

"झाली का रे बाबा तुझी धावपळ पुरी?" कोणी तरी म्हातारें माणूस बोलल्यासारखा आवाज आला. त्यानें बघितलें तों ती पाववाली बाई त्याच्याकडे रोखून पाहात होती.

"मचवा निघून गेला" बेननें तिला सांगितलें. "आणि मंगळवारपर्यंत दुसरा मिळत नाहीं. काय करावं समजत नाहीं मला."

"मंगळवारची वाट पाहावी" ती म्हणाली.

"पण मला राहायला जागा नाहीं"

"तूं बरा मुलगा दिसतोस" ती म्हणाली. "तुला गरिबाच्या साध्या घरांत राह्यलेलं चालत असेल तर माझ्याकडे राहा."

"पण माझ्याजवळ पैसे नाहींत" बेन म्हणाला. "मी तुम्हांला पैसे कुठून देऊं?"

"पैशाबद्दल मीं कांहीं म्हटलं का?" म्हातारी म्हणाली. "मी तुला पाहुणा म्हणून बोलावीत होतें."

बेन एवढा मोठा मुलगा होता तरी त्याचे डोळे पाण्यानें भरून आले. त्याला वाटलें, कित्ती तरी दिवसांनीं आपल्याबद्दल खरी माया दाखवणारं एक माणूस भेटलं! म्हातारीबद्दल त्याचें मन कृतज्ञतेनें एवढें भरून आलें कीं तिचें चुंबन घ्यावें असें त्याला वाटूं लागलें.

" तुम्ही मला ओळखतसुद्धा नाहीं " बेन म्हणाला. " आपल्या घरांत तुम्ही माझ्यासारख्या नवख्या माणसाला कसा घेऊं शकतां? मी एखादा गुन्हेगारही असेन!"

" किंवा नसशीलही " म्हातारी म्हणाली. " मला माणसांचा पुरेसा अनुभव आहे. त्यामुळें मला एवढंच कळतं कीं तूं एक दुःखी, निराधार पोरगा आहेस; आणि मंगळवारपर्यंत तुला राहायला जागा हवी आहे. "

" व्हा तर मग पुढें, बाई!" बेन म्हणाला. " तुम्हीं माझं भाकीत बरोबर वर्तवलंत. येतों आतां तुमचा पाहुणा म्हणून. "

तिनें त्याला आणखी एक सुंठीचा पाव दिला आणि त्याला ती आपल्या-बरोबर घरीं घेऊन गेली.

त्या दिवशीं संध्याकाळीं बेन नदीच्या कांठावरून हिंडत होता; तेवढ्यांत फिलॅडेल्फियाला निघालेलें एक गलबत धक्क्याजवळ आलें.

"आहॉय्!" बेन ओरडला, " तुम्ही फिलॅडेल्फियाला चाललांत काय?"

" आय्-आय्!" खलाशांपैकीं एकानें ओरडून होकारार्थी उत्तर दिलें.

" एखादं कामाला चांगलं माणूस घेतां का?" बेंजामिननें विचारलें.

" आमच्याकडे आधींच खूप गर्दी झालेली आहे. पण एखादं माणूस जास्त झाल्यानें कांहीं मोठासा फरक पडेलसं मला वाटत नाहीं " तो खलाशी म्हणाला.

कप्तानाच्या सल्ला विचारल्यावर त्यांनीं त्याला गलबतावर घेतलें. आणि पुढें याबद्दल खरोखर आनंद मानण्याची त्यांच्यावर पाळी आली.

त्या रात्रीं शिडांना पुरण्याइतका वारा नव्हता; त्यामुळें खलाशांना एकसारखीं वल्हीं मारावीं लागलीं. बेनला लहानपणापासूनच वल्हवण्याची संवय होती; त्यामुळें या कामीं तो चांगला उपयोगीं पडला. पण कप्तानाची दिशा चुकली आणि फिलॅडेल्फिया सांपडेना. शेवटीं ही मंडळी एका लहानशा खाडींत उतरली. कशींबशीं खालीं पाण्यांत उतरलीं; आणि जवळचेंच एक कुंपण मोडून त्यांनीं शेकोटी पेटवली. कारण त्यांच्यावर गोठून जाण्याची पाळी आली होती.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मचवा खाडींतून बाहेर काढून ते पुढें निघाले आणि लवकरच त्यांना फिलॅडेल्फियांतल्या चर्चचीं निमुळतीं टोकें दिसूं लागलीं.

" तें बघा आपलं गांव!" खलाशांपैकीं एकजण ओरडला; आणि फ्रॅंकलिननें आपल्या नव्या गांवाचें पहिलें दर्शन घेतलें.

त्या दृश्यानें त्याला मोठासा उत्साह वाटला नाहीं. ती रविवारची सकाळ होती;

आणि चालून चालून, वल्हीं मारून अन् झोप न मिळाल्यामुळें तो गळून गेलेला होता. त्याच्या खिशांत फक्त एक डॉलर होता; आणि कुठेंही उतरायला ठिकाण नव्हतें. तसाच रस्त्यावरून जड पावलांनीं तो चालूं लागला. वाटेंत पाव खात असलेला एक मुलगा त्याला दिसला. बेननें त्याला पाव कुठें मिळेल हें विचारलें व त्या मुलानें त्याला भटाऱ्याचें दुकान दाखवून दिलें.

"मला बिस्कीट हवंय्" बेन त्या भटाऱ्याला म्हणाला; आणि खिशांतलें तीन पेन्सचें नाणें काढूं लागला.

"तसलं कांहीं आमच्याकडे नाहीं" भटारी म्हणाला, "बिस्कीट म्हणजे काय?"

"आमच्या बॉस्टनमध्यें बिस्किटं असतात" बेन म्हणाला.

"पण हें फिलॅडेल्फिया आहे" भटाऱ्यानें उत्तर दिलें.

"तर मग मला तीन पेनींचा पाव दे" बेन म्हणाला. "मला भूक लागलेली आहे."

"लागली असेल" भटारी म्हणाला. "पण तीन-पेनी पाव नसतात माझ्याकडे."

"मग कुठचेही पाव दे—तीन पेन्स किंमतीचे दे म्हणजे झालं!" बेन म्हणाला. मिनिटामिनिटाला त्याची भूक वाढत होती आणि रागही वाढत होता.

भटाऱ्यानें तीन प्रचंड लठ्ठ रोल त्याच्या हातांत दिले. तें पाहून स्वारी गोंधळलीच! या एवढ्या पावांचें काय करायचें हें त्याला समजेना. खिशांत आधींच शर्ट-मोजे भरलेले असल्यामुळें जागा नव्हती. त्यांतले दोन पाव परत करावेत आणि आपले दोन पेन्स मागून घ्यावेत असें त्याला वाटत होतें, पण धीर होईना. शेवटीं एका काखेंत एक रोल नि दुसऱ्या काखेंत दुसरा, असे धरून तिसरा रोल खात खात तो रस्त्यांतून चालला.

मार्केट स्ट्रीटवरून फोर्थ स्ट्रीटकडे जात असतां त्याला एक सुरेख मुलगी दिसली. आपल्या बापाच्या घराच्या पायऱ्यांवर ती उभी होती. पावानें लादलेला फ्रँकलिन इतका बेंगरूळ दिसत होता कीं ती त्याच्याकडे पाहून हसली. त्यामुळें त्याला फार वेड्यासारखें वाटलें. एका पोरीनें—विशेषतः इतक्या गोड पोरीनें आपल्याला हसावें याचा त्याला संताप आला. तिची चांगली खरड काढावी असें त्याला वाटलें: पण तोंडांत पावाचा तोबरा भरलेला असल्यामुळें त्याला कांहीं बोलतां येईना.

त्याला त्या वेळीं अर्थात् माहीत नव्हतें; पण आपल्या भावी पत्नीशीं त्याची ही पहिली सलामी झडली होती. या मुलीचें नांव डीबोरा रीड. तिच्याशीं कांहीं वर्षांनंतर त्यानें लग्न केलें.



# छापखानेवाला

बेन फ्रॅंकलिननें आयुष्यांत अनेक कामें केलीं आणि तो उद्योग धंद्यांत प्रवीणही होता. पण स्वतःला तो नेहमीं छापखानेवाला समजत असे. फिलॅडेल्फियाला तो छपाईकाम करण्यासाठीं आला होता; आणि दुसऱ्या कोणत्याही कामाचा विचार त्याच्या डोक्यांतसुद्धा आला नाहीं.

आपल्याजवळचे ते दोन शिल्लक रोल एका म्हातारीला नि एका मुलाला देऊन—कारण त्याच्या स्वतःपेक्षां तीं दोघं जास्त भुकेलीं दिसत होतीं—बेन फिलॅडेल्फियाच्या रस्त्यांतल्या सुबक पोशाख केलेल्या लोकांच्या घोळक्यांमागून जाऊं लागला. हा घोळका क्वेकर लोकांच्या सभागृहाकडे चालला होता असें पुढें त्याला आढळून आलें.

बेनही त्यांच्याबरोबर आंत गेला आणि विचार करीत बसला. पण त्याला गाढ झोप लागली. कोणीं तरी त्याच्या खांद्यावर थाप मारली नि "चर्चमधली प्रार्थना संपली" असें त्याला सांगितलें, तेव्हां कुठें तो उठला. मग त्यानें असें ठरवलें कीं काम शोधण्यापूर्वी अगोदर आपली इतक्या दिवसांची बुडालेली

झोप घेऊन टाकली पाहिजे. तेव्हां एक खोली त्यानें भाड्यानें घेतली आणि खूप वेळ तो झोपून राहिला. नंतर त्यानें वुइल्यम् ब्रॅडफोर्डचा मुलगा अँड्र्यू ब्रॅडफोर्ड याचा पत्ता शोधून काढला.

मि. ब्रॅडफोर्ड म्हणाले, "नुकताच मीं एक मनुष्य ठेवला आहे." आणि तें ऐकून बेन फार खिन्न झाला. त्याला वाटलें कीं झालें! आपण मोका गमावून बसलों!

मि. ब्रॅडफोर्डनीं बेनवरून एकदा नजर फिरवली. त्यांचा ग्रह चांगला झाला. ते म्हणाले, "सॅम्युएल् कीमरला कदाचित् तुझा उपयोग होईल."

मि. कीमर हे आणखी एक छापखानेवाले होते. ते दोघे मिळून मग त्यांच्याकडे गेले.

मि. ब्रॅडफोर्ड म्हणाले, "या तरुणाला मी तुमच्याकडे घेऊन आलों आहें. तुमच्या धंद्यांतला माणूस आहे. तुम्हांला जरूर असली तर पाहा."

मि. कीमरनीं बोटांनीं आपली लांब दाढी कुरवाळली आणि बेनकडे पाहिलें. त्यानें आतां तोंडबींड स्वच्छ धुतलेलें होतें आणि कपडेही स्वच्छ घातले होते; त्यामुळें तो बरा दिसत होता. शेवटीं त्याला कामावर घ्यायचें कीमरनें कबूल केलें आणि बेनला एकदाचा खराखुरा पगार मिळूं लागला.

फिलॅडेल्फियांतला पहिला हिंवाळा बेनला मजेचा गेला. तो आतां स्वतंत्र होता; खिशांत पैसे खुळखुळत होते. वडील जवळ उभे नव्हते—'अमुक कर' नि 'तमुक करूं नको' म्हणून सांगायला. आणि अंगावर गुरकावायला नि झोडपायला जेम्सही नव्हता.

त्या काळीं फिलॅडेल्फिया हें अमेरिकन वसाहतींतलें सर्वांत मोठें शहर गणलें जात होतें—बॉस्टन आणि न्यूयॉर्क हीं दोन शहरें एकत्र केलीं तरी त्यापेक्षांही फिलॅडेल्फिया मोठें होतें. आणि तिथले लोकही सर्वांत सुशिक्षित आणि श्रीमंत होते. 'मोठें शहर' म्हटलें कीं हल्लीं आपली जी कल्पना असते तसें जरी तें नव्हतें, तरी वसाहतींमधली ती महानगरी—'सिटी'—होती. बॉस्टन म्हणजे जीर्ण मातकट घरांचा कसाबसा एकत्र केलेला गठ्ठा होतें; तर फिलॅडेल्फिया उज्ज्वल रंगांचें शहर होतें. बहुतेक दुकानांच्या दर्शनी भागांना लाल, निळा, हिरवा किंवा पिवळा रंग दिलेला असे आणि त्यांच्या समोरच्या बाजूला लटकत असलेल्या मोठाल्या नांवांच्या पाट्या, रंग नि गिलीट यामुळें लखलखीत दिसत असत. चिखलानें भरलेल्या नि खड्डे पडलेल्या रस्त्यांवरून

ज्या घोडागाड्या ठेचकळत जात, त्याही रंगीबेरंगी असत.

फिलॅडेल्फियाचे लोक भडक रंगांचे कपडे घालीत आणि छानछोकीच्या पोशाखाची त्यांना आवड असे. क्वेकर लोकांपैकीं कांहीं जण मात्र अजूनही नख-शिखान्त राखी रंगाचा पोशाख करीत. पण श्रीमंत क्वेकरपंथीय लोक फॅशनप्रमाणें चालत आणि रेशमाचे, साटिणीचे नि मखमलीचे इंद्रधनुष्यांतल्या रंगांपैकीं कोणत्याही रंगाचे कपडे वापरीत; केसांचे टोप नि दागदागिनेही घालीत. स्त्रिया-देखील अघळपघळ पोशाख करीत आणि त्याबरोबर डोक्यावर खूप उंचीची केशभूषा करून नटत तेव्हां फार सुरेख दिसत.

फिलॅडेल्फियन लोक समाजप्रिय होते. त्यांना पार्ट्या-समारंभ आवडत; एकत्र जमून गप्पागोष्टी करणें, गाणें, खाणें हें सर्व त्यांना आवडे. त्या काळीं लोकांना करमणुकीचीं ठिकाणें फारशीं नसत. त्यामुळें ते घरींच बसत आणि खूप बोलत. संभाषणाला तिकडे फार महत्त्व आलें होतें.

बेन फ्रँकलिनलाही बोलायला आवडे आणि तो इतकीं पुस्तकें वाचायचा कीं त्याच्याजवळ बोलण्यासारखें पुष्कळ असेही. फिलॅडेल्फियांत त्याला त्याच्याच वयाची नि वाचनाची तसेंच त्याच्या आवडीच्या इतर विषयांत गोडी असलेली मंडळी भेटली. तो मित्र जोडूं लागला—हें बेनला कधींच कठीण जात नसे आणि अगदीं आयुष्याच्या अंतापर्यंत त्यानें हा उपक्रम चालू ठेवला होता.

त्याचा धनी मि. कीमर यानें त्याच्या जेवणाराहण्याची व्यवस्था मि. रीड यांच्या घरीं केली होती. आपले लठ्ठ लठ्ठ रोल हातांत घेऊन रस्त्यांतून तरुण फ्रँकलिन चालला असतांना जी डीबोरा रीड त्याच्याकडे पाहून हसली होती, तिचेच हे वडील.

अशा रीतीनें बेनचे फिलॅडेल्फियांतले सुखाचे दिवस सुरू झाले. पुढें फ्रँकलिन जगभर अनेक ठिकाणीं राहिला असला तरी फिलॅडेल्फिया शहरालाच आयुष्यभर तो आपलें घर मानणार होता.

घर सोडल्यानंतरचें पहिलें वर्ष मनुष्याच्या आयुष्यांत जितकें महत्त्वाचें असतें तितकें दुसरें क्वचितच असेल. कारण या काळांत 'मुलगा' ही अवस्था संपून तो 'तरुण' झालेला असतो; स्वतःचे स्वतः पैसे मिळवतो आणि आपले आपण जोडीदार निवडतो. बेनचे बॉस्टनमधले अखेरचे दिवस इतके दुःखपूर्ण होते कीं बॉस्टनची आठवण विसरून जाण्याचा त्यानें शक्य तेवढा प्रयत्न केला. एक तर त्याला अजूनही अशी भीति वाटत होती कीं आपल्याला पुन्हा खडतर उमेद-

वारींत गोवून टाकण्याची दुसरी एखादी युक्ति जेम्सला सुचेल. याच कारणामुळें त्यानें आपला पत्ता गुप्त ठेवला होता आणि जॉन कॉलिन्सखेरीज बॉस्टनमधल्या दुसऱ्या कोणत्याही माणसाला त्यानें पत्र वगैरे लिहिलें नव्हतें. जॉननें आपण कोणाजवळ बोलणार नाहीं अशी शपथ घेतलेली होती.

पण असें असलें तरी, बेंजामिन फिलॅडेल्फियांत आहे ही बातमी अखेर बाहेर फुटलीच आणि उत्तरेकडे डिलावेर राज्यांतील न्यू कॅसलपर्यंत पसरत गेली. तिथें बेनच्या बहिणींपैकीं एकीचा नवरा, कॅप्टन रॉबर्ट होम्स हा राहात असे. त्यालाही ही कुणकुण कळली. बॉस्टन आणि डिलावेर बंदरांच्या दरम्यान व्यापार करणाऱ्या एका जहाजाचा तो प्रमुख होता. त्यानें तावडतोब उद्विग्नपणें आपल्या मेहुण्याला पत्र लिहिलें आणि त्याला घरीं परत जाण्याचा सल्ला दिला. "गृहत्याग करून पळालेल्या या मुलाबद्दल घरीं सर्वांना चिंता नि मनस्ताप वाटतो आहे" असें त्यानें लिहिलें होतें.

जेम्सनें केलेल्या मारहाणीचें दुःख आणि बॉस्टनमध्यें आपल्याला नोकरी मिळू नये म्हणून त्यानें केलेली कारवाई या गोष्टी बेन अजून विसरलेला नव्हता. त्यानें कॅप्टन होम्सला पत्र लिहून तें सर्व कळवलें. आपण बॉस्टन कां सोडलें याबद्दल आणखीही कांहीं कारणांचा त्यानें खुलासा केला.

आतां, बेन फ्रँकलिन हा महान् कुशल पत्रलेखक होता. खरें म्हणजे, अजूनही तो वयानें तसा फार मोठा झालेला नव्हता; आणि तरी त्यानें लिहिलेलें पत्र असें होतें कीं तें कोणींही वाचलें तरी त्याच्यावर त्याची पक्की छाप पडावी.

बेनचें पत्र ज्या वेळीं कॅप्टन होम्सला पोचलें, त्या वेळीं तो पेनसिल्व्हॅनियाचे इंग्रज गव्हर्नर, सर वुइल्यम् कीथ यांच्याबरोबर बोलण्यांत गुंतलेला होता.

कॅप्टन होम्सनें पत्र वाचून संपवलें आणि तो म्हणाला, "माझा हा तरुण नातेवाईक मोठा धडाडीचा माणूस आहे. जरी घरून पळालेला असला तरी!"

"पळालेला?" सर वुइल्यम् म्हणाले.

कॅप्टन होम्सनें त्यांना सर्व हकीकत सांगितली आणि पत्रही त्यांच्या हातीं दिलें. तो म्हणाला, "वाचून पाहा, यांत त्यानें त्याचीं कारणं दिलीं आहेत."

"वा! मोठा चतुर डोक्याचा माणूस दिसतो! त्याला लिहा, म्हणावं मला येऊन भेट."

सर वुइल्यम्ना औदार्याचें भरतें आलें होतें. त्यांनीं कॅप्टन होम्सला सल्ला दिला कीं अशा हुशार मुलानें फिलॅडेल्फियांतच स्वतःचें छपाईचें दुकान थाटलें

पाहिजे, आणि पेनसिल्व्हॅनियाच्या वसाहतीकडून काम मिळवलें पाहिजे. सर वुइल्यम् एवढ्यावरच थांबले नाहींत. ते नुसते बोलणारे नव्हते, 'करणारे' होते. फिलॅडेल्फियांतल्या सॅम्युअल कीमरच्या दुकानाला त्यांनीं भेट दिली.

यामुळें त्या छापखान्यांत आणि शेजारींपाजारीं केवढी खळबळ उडाली असेल याची तुम्ही कल्पना करा. पेनसिल्व्हॅनियाचे गव्हर्नरसाहेब इथें पायधूळ झाडायला येतात म्हणजे काय? प्रत्येकाची धावपळ सुरू झाली. कशाप्रीत्यर्थ आपल्याला हा मान देण्यांत येत आहे हें मि. कीमरना समजेना. त्यांनीं गव्हर्नरचें लवून स्वागत केलें. गव्हर्नरसाहेबांबरोबर डिलावेरमधला कर्नल फ्रेंच नांवाचा एक मित्र होता.

"तुमच्याकडे फ्रँकलिन नांवाचा जो छपाईकाम करणारा आहे त्याची चौकशी करायला मी आलों आहें" सर वुइल्यम् म्हणाले. "कृपा करून त्याला बोलवा बरं."

मि. कीमरचे डोळे जवळजवळ बाहेर लोंबायला लागले. बेननें पुढें सांगितलें, "विष घातलेलं डुक्कर जसं डोळे ताणून बघतं तसा तो पाहात होता."

अठरा वर्षांच्या या युवकाला जेव्हां गव्हर्नरसाहेबांपुढें आणण्यांत आलें, तेव्हां त्यांनीं त्याला आदरानें वागवलें; त्याची स्तुति केली आणि कोपऱ्यावरच्या पथिकाश्रमांत चलण्याची विनंती केली.

"तिथें आपण थोडंसं खाऊं अन् बोलूं."

तिथें गेल्यावर सर वुइल्यम् म्हणाले, "तूं चांगला हुशार मुलगा आहेस. तूं स्वतःच धंदा सुरू करून आपला भाग्योदय कां करीत नाहींस? आम्हांला सरकारांतही चांगल्या छपाईकामाची जरूर आहे. तुझ्या कामाला पुष्कळ मागणी येईल एवढं मी पाहतों."

"आपण मला हा फारच मोठा मान देत आहांत." बेन म्हणाला. "पण महाराज, टाईप अन् प्रेस घ्यायला माझ्याजवळ पैसे नाहींत."

"सुरवात करण्यापुरते पसे तुला वडिलांकडून मिळायचे नाहींत का?" गव्हर्नरांनीं विचारलें.

आपण घरून पळून आलों आहों आणि 'अप्रेंटिस' म्हणून केलेला करार आपण मोडला आहे हें बोलून दाखवणें बेनला आवडलें नाहीं. शिवाय फिलॅडेल्फियांत आपले वडील आपल्याला छापखाना थाटून देतील हा संभव कितीसा आहे याबद्दल त्याला शंकाच होती. तसें म्हटलें तर बेन फिलॅडेल्फियांत आहे हेंसुद्धा त्यांना माहीत नव्हतें.

" माझे वडील काय म्हणतील, सांगवत नाहीं ! " क्षणभरानें तो म्हणाला.

" मी त्यांना पत्र लिहितों " सर वुइल्यम् म्हणाले, " आणि तूं तें बॉस्टनला घेऊन जा नि त्यांना गळ घाल. "

" ठीक आहे " बेन म्हणाला. " आपण किती चांगले आहां ! "

" मात्र याचा उल्लेख न केलेला बरा " सर वुइल्यम् कीथ म्हणाले. " नाहीं तर तुझा धनी तुला सुखांत राहूं देणार नाहीं. "

बेन परत कामावर गेला तो आपलें हें रोमहर्षक रहस्य बरोबर घेऊन.

त्यानंतर फार दिवस लोटले नाहींत तोंच गव्हर्नर कीथनीं जोसिया फ्रँकलिनला उद्देशून लिहिलेलें एक पत्र बेनकडे पाठवलें. त्यांत बेनची भरपूर प्रशंसा केलेली होती आणि धंदा थाटण्यासाठीं मुलाला पैसे द्यावेत असा मि. फ्रँकलिनना आग्रह केला होता.

त्यामुळें एका मेघाच्छादित दिवशीं बॉस्टन शहर सोडल्यापासून अवघ्या सातच महिन्यांनीं बेंजामिन फ्रँकलिन परत बॉस्टनला गेला. या वेळेस त्यानें नखशिखान्त छानदार नवे कपडे घातले होते आणि त्याचे खिसे चांदीच्या नाण्यांनीं भरलेले होते. त्याच्याजवळ घड्याळसुद्धा होतें, आणि सर्वांत महत्त्वाची चीज म्हणजे पेनसिल्व्हॅनियाच्या गव्हर्नरचें पत्र होतें.

तो घरून निघून गेल्यापासून त्याच्या घरच्या मंडळींना त्याची कांहींसुद्धा खबर कळलेली नव्हती. (त्याचा मेहुणा कॅप्टन होम्स अजून दर्याई कामगिरीवर होता.) त्यामुळें त्याच्या भेटीनें आणि तो आतां किती रुबाबदार दिसतो तें पाहून त्यांना आश्चर्य वाटलें. जेम्स सोडून बाकी सर्वांनीं त्याचें स्वागत केलें.

बेनला आतां धीर धरवला नाहीं. जेम्सच्या छपाई-दुकानांत जाऊन त्यानें आपल्या संपत्तीचें प्रदर्शन केलें. त्याचे पूर्वीचे सर्व सहकारी त्याच्याभोवतीं जमा झाले. कोणी त्याच्या रेशमी पोशाखाला हात लावून पाहात; कोणी फिलॅडेल्फिया-बद्दल प्रश्न करीत. पण जेम्स एकटा रुष्ट होता. तो या समारंभांत सामील झाला नाहीं.

" फिलॅडेल्फिया झकास आहे " बेन म्हणाला. " तिथें माझं आयुष्य आनंदांत चाललं आहे आणि मला इथें जास्त थांबतां येणार नाहीं—परत गेलं पाहिजे. "

" तिथल्या माणसांना चुकल्याचुकल्यासारखं झालं असेल यांत शंकाच नाहीं " जेम्स कोपऱ्यांतून बोलला. " मला वाटतं, जितक्या लवकर तूं परत जाशील तितकं अधिक बरं ! "

"पेनसिल्व्हेनियांतला समाज जास्त मनमिळाऊ आहे. या इथल्यांबद्दल मी तसं म्हणूं शकणार नाहीं!" बेन म्हणाला.

शिकाऊ कामगारांपैकीं एक म्हणाला, "तिथें खूप सुबत्ता असेल? सर्वांजवळ पैसा असतो ना?"

"अरे, तें काय विचारतोस?" बेन म्हणाला, आणि त्यानें मूठभर चांदीचीं नाणीं बाहेर काढलीं. कामगारांचे डोळे बाहेर डोकावूं लागले. बॉस्टनमध्यें कागदी पैसे वापरीत असत. चांदी माहीतच नव्हती.

"माझ्या नांवानें सर्व जण गोडधोड खा, मजा करा!" बेन म्हणाला आणि त्यानें मोठ्या झोकांत एक नाणें खालीं भिरकावलें.

जेम्सनें कराकरा दांत वाजवले. पण सगळे 'ॲप्रेंटिस' आणि छपाईवाले मोठ्या उत्साहानें 'हो–हो' करूं लागले.

"बरंय्! मला गेलं पाहिजे." बेन म्हणाला. "मला थोडं खाजगी काम आहे." आणि खिशांतून घड्याळ काढून त्यानें किती वाजले तें पाहिलें.

त्या काळांत वसाहतींमध्यें घड्याळ ही एक दुर्मिळ वस्तु होती. त्या ठिकाणीं बहुधा एकही माणूस असा नसेल कीं ज्याला जन्मांत कधीं काळीं आपण स्वतचें घड्याळ घेऊं अशी आशा वाटली असेल! ते सर्व जण घड्याळाकडे अगदीं चकित मुद्रेनें पाहूं लागले. ज्याला त्याला तें सुंदर खेळणें आपण हाताळावें असें वाटूं लागलें.

जेम्सच्या बाबतींत ही शेवटची काडी ठरली. आपल्या कामगारांपुढें हें प्रदर्शन केल्याबद्दल बेनला त्यानें कधींही क्षमा केली नाहीं. कुटुंबांत शांति नांदावी म्हणून या दोन भावांना एकत्र आणण्याचा प्रयत्न त्यांच्या आईनें केला तेव्हां जेम्स म्हणाला, "बेननें माझा जो अपमान केला आहे तो क्षमा करण्याच्या पलीकडचा आहे!" पण बेनला मात्र वाटत होतें कीं जेम्सकडून आपल्याला जी मारहाण नि वाईट वागणूक मिळाली होती त्याची आपण ही केवळ परतफेड केली आहे, दुसरें काहीं नाहीं.

बेननें सर वुइल्यम् कीथचें पत्र आपल्या वडिलांना दाखवलें, तेव्हां संतापानें त्यांचें नाक फुलायला लागलें. 'फुर्रर्र' आवाज निघायचाच तेवढा बाकी राहिला. कारण जोसिया फ्रॅंकलिन हा तसा आपला आब ठेवून वागणारा होता.

"तुझ्याएवढ्या मुलाला धंदा थाटून देण्याची भाषा करणारा हा मनुष्य आहे तरी कशा प्रकारचा?" त्यानें जोरांत विचारलें. "अजून तुला वयांत यायला

तीन वर्षे हवींत!"

"गव्हर्नर आहेत ते" बेन हळू आवाजांत म्हणाला. "त्यांना समजत नसेल असं नाहीं."

बहुतेक अमेरिकन वसाहतवाल्यांप्रमाणें जोसिया फ्रँकलिन हा स्वतंत्र वृत्तीचा मनुष्य होता. पदव्या-किताबांमुळें तो गांगरून जाण्यासारखा नव्हता.

"मी तुझा बाप आहें" बेन म्हणाला. "त्याच्यापेक्षां मी तुला जास्त ओळखतों."

"खरं आहे" गुलाबी ढगावर स्वार झालेला बेन एकदम भूतळावर उतरून म्हणाला.

"तुला आणखी अनुभव मिळेपर्यंत थांब" वडिलांनीं सल्ला दिला. "लोकाचा पैसा वापरण्याची जबाबदारी तुला एवढ्यांत पेलायची नाहीं. तूं लहान आहेस."

बेननें पाहिलें कीं आपले वडील गव्हर्नरांच्या योजनेंत सामील होण्याचा संभव नाहीं. तेव्हां फिलॅडेल्फियाला परत जाण्याची त्यानें तयारी केली. त्याच्या वडिलांनीं या गोष्टीला हरकत घेतली नाहीं; पण जगांत कसें वागावें आणि पैशाची बचत कशी करावी यावर त्याला एक व्याख्यान सुनावलें. सर वुइल्यम् कीथना त्यांनीं उत्तर लिहिलें कीं, "माझा मुलगा अद्यापि लहान आहे, अननुभवी आहे; स्वतंत्र धंदा त्याला झेपणार नाहीं."

सर वुइल्यमनीं हें पत्र वाचलें तेव्हां ते बेनला म्हणाले, "तुझे वडील वाजवी-पेक्षां अधिक जपून वागणारे दिसतात. माझं असं मत आहे कीं असल्या गोष्टींत वयाचा कांहीं संबंध नसतो. या वसाहतींत चांगला छपाईवाला हवा असा मीं निश्चय केलेला आहे; अन् मी स्वतःच तुला धंदा थाटून देणार आहें!"

आणि मग आपल्याला कोणकोणत्या जिनसा लागतील त्यांची एक यादी करायला बेनला त्यांनीं सांगितलें आणि ते म्हणाले, "तूं स्वतःच इंग्लंडला जाऊन आपली मुख्य मुख्य खरेदी तिथें कर. मी तुला पैसे देईन आणि आपल्या नफ्यांतून तूं ते पुढें परत कर."

बेनला वाटलें, हे गृहस्थ किती चांगले आहेत पण! मग—फार उशिरा—त्याला कळलें कीं आपल्याला धंदा थाटून देण्यापुरते पैसे गव्हर्नरसाहेबाजवळ आहेत कुठें? सर वुइल्यम् दयाळु गृहस्थ होते, सर्वांना आपण प्रिय व्हावें असें

त्यांना वाटे आणि जवळ फारसा पैसा नसल्यामुळें अशीं पाळतां न येण्यासारखीं अघळपघळ वचनें देण्याचा त्यांना छंदच होता.

प्रेस आणि टाइपांच्या खरेदीकरतां इंग्लंडला जाण्यासाठीं बेन जहाजांत बसला आणि मग त्याला कळलें कीं आपल्याला जरूर तीं पत्रें नि पैसे गव्हर्नरांनीं अखेरपर्यंत पाठवलेलेच नाहींत. आतां अमेरिकेला परत यावें, तर त्याच्याजवळ पुरेसे पैसे नव्हते. तेव्हां तो इंग्लंडमध्येंच एका छपाई दुकानांत नोकरीला राहिला. मात्र तो जेव्हां परत मायदेशीं आला तेव्हां अमेरिकेंतल्या कोणापेक्षांही त्याला छपाईधंद्याची अधिक माहिती झालेली होती; व ती त्यानें खडतर कष्ट करून मिळवली होती.

लंडनच्या छपाई दुकानांतून त्यानें दीड वर्ष काम केलें; आणि मग, घरची ओढ लागून तो अगदीं झुरणीला लागला होता—अशा वेळीं, डेनहॅम नांवाच्या व्यापाऱ्यानें त्याला एक नोकरी देऊं केली. फिलॅडेल्फियांत वॉटर स्ट्रीटवर आपण एक नवीन दुकान काढणार आहों, तिथें राहशील का, असें त्यानें त्याला विचारलें. बेननें ताबडतोब संमति दिली आणि मि. डेनहॅमनीं त्याला प्रवासखर्चाचेही पैसे दिले. फिलॅडेल्फियांत मि. डेनहॅम यांच्या या सर्ववस्तुभांडारांत तो मग कामाला राहिला आणि माल कसा विकावा, हिशेबठिशेब कसा ठेवावा वगैरे सर्व गोष्टींचें ज्ञान त्यानें मिळवलें. पण थोड्याच काळांत मि. डेनहॅम नि बेन या दोघांनाही प्लूरसी झाली; आणि डेनहॅम मरण पावले. फ्रँकलिन पुन्हा निर्धन झाला आणि मि. कीमरकडे त्यानें जुनी नोकरी देण्याविषयीं याचना केली.

या नोकरीवरूनही पुढें बेनची हकालपट्टी झाली. कामाची माहिती नसलेल्या कांहीं नव्या माणसांचा प्रमुख म्हणून कीमरनीं त्याची नेमणूक केली होती. हीं माणसें शिकून तयार होतांच बेनला काढून टाकण्याचा त्यांचा डाव होता. त्याचा मालक केवळ स्वतःच्या फायद्यासाठीं त्याचा उपयोग करून घेत होता. कारण बेननें आतां छपाई विद्येंत प्रभुत्व मिळवलेलें होतें.

एक दिवस रस्त्यावर कांहीं तरी गडबड झाली. छापखान्यांत बेन जिथें काम करीत होता तिथल्या खिडकीखालींच आवाज आला, म्हणून बेननें काय चाललें आहे हें पाहण्यासाठीं डोकें बाहेर काढलें. त्याला मि. कीमर दिसले आणि कीमरनींही त्याला पाहिलें.

"काम कर आपलं!" ते बेनवर ओरडले; आणि धावत धावत वर येऊन त्यांनीं, काम टाकून खिडकीशीं आल्याबद्दल बेनची कानउघाडणी केली. त्याच-

बरोबर बेनला त्यांनीं नोटिसही देऊन टाकली; कांहीं आठवड्यांच्या आंत बेनला जावें लागणार होतें.

"मी आत्तांच जातों कीं!" बेन गर्वभरानें ओरडला; आणि आपली हॅट डोक्यावर दाबून बसवून, तो आपलें सामान घ्यायलाही न थांबतां तिथून निघून गेला.

त्या रात्रीं, सॅम्युएल कीमरकडे काम करणाऱ्या तरुणांपैकीं ह्यू मेरिडिथ नांवाच्या इसमानें बेनची तिथली चीजवस्त गोळा करून त्याला आणून दिली. बेनचा फार निरुत्साह झाला होता; आणि बॉस्टनला परत जाऊन पुन्हा सर्व गोष्टींचा श्रीगणेशा करण्याचे विचार त्याच्या मनांत घोळूं लागले होते. बेनसारखा मित्र गमावण्याची कल्पना ह्यूला असह्य झाली. तो म्हणाला, "आपण दोघांनीं मिळून छपाईचा धंदा सुरू केला तर?"

"पण माझ्याजवळ पैसे नाहींत!" बेन एक निःश्वास टाकून म्हणाला. त्याच्या मनांत आलें—'पैसे नाहींत' या एका विवंचनेनें, आपल्याला आठवतें आहे तेव्हांपासून आपला जणूं पिच्छा पुरवला आहे!

"नसतील, पण बाबांच्याजवळ आहेत" मेरिडिथ म्हणाला. "ते कदाचित् देतील आपल्याला. मी पैसे घालतों; तूं तुझं ज्ञान दे."

ही कल्पना इतकी खूष करणारी होती कीं तिला नकार देणें बेनला शक्य नव्हतें. ह्यूनें वडिलांना विचारलें. त्यांनीं जेव्हां संमति दिली, तेव्हां पुढच्याच जहाजावरून छपाईयंत्र नि टाईप यांची मागणी इंग्लंडला रवाना झाली. पण त्या काळीं जहाज इंग्लंडला पोचायला खूप वेळ लागायचा. सर्व गोष्टी जमून सुरवात करायला त्यांना कित्येक महिने लागले असते.

दरम्यान मि. कीमरकडे, न्यू जर्सी वसाहतीसाठीं कागदी चलन छापण्याचें एक काम चालून आलें होतें. त्यांनीं बेनला, झालें गेलें विसरून जा, क्षमा कर नि पुन्हा कामावर ये.' अशी विनंती केली. ह्यू मेरिडिथला यामुळें आनंद झाला. कारण कराराप्रमाणें ॲप्रेंटिस म्हणून त्याला आणखी किती तरी महिने कीमरकडे राहावें लागणार होतें; आणि पुन्हा बेनलाही काम नव्हतें, पैशाची जरूर होती. अशा रीतीनें सॅम्युएल कीमरकडे तिसऱ्यांदा बेन कामाला राहिला.

या कामाच्या वेळीं बेननें एक महत्त्वाची गोष्ट केली. ती म्हणजे तांब्याच्या प्लेटवर छापण्याचें पहिलेंच छपाईयंत्र अमेरिकेंत तयार केलें. न्यू जर्सीतल्या नोटांसाठीं नक्षीचा नमुना त्यानेंच तयार केला आणि त्या नक्षीप्रमाणें प्लेटवर कोरीव काम केलें. तो आणि कीमर दोघे मग बर्लिंग्टनला गेले. तिथें न्यू जर्सी

असेंब्लीचें अधिवेशन चालू होतें. न्यू जर्सीच्या नोटा त्यांनीं त्याच ठिकाणीं छापून दिल्या आणि असेंब्ली त्या कामावर खूष झाली. फ्रँकलिनला तिथें आणखी बरेच मित्र मिळाले. असेंब्लीचे सभासदही मग त्याला आपल्याबरोबर भोजनाला घरीं घेऊन जाऊं लागले; बायकांमुलींशीं ओळख करून देऊं लागले.

हें काम पुरें झाल्यानंतर लवकरच इंग्लंडहून मि. मेरिडिथनीं मागवलेला प्रेस, टाईप वगैरे सामान फिलॅडेल्फियांत येऊन थडकलें. ह्यू आणि बेन यांनीं शक्य तेवढ्या त्वरेनें मि. कीमर यांच्याकडून आपली सुटका करून घेतली आणि स्वतःचें दुकान मार्केट स्ट्रीटवर थाटलें. त्यांना पहिलें गिऱ्हाईक मिळालें तो एक शेतकरी होता; त्याला कांहीं तरी छापून घ्यायचें होतें. म्हणून तो रस्तोरस्तीं भटकत होता. त्याला यांनीं गांठून दुकानांत आणलें. त्याच्याकडून पांच शिलिंग मिळाले. बेन म्हणतो कीं, 'आपल्याला मिळालेली ही सर्वांत बहुमोल रक्कम होय!'

मेरिडिथ आणि फ्रँकलिन यांना फिलॅडेल्फियांत दोन प्रतिस्पर्धी होते. एक अँड्र्यू ब्रॅडफोर्ड—हा सर्व सरकारी छपाई करीत असे. दुसरा म्हणजे त्यांचा पूर्वींचा मालक कीमर. फ्रँकलिन आणि मेरिडिथनीं त्यांचें काम सोडल्यानंतर मि. कीमर अधिकाधिक कर्जांत बुडत गेले आणि जास्तच भांडखोर बनले. शेवटीं त्यांना आपलें वर्तमानपत्र विकावें लागलें आणि मग छपाईचा धंदाही विकावा लागला. बेनच्या हाताखालीं शिकून तयार झालेल्या एका तरुणानेंच तो विकत घेतला.

बेननें स्वतः तें वर्तमानपत्र विकत घेतलें. त्याला त्यानें 'पेनसिल्व्हॅनिया गॅझेट' असें नांव दिलें. या वर्तमानपत्राचा मुद्रक तर तो होताच; पण शिवाय लेखक, बातमीदार, संपादक आणि जाहिरात प्रचारक ही तोच होता. त्यानें एक महत्त्वाची गोष्ट केली ती ही, कीं पेनसिल्व्हॅनिया वसाहतींत राहणाऱ्या लोकांच्या स्थानिक वार्ता द्यायला त्यानें सुरवात केली. त्या काळांत ही एक नवलाईच होती. सर्व बातम्या तोच लिहीत असे, किंवा पुन्हा लिहून काढीत असे. टोपणनांवांनीं तो संपादकाला—म्हणजे स्वतःला—पत्रें लिही आणि मग स्वतःच त्या पत्रांचीं उत्तरें लिही. कांहीं गमतीदार लेखही तो लिही आणि जाहिरातीसुद्धा तोच लिही. त्याला अधिकाधिक वाचक आणि अधिकाधिक जाहिरातदार मिळूं लागले.

'गॅझेट' ला महत्त्व येऊं लागलें तशी बेनचा धंद्यांतला प्रतिस्पर्धी अँड्र्यू ब्रॅडफोर्ड याला अशी चिंता वाटूं लागली कीं, बेन आपला सर्व धंदा हिरावून घेईल. मि. ब्रॅडफोर्ड हे पोस्टमास्तरही होते; त्यांनीं बेनचें वर्तमानपत्र घरोघरीं

पोचवायला पोस्ट ऑफिसच्या शिपायांना बंदी केली. बेनला वाटलें, हा शुद्ध अन्याय आहे आणि मग त्यानेंही मागेंपुढें न पाहतां टपालवाल्या शिपायांशीं गुप्त करार केला आणि आपलें काम करण्याबद्दल त्यांना पैसे देऊं केले. बेन फ्रँकलिनच्या 'पेनसिल्व्हॅनिया गॅझेट' मधूनच पुढें सुप्रसिद्ध 'सॅटरडे ईव्हिनिंग पोस्ट' जन्माला आलें. तें आज वर्तमानपत्राच्या कोणत्याही विक्रेत्याकडे मिळूं शकतें.

यानंतर बेननें केलेली दुसरी गोष्ट म्हणजे असेंब्लींतलीं कांहीं भाषणें विनामूल्य छापणें. त्याची छपाई अँड्र्यू ब्रॅडफोर्डपेक्षां इतकी सरस होती कीं असेंब्लीच्या सभासदांच्या ती गोष्ट लक्षांत आल्याशिवाय राहिली नाहीं. त्यामुळें त्यानें नि ह्यू मेरिडिथनें आपला धंदा सुरू केल्यापासून अवघ्या दोनच वर्षांनीं फ्रँकलिन पेन-सिल्व्हॅनिया वसाहतीचा सरकारी मुद्रक बनला. त्यानंतर लवकरच स्वतः कर्ज काढून बेननें ह्यू मेरिडिथची भागी विकत घेतली. कर्जाचा भला दांडगा बोजा अंगावर घेऊन बेननें मग स्वतःच्या हिंमतीवर स्वतंत्र मार्ग धरला.

बेनला त्या काळीं किती कष्ट करावे लागत याची आज कोणाला माहिती नाहीं. पण बेन स्वतः सांगतो—"मासे धरायला किंवा शिकारीला मी कधींसुद्धा गेलों नाहीं." आपलीं बहुमोल पुस्तकें वाचायलाही त्याला फारसा वेळ मिळत नसे. आपल्या वर्तमानपत्रासाठीं लागणारा कागद विकत घेऊन तो हातगाडींत घालून बेन स्वतः रस्त्यातून ढकलीत आणायचा. म्हणजे तो गाडीवालाही होता. त्यानें स्टेशनरी मालाचें एक दुकान घातलें होतें. म्हणजे तो व्यापारीही होता.

बेन फ्रँकलिन सव्वीस वर्षांचा झाल्यावर त्यानें 'पुअर रिचर्डस् आल्मानॅक' ची पहिली प्रत छापली. 'पुअर रिचर्ड' चें नांव आजही लोक घेत असतात आणि इंग्रजी भाषेंतले जे कांहीं सुप्रसिद्ध वाक्प्रचार आणि म्हणी आज आपल्या कानांवर पडतात त्यांचें पहिल्यानें संकलन बेंजामिन फ्रँकलिननेंच आपल्या 'पुअर रिचर्डस आल्मानॅक' मध्यें केलें हें आपण लक्षांत ठेवलें पाहिजे.

'पुअर रिचर्डस् आल्मानॅक' जेव्हां प्रथमच 'रिचर्ड सॉंडर्स' या नांवावर प्रसिद्ध केलें गेलें तेव्हां वासाहतिक अमेरिकेंत आल्मानॅक किंवा 'संसार चोपड्या' हा पुस्तकांचा सर्वांत लोकप्रिय प्रकार होता. जवळजवळ प्रत्येक घरांत—जिथें दुसरें कोणतेंही छापील साहित्य नसे अशा घरींसुद्धा—बहुधा एखादें आल्मानॅक सांपडायचेंच.

'आल्मानॅक' म्हणजे त्या काळचीं हवामानपत्रकें असत. त्यांत हवेचा अंदाज दिलेला असे; चंद्राच्या कला आणि भरती ओहटीचें मान वगैरेही असे. शिवाय

कोडीं, चुटके, छोटया कविता, म्हणी, विचित्र खऱ्याखुऱ्या घटना, सैंपाकाचे पदार्थ, बाग कशी करावी यायाबद्दलच्या सूचना, लोकभ्रम आणि अशाच अनेक प्रकारच्या गोष्टींची खिचडी असे. पुष्कळ मुलें आल्मानॅकवरूनच वाचायला शिकत आणि त्याच्या कोऱ्या मार्जिनमध्यें लोक आपली रोजनिशी लिहीत, टिपणें लिहीत; कारण कागद क्वचितच कोणाजवळ असे.

'आल्मानॅक' बेननें शोधून काढलें असें नाहीं. पुष्कळांनीं, ब्रॅडफोर्ड नि कीमर यांनींसुद्धां त्याच्या आधीं आल्मानॅक छापलें होतें. आल्मानॅक हिंवाळ्याच्या प्रारंभीं झाडांचीं पानें झडूं लागलीं म्हणजे प्रसिद्ध होत; आणि त्यांत पुढल्या वर्षाच्या हवामानाचें भविष्य दिलेलें असे. 'पुअर रिचर्ड' उशिरा निघालें. पहिला अंक १९ डिसेंबर १७३२ रोजीं छापखान्यांतून बाहेर पडला; आणि प्रतीला पांच पेन्स या दरानें विकला गेला. नूतन वर्षदिन उगवण्याच्या आंत त्याच्या तीन आवृत्त्या छापल्या गेल्या आणि या क्षेत्रांतल्या सर्व प्रतिस्पर्ध्यांना त्यानें मागें टाकलें. याला पुष्कळ अंशीं बेंजामिन फ्रँकलिनचें लिखाण व विचारच कारणीभूत झाले.

'पुअर रिचर्ड' ची आणि त्यामुळें बेनचीही भरभराट झाली. त्यानें सर्व देणीं फेडून टाकलीं आणि तो श्रीमंत नि यशस्वी बनला. दर वर्षी 'पुअर रिचर्ड्स् आल्मानॅक' च्या जास्त जास्त प्रती खपूं लागल्या आणि अखेरीस वर्षाकांठीं दहा हजार लोकांना 'पुअर रिचर्ड' काय म्हणतो तें जाणण्याची जिज्ञासा वाटूं लागली.


'पुअर रिचर्डस आल्मानॅक' बरोबरच 'पेनसिल्व्हॅनिया गॅझेट' लाही कीर्ति मिळाली. शेवटीं तर वसाहतींमधलें तें सर्वांत महत्त्वाचें वर्तमानपत्र बनलें आणि लोकांना झटपट बातम्या मिळाव्यात म्हणून त्याचे अंक वांटण्यासाठीं बेननें घोडेस्वार भाड्यानें ठेवलें.

बेन फ्रँकलिननें दुसऱ्या अनेक गोष्टी केल्या, तरी स्वतःला तो 'छपाईकाम करणारा' च समजत असे. फ्रान्सच्या दरबारांत वकील म्हणून राहिल्यानंतर त्यानें आपलें मृत्युपत्र लिहिलें, त्याची सुरवात त्यानें अशी केली—

"मी, बेंजामिन फ्रँकलिन, मुद्रक—"

मुद्रण हाच त्याचा व्यवसाय होता.

# ६



## सच्छील नागरीक

बेन फ्रँकलिनला धंद्यांत पैसे मिळूं लागतांच, सर्वांच्या भल्यासाटीं ज्या कित्येक गोष्टी करायच्या असतात तिकडे लक्ष द्यायला त्याला फुरसत मिळाली. ह्या वेळ-पर्यंत त्यानें आपली प्रिया डीबोरा हिच्याशीं लग्न केलें होतें आणि फिलॅडेल्फिया हेंच आपलें घर मानून तो आतां राहूं लागला होता.

त्या काळच्या बहुतेक छापखानेवाल्यांप्रमाणें तो गजबजलेल्या बाजारपेठेंत आपल्या छपाई दुकानाच्या वरच राहात असे; आणि त्याचें घर मुलांनीं, नाते-वाइकांनीं अन् दुकानांत काम करणाऱ्या नोकरांनीं व शिकाऊ उमेदवारांनीं भरलेलें असे. त्यांतच प्रसंगवशात् राहायला आलेले मित्र असत. एकंदरींत मोठा मुखी गोतावळा होता; पण एवढें मोठें घर स्वच्छ ठेवणें फार कठीण जात असे.

फिलॅडेल्फियाच्या लोकांना धान्य वगैरे घेण्यासाटीं बाजारांत येतांना कसें चिखल तुडवीत यावें लागे तें बेननें पाहिलें होतें. शेवटीं त्यानें बाजारपेठेच्या मध्यावर एक पायरस्ता बनवून घेतला. मग भाषणें करून आणि 'गॅझेट' मध्यें

संपादकीय लेख लिहून त्यानें दगडी रस्ता बांधवून घेतला. त्यामुळें लोकांना पाय कोरडे ठेवून जातां येऊं लागलें; आणि घरांतही चिखलाचे पाय घेऊन येणें मग बंद झालें.

एवढी कामगिरी पुरी होते न होते तों त्याला असें आढळलें कीं रस्त्या-वरून घोडागाडी चालली कीं ती बाजूच्या पायरस्त्यावर चिखल उडवते; आणि मग लोकांच्या पायांना तो चिखल लागून घरांत जातो. याचा बंदोबस्त काय करावा म्हणून फ्रँकलिन विचार करतो आहे तों एका गरीब माणसानें आठवड्यांतून दोन वेळां रस्ता झाडायचें कबूल केलें; त्यासाठीं त्या रस्त्यावरच्या सर्व घरांतून प्रत्येकीं सहा पेन्स गोळा करून त्याला द्यावेत अशी योजना होती. यासंबंधीं फ्रँकलिननें एक कागद लिहून तयार केला आणि तो आपल्या सर्व शेजाऱ्यांकडे पाठवला. मग तो स्वतःही जाऊन सर्वांना भेटला आणि या कामाकरतां प्रत्येकीं सहा पेन्स वर्गणी द्यावी अशी त्यानें विनंती केली. अमेरिकेंत रस्ते झाडण्याची प्रथा अंमलांत आली ती बहुधा याच वेळीं प्रथम!

नुसते रस्ते झाडून बेनचें समाधान झालें नाहीं. त्यानें एक म्हातारी बाई ठरवली—तिनें रस्ता तर झाडायचाच, पण शिवाय सर्व कचरा नि धूळ गोळा करून तो गटारांतून वाहून जाईल असें करायचें असें ठरलें. पुढें चिखल नि घाण वाहून नेण्यासाठीं घोड्याच्या गाड्यांची योजना बेननें केली. कचऱ्याच्या गाड्या नि 'सॅनिटेशन' किंवा स्वच्छता खातीं आतां सर्वांच्या परिचयाचीं झालीं आहेत; त्यांचें महत्त्वही सर्वांना पटलेलें आहे; पण त्याची सुरवात ही अशी झाली.

फिलडेलफियांतले रस्ते दगडी करण्याविषयीं पहिलें बिल तयार करणारा बेन फ्रँकलिनच होय. बाजार पेठेंतली ती स्वच्छता व नीटनेटकेपणा पाहून फिलॅडेलफियांतल्या जनतेला एकदम उत्साह आला आणि या कामासाठीं त्यांनीं खुषीनें कर द्यायचें कबूल केलें.

फिलॅडेलफियाच्या रस्त्यांतून दिव्यांची सोय प्रथम केली ती बेननें नव्हे. पण त्यांत सुधारणा मात्र त्यानें घडवून आणली. त्यानें एक नवीन प्रकारचा रस्त्यावरचा दिवा शोधून काढला. त्याला एकच गोल चिमणी असण्याऐवजीं चार बाजूंना चार लहान तावदानें होतीं. कांहीं शहरांतून अजूनही असे चौकोनी दिवे आढ-ळतात. अशा दिव्यांमुळें ज्योतीला वर पर्यंत चढायला वाव मिळाला आणि दिवा स्वच्छ राहूं लागला, जास्त उजळपणें प्रकाशूं लागला. शिवाय, असे दिवे दुरुस्त करायला जास्त सोपे होते. चौकोन चिमणीचें एखादें तावदान फुटलें तर सबंध दिवा

फेकून देण्याची जरूर पडत नसे; एक कांच तेवढी नवी बसवण्यानें काम भागे.

त्या काळांत आग लागणें म्हणजे केवढी भीतिदायक आपत्ति असे याची आज आपल्याला कल्पना येणें कठीण आहे. कारण तेव्हां पाणी पुरवठ्याची व्यवस्था नव्हती, आगीचे यंत्र नव्हते, नुसत्या शिडीवाल्या गाड्यासुद्धा नव्हत्या. फ्रँकलिनच्या तरुणपणीं फिलॅडेल्फियांत कांहीं पेटलें तर तें राख होईपर्यंत जळत राही— इतकेंच नाहीं, तर राख होण्यापूर्वी तें आसपासही सर्वत्र भडका उडवून देई.

बेनला यामुळें फार भीति वाटे. त्यानें स्वतःला एक पत्र लिहिलें, त्याच्या खालीं 'एक जुना नागरीक' म्हणून सही केली आणि तें आपल्या वृत्तपत्रांत छापलें. त्या पत्रांत आगीचें निवारण करण्यासाटीं त्यानें कांहीं नियम दिले होते. एक नियम असा होता कीं लोकांनीं एका खोलींतून दुसऱ्या खोलींत जळते निखारे नेतांना उघडे नेऊं नयेत; कोळशांचें पात्र पक्कें झाकून मग न्यावेत.

नंतर त्यानें अशी सूचना केली कीं फिलॅडेल्फियानें बॉस्टनपासून धडा घ्यावा आणि आग विझवण्यासाठीं एक स्वयंसेवक दल उभारावें. फ्रँकलिन हीं जीं स्वतःला पत्रें लिहित होता, त्यांमुळें स्फूर्ति येऊन त्यानें स्वतःच 'युनियन फायर कंपनी' नांवाची अशा प्रकारची संघटना तयार केली. तिचे तीस सभासद होते; प्रत्येकाजवळ स्वतःची कातड्याची बादली आणि किनतानाची पिशवी असे; त्यांत सामान भरून घेतां येई. या पहिल्या 'कंपनीं'त इतके लोक सामील झाले कीं ती संख्या फारच मोठी झाली नि आवाक्याबाहेर गेली. तेव्हां पुढें आणखी अशा कंपन्या तयार करण्यांत आल्या.

लवकरच आगविझव्या स्वयंसेवक दलांचें एक जाळेंच फिलॅडेल्फियांत पसरलें; आणि आगींच्या बाबतींत तरी तें जगांतलें सर्वांत सुरक्षित शहर ठरलें. फिलॅडेल्फियांत ज्याची ज्याची म्हणून मालमत्ता होती अशा जवळजवळ प्रत्येक माणसानें स्वतःसाटी एक चामड्याची बॅग विकत घेऊन 'कंपनीं'त नांव दाखल केलें. मासिक सभेला एखादा सदस्य गैरहजर राहिला कीं कंपनी त्याला थोडासा दंड द्यायला लावी. या दंडाच्या रकमांतून पुढें शिडी व हूक असलेल्या गाड्या विकत घेण्यांत आल्या.

फिलॅडेल्फियांतलें पोलीस खातेंही बेनला समाधानकारक वाटलें नाहीं. एकदा रात्रींच्या वेळीं तो सहज गंमत म्हणून रस्त्यांतून हिंडायला गेला असतां त्याला असें आढळलें कीं पाहऱ्यावर नेमलेल्या बहुतेक रक्षकांना दारूच्या बाटलींत जेवढा रस वाटतो तेवढा लोकांचें रक्षण करण्याच्या कामांत वाटत नाहीं. तेव्हां

वेननें अशी सूचना केली कीं असे कोणी तरी रक्षक निवडून त्यांच्यावर अवलंबून राहण्यापेक्षां नियमित पगारी पोलीस ठेवलेले चांगले. हे रक्षक स्वतःच कधीं कधीं आपलें काम करण्यासाठीं भाड्याचीं माणसें नेमीत आणि ज्या चोर दरोडेखोरांना पकडण्याचें त्यांचें काम असे त्यांच्यापेक्षां कांहीं हीं माणसें अधिक चांगलीं नसत.

आपल्या लहानपणापासून वेन पुस्तकांचा शौकिन होता; आणि बहुतेक लोकांना पुस्तकें मिळवणें किती कठीण जातें याची त्याला कल्पना होती. या बाबतींत त्यानें बराच विचार केला. तेव्हां ज्यांना पुस्तकें वाचणें आवडतें त्यांना जेणेंकरून वाचायला जास्त पुस्तकें मिळूं शकतील अशी एक योजना त्याला सुचली. वेननें एक मंडळ किंवा क्लब स्थापन केला; त्याला 'जंटो' असें नांव दिलें. या 'जंटो'चे सर्व सभासद आपलीं पुस्तकें आपसांत वांटून वाचीत. उसनीं देऊन आणि घेऊन हीं पुस्तकें सर्वांना दिलीं जात आणि अशा रीतीनें मंडळांतल्या प्रत्येकाला पुस्तक वाचायला मिळे. पण सभासदांचें तेवढ्यानें समाधान होईना. त्यांना आणखी पुस्तकें हवीं होतीं.

वेननें अशी सूचना मांडली कीं 'जंटो'च्या प्रत्येक सभासदानें पुस्तकें विकत घेण्यासाठीं कांहीं रक्कम वर्गणी म्हणून द्यावी. इतकेंच नाहीं तर फिलॅडेल्फियांतल्या दुसऱ्याही प्रत्येक नागरिकाला—ज्याला ज्याला म्हणून वाचण्याची इच्छा असेल त्याला—'जंटो' चे सभासद होण्याबद्दल पाचारण करावें. पन्नासजणांनीं सह्या केल्या आणि मग त्यांनीं लंडनहून पुस्तकांची लांबलचक यादी मागवली. हीं पुस्तकें आलीं तेव्हां 'जंटो'च्या बैठकीच्या खोलींत तीं ठेवण्यांत आलीं—कोणींही येऊन तीं वाचावींत. मात्र सभासदानांच तीं घरीं न्यायला मिळत. अमेरिकेंतल्या फिरत्या वाचनालयांची—सर्क्युलेटिंग लायब्ऱ्यांची—सुरवात अशा रीतीनें झाली.

यांतली पहिली लायब्ररी खरोखरच फिरती होती; कारण पुस्तकें केवळ हात बदलीत असें नाहीं, तर जागासुद्धा बदलीत—वेगवेगळ्या ठिकाणीं ठेवलीं जात. कधीं कधीं तीं 'जंटो'च्या बैठकीच्या खोलींत असत, तर कधीं ग्रंथपाल म्हणून विनामूल्य काम करणाऱ्या निरनिराळ्या सभासदांच्या घरीं ठेवलेलीं असत. वेननें पुस्तकांची एक यादी छापून काढली आणि ती सभासदांना देऊन टाकली.

वेन नुसता खऱ्या अर्थानें पुस्तकांतला किडा होता असें नाहीं, तर पत्रें लिहिण्याच्या बाबतींतही त्याचा हात धरणारा क्वचितच असेल. त्याला पत्रें आवडत

आणि अमेरिकेंत आपण लिहिलेल्या पत्रांना उत्तर यायला एवढा उशीर कां लागावा याची त्याला विवंचना वाटत असे. याचा परिणाम म्हणून त्यानें तिथल्या टपाल-पद्धतीचें एकदा निरीक्षण केलें आणि त्यांतले दोष तो हुडकून काढूं लागला.

टपाल वाहतुकींत त्यानें एवढें लक्ष घातल्यामुळें शेवटीं त्याला फिलॅडेल्फि-यांतल्या सर्व टपालविषयक हालचालींचे नियंत्रक नेमण्यांत आले. या वेळीं त्यानें टपाल वाहतुक इतकेंच नाहीं तर तद्विषयक रोजकीर्द यांच्या पद्धतीतीच आमूलाग्र पुनर्घटना केली. फिलॅडेल्फिया व न्यूयॉर्क यांच्या दरम्यान टपालाची आठवड्यां-तून एकदाच नेआण होई, त्याऐवजीं ती तीनदा व्हावी अशी त्यानें व्यवस्था केली. फिलॅडेल्फियाहून बॉस्टनला पत्र जाऊन त्याचें उत्तर तीन आठवड्यांत मिळण्याची शक्यता जेव्हां त्याच्या प्रयत्नांनीं निर्माण झाली तेव्हां त्याला आपण मोठा विजय मिळवल्यासारखें वाटलें.

अमेरिकन वसाहतींतले टपाल वाहतुकीचे जे जे मार्ग होते ते सर्व फ्रँकलिन घोड्यावर बसून आणि मोठा खडतर प्रवास करून पाहून आला.

ठिकठिकाणच्या पोस्टमास्तरांना त्यानें आपले हिशेब व्यवस्थित कसे मांडावेत तें समजावून सांगितलें आणि त्याच्या अडचणींत त्यांना मार्गदर्शन केलें. चार वर्षां-तच्च त्यानें वसाहतींतली टपालपद्धति किफायतशीर बनवून टाकली आणि लवकरच्च या वसाहती इंग्लंडकडे नफ्याची रक्कम पाठवूं लागल्या.

वसाहतींनीं स्वातंत्र्याचा लढा सुरू केल्यावर जेव्हां 'कॉंटिनेंटल कॉंग्रेस'चें अधिवेशन भरलें तेव्हां बेनची पोस्टमास्तर जनरल म्हणून नेमणूक झाली. त्याला वार्षिक एक हजार डॉलर तनखा मिळे, तो सर्व त्यानें जखमी सैनिकांना मदत म्हणून देऊन टाकला. 'रॉयल पोस्ट ऑफिस' लवकरच्च बंद झालें आणि फ्रँकलिननें नवी टपाल पद्धति सुरू केली. तीच आजच्या अमेरिकन 'मेल सर्व्हिस'ची सुरवात होय. पोस्टाचीं पहिलीं तिकिटें जेव्हां निघालीं तेव्हां पांच सेंटच्या तिकिटावर बेनचा मुखवटा छापण्यांत आला.

जें टपाल नेण्यासाटीं लोक पोस्टांत येत नसत, तें घरोघर पोचवण्याची नवी पद्धत बेननें अमलांत आणली. ज्या पत्रांवर कोणींच हक्क सांगितला नसेल त्यांच्याबद्दल बेन 'गॅझेट' मध्यें जाहिरात देई. त्यानंतर तीन महिने वाट पाहून तेवढ्या वेळांतही त्या पत्रांना मागणी आली नाहीं तर तीं सर्व फिलॅ-डेल्फियांतल्या एका कोठींत बंद केलीं जात. अशा रीतीनें 'डेड लेटर ऑफिस' चा पाया घातला गेला.

फ्रँकलिन स्वतःचें वर्तमानपत्र 'गॅझेट' घोडेस्वारांकरवीं पोंचवीत असे. पण तेंही आतां त्यानें पोस्टांतून पाठवायला सुरवात केली. सर्वांत महत्त्वाची गोष्ट त्यानें केली ती ही कीं प्रत्यक्ष टपाल नेणाऱ्या दूतांना व पोस्टमास्तरांना आपल्या कामाचें महत्त्व त्यानें पटवून दिलें; आणि टपाल शेवटपर्यंत सुरक्षित जाणें कसें अत्यावश्यक आहे तें त्यांना समजावून दिलें. नव्या टपालवाहतुकींतली त्वरा आणि सुरक्षितपणा यांमुळें ती अतिशय लोकप्रिय झाली; कारण त्यामुळें तेराही वसाहतींचे दूर दूर पसरलेले मुलूख जवळ आल्यासारखे झाले. फ्रँकलिननें शक्य कटींत आणलेल्या या पोस्टाच्या पद्धतीमुळें विखुरलेल्या वसाहती एकत्र सांधल्या गेल्या.

फ्रँकलिनला मनस्ताप देणारी दुसरी एक गोष्ट म्हणजे फिलॅडेल्फियांतील लष्करी संरक्षणाचा अभाव. लगेच त्यानें नागरिकांना स्वयंसेवक म्हणून नोंदवून घ्यायला सुरवात केली. आज नागरिक संरक्षणासाठीं आपण सैनिकदलें उभारतों तसाच हा प्रकार होता. एकदा फ्रान्स आणि स्पेनमधून आलेल्या चांचे लोकांनीं डिलावेर प्रांतांतील न्यूकॅसलजवळच्या दोन मळ्यांवर हल्ला केला आणि वेस्ट इंडीजमधून आलेलें एक जहाज पकडून त्याच्या कप्तानाचा खून केला. या प्रसंगा-मुळेंच अशा संरक्षणाची किती जरूर आहे तें त्याच्या लक्षांत आलें.

लगेच फ्रँकलिन कामाला लागला. बंदुका व संरक्षक फौजांसाठीं जरूर तो पैसा मंजूर करावा म्हणून त्यानें असेंब्लीची मनधरणी केली; पण विधिमंडळांत क्वेकर पंथीयांचें बहुमत होतें आणि ते लोक शांतताप्रेमी होते कोणत्याही देशाशीं त्यांचें भांडण नव्हतें. क्वेकर लोक पैसे देईनात, म्हणून श्रीमंत व्यापारीही देईनात. खरें म्हणजे कोणालाही या विषयाबद्दल आस्था वाटेना. तेव्हां फ्रँकलिननें जनतेपुढेंच हा प्रश्न मांडला आणि जनतेला मात्र आस्था वाटली.

'रॉबर्ट्स् कॉफी हाऊस' मध्यें वेननें जी पहिली मोठी जाहीर सभा भरवली तींत १२०० लोकांनीं संरक्षक दलाचे सभासद म्हणून आपण होऊन आपलीं नांवें नोंदवलीं. या संस्थेचा विस्तार लवकरच प्रांतभर झाला आणि तिला दहा हजार सदस्य मिळाले. त्यांनीं आपल्या तुकड्या किंवा 'कंपन्या' तयार केल्या आणि अशा रीतीनें एक सुसज्ज सैनिकदल तयार झालें. स्त्रियांनीं आपसांत वर्गण्या गोळा केल्या आणि वेगवेगळ्या 'कंपन्यां' साठीं कशिदाकाम केलेले किंवा ब्रीदवाक्यें रंगवलेले बावटे तयार केले.

आपल्या लोकांना शस्त्रसज्ज करण्यासाठीं फ्रँकलिननें न्यूयॉर्कच्या गव्हर्नरांकडून

धुण्याचीं यंत्रें कपडे धूत आहेत, आणि पेनीसिलिन लोकांचे रोगनिवारण करीत आहे हें दृश्य पाहून बेनला मुळींच आश्चर्य वाटलें नसतें.

बेंजामिन फ्रँकलिनला अमुक एका विषयाची गोडी नव्हती असें म्हणतां येणार नाहीं. आणि आपण पाहिलेंच, कीं भविष्यकाळांत काय घडणार आहे याबद्दल तर त्याला आस्था होतीच; पण शिवाय त्याच्या समकालीन लोकांचें जीवन सुधाण्याच्या मार्गांचाही तो सदैव विचार करीत असे.

फिलॅडेल्फियांतला अत्यंत कडक हिंवाळा हा असाच त्याच्या विचारांचा एक विषय होता. कधीं कधीं, धुरानें काळवंडलेल्या आपल्या शेकोटीसमोर तो बसलेला असे तेव्हां, आपलें तोंड अन् गुडघे एकीकडे पोळत असतांना दुसरीकडे आपली पाठ मात्र गारठलेली आहे ही गोष्ट त्याच्या लक्षांत येई आणि हवा गरम करण्याची पद्धत सुधारण्याची वेळ आलेली आहे असें त्याला वाटे. हवा तापली कीं ती वर चढते आणि तिची जागा घेण्यासाटीं थंड हवा धावून येते हें त्यानें पाहिलें होतें. त्या काळच्या घरांतल्या शेकोट्या ही गोष्ट विचारांत घेऊन बांधलेल्या नसत. हवेला वर जाण्यासाटीं जें छिद्र असे तें लहान असे आणि असल्या शेकोटीपासून ऊब मिळण्याऐवजीं वारेंच जास्त लागे. तेव्हां कमी जळण वापरून जास्त उष्णता देईल अशी एक नवीन प्रकारची खुली भट्टी बनवण्याचा आराखडा त्यानें तयार केला.

फ्रँकलिननें ही भट्टी आपल्या स्वतःच्या घरांत बसवली. लवकरच त्याच्या हें लक्षांत आलें कीं आपल्या कुटुंबांतल्या मंडळींना—विशेषतः स्त्रिया वगैरे, घरीं राहणाऱ्या नि शेकोटीजवळ बसणाऱ्या माणसांना आतां सर्दी खोकल्याचा नि दांतदुखीचा त्रास पूर्वीपेक्षां कमी प्रमाणांत होतो.

त्याच्या सन्मित्रांपैकीं एकाकडे—रॉबर्ट ग्रेसकडे—लोखंडी ओतकामाची भट्टी होती. बेननें त्याला आपल्या शेकोटीच्या भट्टीचा नमुना दाखवला.

"असल्या कांहीं शेकोट्या तयार करून तूं लोकांना विकत कां नाहींस?" बेन म्हणाला. "मीं माझ्या बसण्याउठण्याच्या खोलींत ही अलीकडे वापरतों आहें आणि त्यामुळें पूर्वीच्या दुप्पट ऊब आतां वाटते अन् लाकडं मात्र पूर्वींच्या पावपट लागतात."

"मी त्या शेकोट्या बनवूं शकेन, पण विकणार कशा?" रॉबर्ट ग्रेस म्हणाला. "मी पडलों साधा घिसाडी!"

बेन म्हणाला, "मी गॅझेटमध्यें त्याच्याबद्दल थोडंसं लिहितों."

तो खालीं बसला आणि आपल्या लोखंडी शेकोटीचें लांबलचक वर्णन त्यानें लिहून काढलें. लेखांत सुरवातीला या शेकोटीमुळें खोलीला कशी ऊब येईल व माणसांना कसा आराम मिळेल तें दिलें होतें; उबेसाठीं लोकांना हल्लींच्या शेकोटींत मोठा जाळ पेटवावा लागतो आणि त्यामुळें त्यांची कातडी कशी सुकते, डोळे कसे निस्तेज बनतात अन् माणसें कशीं म्हातारी दिसूं लागतात याचें दिग्दर्शन त्यानें केलें होतें. पुढें असें म्हटलें होतें कीं 'फ्रँकलिन स्टोव्ह' मुळें असें होणार नाहीं. (यामुळें फिलॅडेल्फियांतल्या प्रत्येक स्त्रीला 'फ्रँकलिन स्टोव्ह्' विकत घ्यावा असें वाटूं लागलें!)

लेखाच्या उरलेल्या भागांत, ही भट्टी कशी वापरायची तें लोकांना समजेल अशा रीतीनें सांगितलें होतें. त्यानंतर त्याच्यापासून मिळणाऱ्या फायद्यांची एक यादी दिली होती आणि त्याला ज्या हरकती घेण्यांत येतील त्यांचा अगोदरच समाचार घेतला होता. नंतर कोणत्याही शेकोटीच्या जागेंत ही भट्टी कशी बसवावी तें सांगितलें होतें.

रॉबर्ट ग्रेसचा लोखंडी कामाचा कारखाना खुद्द फिलॅडेल्फियांत नव्हता, चेस्टर परगण्यांत होता. तेव्हां फ्रँकलिन ज्या पोस्ट ऑफिसांत अधिकारी होता तिथें त्यानें कांहीं शेकोट्या ठेवून दिल्या.

नंतर त्यानें 'गॅझेट' ऐवजीं स्वतंत्र पुस्तिकेंत आपला लेख छापला आणि ती पुस्तिका वांटायला सुरवात केली. या पुस्तिकेमुळें बरेंच कुतूहल निर्माण झालें आणि त्या वेळीं पेनसिल्व्हॅनियाचा गव्हर्नर थॉमस म्हणून होता त्यानें बेनला या फ्रँकलिन स्टोव्ह'चें पेटंट देऊं केलें. हेतु हा कीं दुसऱ्या कोणीं हा स्टोव्ह् विकण्याचा प्रयत्न करूं नये.

पण बेननें नकार दिला. तो म्हणाला, "दुसऱ्यांनीं लावलेल्या शोधापासून जसा आपण आपला फायदा करून घेतो तसाच आपल्या शोधापासून आपण दुसऱ्याचा फायदा करून दिला पाहिजे."

'फ्रँकलिन स्टोव्ह्' ही शेकोटीच्या पद्धतीमध्यें कितीतरी वर्षांत झालेली पहिली सुधारणा होय. जास्त आराम देणाऱ्या आणि खर्चांत बचत करणाऱ्या या पद्धतीमुळें लोकांना फारच आनंद वाटला. लवकरच 'फ्रँकलिन स्टोव्ह्' जिकडे तिकडे प्रचारांत आला (कांहीं ठिकाणीं आजही फ्रँकलिन स्टोव्ह् वापरलेले आढळून येतात.) वसाहतवाल्यांच्या आरोग्यांत त्यानें निस्संशय सुधारणा घडवून आणली आणि अशा प्रकारच्या 'स्टोव्ह्' किंवा 'भट्ट्यां'च्या डिझाइनवर त्यानें

जी छाप पाडली ती कित्येक वर्षे टिकली. युरोपमध्येंही 'फ्रँकलिन स्टोव्ह'चें फार कौतुक झालें आणि इंग्लंडमध्येंही त्याचें अनुकरण करण्यांत आलें. टस्कनीचा ग्रँड ड्यूक लिओपोल्ड याला दोन शेगड्या भेट म्हणून पाठवण्यांत आल्या असें इतिहासात नमूद केलें आहे.

उष्णतावाहनाच्या विषयांतली बेनची आस्था कधींही कमी झाली नाहीं. त्याला आराम आवडत असे; आणि स्वभावतः तो थंडवृत्तीचा होता. या बाबतींत आणखी काय काय सुधारणा करतां येतील तें पाहण्यासाठीं तो वरचेवर आपल्या धुराड्यांत डोकें घालून पाहात असे. 'धुराडीं कां धुरकटतात त्याची मीमांसा व त्यावरील उपाय' यासंबंधांत एक लांबलचक पत्र त्यानें म्हातारपणीं आपल्या एका शास्त्रज्ञ मित्राला लिहिलें. १७७१ च्या हिंवाळ्यांत, लंडनमध्यें राहात असतांना त्यानें कोळसे जाळण्याची एक नवीन प्रकारची शेगडी शोधून काढली. ही शेगडी त्यानें लंडनमध्यें आणि नंतर फिलॅडेल्फियांतल्या आपल्या घरांत वापरली. फ्रान्सला तो जेव्हां वकील म्हणून गेला तेव्हांही त्यानें ती शेगडी आपल्याबरोबर नेली.

बेंजामिन फ्रँकलिनचे शोध बहुधा त्याच्या निरीक्षणांतून निघालेले असत. एखादी गोष्ट जास्त चांगल्या प्रकारें कशी करतां येईल तें जाणून घेण्यासाठीं तो जें अवलोकन करी त्याचेंच तें पर्यवसान असे. पुष्कळदा तो ज्या निर्णयांना येऊन पोचे त्यामुळें त्याच्याकडून नवे शोध लागत किंवा त्याच्या आयुष्यांत दुसरा कोणी शोध लावी असें नाहीं. विचार केलेल्या सर्वच गोष्टी प्रत्यक्ष करण्याइतका त्याला वेळ होता कुठें? पण आज जी विज्ञानसृष्टि आपल्याला माहीत झालेली आहे तिच्या संबंधांत त्या काळीं इतक्या भ्रामक समजुती आणि अज्ञान होतें कीं लोकांना बेनचे पुष्कळसे विचार अश्रुतपूर्व असे वाटत.

एक दिवस तो फिरायला गेला असतां त्याला एक कुरण दिसलें. त्यांत मधल्या मधल्या कांहीं भागांतलें गवत जास्त हिरवें होतें.

'असं कां बरं असावं?' बेन स्वतःशीं नवल करूं लागला आणि त्यानें ठरवून टाकलें कीं आपण याचा छडा लावलाच पाहिजे.

त्याला असें आढळलें कीं 'जिप्सम' * विखरून त्या कुरणांत कांहीं अक्षरें काढलेलीं होतीं आणि नेमकीं तीं अक्षरें जिथें काढलीं होतीं त्या भागांत गवत हिरवें दिसत होतें.

---

* ज्याच्यापासून 'प्लास्टर ऑफ पॅरिस'चीं मऊ माती बनवतात ते अशुद्ध स्थितींतील खडे. —अनु.

"पिकांची सुधारणा करण्यासाठीं शेतांत जिप्सम वापरलें पाहिजे" वेन म्हणाला. बहुतेकांना वाटलें, याला वेड लागलें आहे. कृत्रिम खतांबद्दल त्यांनीं कधींहीं ऐकलेलें नव्हतें. अशी चीज, त्यांच्या मतें, असणेंच शक्य नव्हतें. पण ती किती महत्त्वाची गोष्ट आहे तें आज आपण जाणतोंच.

वादळें, गारठ्याचे वारे नि कीड यांविरुद्ध आपल्या पिकांचा शेतकऱ्यांना विमा उतरतां आला पाहिजे असेंही एक वेनचें मत होतें. त्यानें असली सूचना करावी एवढ्यामुळेंच लोक घाबरून गेले. परमेश्वरी शक्तीच्या विरुद्ध वागणें होतें हें! पण आज अशा प्रकारें विमा उतरणें ही अगदीं सामान्य गोष्ट झाली आहे.

पायीं फिरायला जाण्याचा त्याला जबरदस्त शौक होता आणि असें फिरतां फिरतांच त्याला कितीतरी कल्पना सुचत. एक दिवस एका ओढ्याच्या कांठानें तो चालला होता; तेव्हां एक जुनी, विणलेली टोपली ओढ्यांत पडलेली त्याला दिसली. ज्या गवतापासून विणून ती टोपली बनवलेली होती तें पाण्यांत रुजलें होतें आणि त्याला बारीक बारीक हिरवीं पानें फुटलीं होतीं.

"म्हणजे ही टोपली जिवंत आहे म्हणायची!" वेन म्हणाला आणि त्यांतल्या गवताच्या दोन काड्या काढून त्यानें घरीं नेल्या आणि वाढवल्या. हा कांहीं नवा शोध होता असें नाहीं. पण अमेरिका खंडांत 'विलो' नांवाच्या झाडांचें संवर्धन सुरू झालें तें तेव्हांपासूनच.

उन्हाळ्यांत फिलॅडेल्फिया फारच तापलेलें असे; आणि वेनला तर जास्तींत जास्त आराम कसा मिळवतां येईल ही चिंता त्यामुळें तो नेहमीं कांहीं ना कांहीं प्रयोग करीत राही. शेतांत कापणी करीत असलेल्या शेतकऱ्यांकडे पाहून त्यानें असें ठरवलें कीं घाम आल्यानें शरीराला थंडावा येत असावा. लगेच त्यानें एक प्रयोग केला. गरम पाणी, मध आणि शिरका एकत्र उकळून हें मिश्रण हवामान शंभर अंशांपर्यंत गेल्यावर तो प्याला. त्यामुळें त्याला सपाटून घाम आला, पण थंडही वाटलें.

काळ्या कापडावर उन्हाचा काय परिणाम होतो तें पाहण्यासाठींही त्यानें प्रयोग केले. ते त्यानें हिंवाळ्याच्या दिवसांत बर्फ पडलेलें असतांना केले. काळ्या, गडद निळ्या, फिकट निळ्या आणि पांढऱ्या कापडाचे चौकोनी तुकडे कापून त्यानें सूर्य किरण थेट पडतील अशा रीतीनें बर्फावर नेऊन ठेवले. काळ्या कापडाखालचें बर्फ ताबडतोब वितळलें आणि कापड बर्फाखाली बुडालें. गडद निळें कापड थोडें कमी बुडालें. फिकट निळ्या कापडाखालचें बर्फ फारच सावकाश व थोडें वितळलें

आणि पांढऱ्या कापडाखालचें बर्फ मात्र होतें तसें टणक राहिलें. यावरून बेनची खात्री झाली कीं फिका रंग उष्णतेचा प्रतिकार करतो. अर्थात् उन्हाळ्यांत फिक्या रंगाचे कपडे वापरणें जास्त श्रेयस्कर होय.

बेनला आराम मिळवण्याची जेवढी उत्सुकता असे तेवढीच आरोग्याबद्दलही असे. आणि या विषयावरही त्याला कितीतरी मनोरंजक कल्पना सुचल्या होत्या. त्याला असें आढळलें कीं विशिष्ट धातूंच्या संबंधांत काम करणाऱ्या लोकांना— उदाहरणार्थ, टाईप तयार करणारे, नळाची दुरुस्ती करणारे, कुंभार आणि चित्रकार यांना एकाच प्रकारचा रोग होत असतो. याची मीमांसा करतां त्याच्या एक गोष्ट लक्षांत आली; ती ही कीं हे सर्व कामगार पांढऱ्या शिशाचा वापर करीत असतात. म्हणजे शिसें विषारी असलें पाहिजे आणि शिशाचें काम जास्त काळ करणाऱ्या लोकांना विषबाधा होत असली पाहिजे. शिशापासून होणाऱ्या विषबाधेचें अनुमान करणारा बेन हाच पहिला मनुष्य होय. आणि तसें पाहिलें तर वैद्यकीशीं त्याचा संबंधही नव्हता!

बेन जसजसा मोठा होत चालला आणि त्याची दृष्टि अधू होत चालली, तशी त्याला दोन चष्म्यांची जरूर पडूं लागली. एक चष्मा तो वाचण्यासाटीं आणि जवळचें पाहण्यासाठीं वापरी; आणि दुसरा फिरायला जातांना वापरी. म्हणजे त्याला नेहमीं दोन चष्मे जवळ बाळगावें लागत. वाचतांना वापरण्याचा चष्मा तो जेवतांनाही लावीत असे. पण टेबलाच्या पलीकडे बसलेल्या माणसांचे चेहरे त्याला ओळखूं येत नसत. ही एक मोठी कटकटच होती. तेव्हां त्यानें आपले चष्मे लेन्सवाल्याकडे नेले आणि त्याचीं भिंगें कापवून घेतलीं. आणि एका चष्म्याचीं भिंगें खालच्या अर्ध्या भागांत व दुसऱ्या चष्म्याचीं भिंगें वरच्या अर्ध्या भागात बसवलीं. खालच्या कांचेंतून पाहिलें कीं आतां त्याला ताटांतलें दिसे. वरच्या कांचेंतून पाहिलें कीं जेवणारी मंडळी दिसत. आपल्याला आज माहीत असलेल्या दोन भिंगी चष्म्यांचा प्रारंभ अशा रीतीनें झाला.

फ्रँकलिनला सर्दीचा फार त्रास होई; त्यामुळें सर्दीच्या कारणांबद्दल त्याला जिज्ञासा उत्पन्न झाली. तो म्हणे, "कडक हिंवाळ्याच्या दिवसांत मीं प्रवास केलेला आहे; आणि कधीं कधीं इतकी कडाक्याची थंडी अनुभवलेली आहे कीं तिनें मी गोठून गेलों नाहीं हेंच भाग्य समजावें. पण तरीसुद्धा मला सर्दी किंवा पडसें झालें नाहीं. हवेंतल्या आर्द्रतेबद्दल म्हणाल तर, मी रोज संध्याकाळीं दोन तीन तास असा नेमानें पंधरा दिवस नदींत डुंबलों आहें—अर्थात् आर्द्रतेनें जर

सर्दी होत असेल तर मी एवढा वेळ ओलाचिंब राहिलों असतां मला ती अवश्य व्हायला पाहिजे. पण मला कधींही सर्दी झाली नाहीं. निरीक्षणाअंतीं माझी अशी खात्री झाली आहे कीं कोंदट खोलींत किंवा घोडागाडींत लोक कोंडलेले असले कीं त्यांना एकमेकापासून सर्दीचा संसर्ग होतो."

याच्याही पुढें जाऊन फ्रँकलिननें असेंही मत व्यक्त केलें होतें कीं अस्वच्छ आंथरूण, जुने कपडे, जुनींपुराणीं पुस्तकें आणि प्राण्यांचीं कुजलेलीं शरीरें यांपासून सर्दी होते. फ्रँकलिननें रोगजंतूंविषयीं जरी कधीं कांहीं ऐकलेलें नव्हतें, तरी सर्दीबद्दल आपल्याला आज जेवढी माहिती आहे जवळजवळ तेवढीच माहिती त्यानें स्वतः संशोधन करून मिळवली होती असें म्हणायला हरकत नाहीं.

आपल्या लायब्ररीच्या फळ्यांवर पुस्तकें ठेवीत असतां फ्रँकलिनच्या अनेकदा मनांत यायचें कीं आपले हात आणखी लांब असते तर किती चांगलें झालें असतें! लवकरच त्यानें काठीच्या टोकाला तारेचा चिमटा बसवून एक हत्यार तयार केलें आजदेखील गिऱ्हाइकाला हवें असलेलें बॉक्स वरच्या फळीवरून काढतांना युरोप अमेरिकेंतला वाणी दुकानदार हें हत्यार वापरीत असलेला तुम्हांला आढळेल.

याच सुमाराला बेननें एक अशी खुर्ची तयार केली कीं तिची बैठक मिटल्या-बरोबर शिडी तयार व्हायची. युरोप अमेरिकेंतल्या सैंपाकघरांतून जास्त सुधारलेली शिडीची खुर्ची आजही आढळते. शिडीच्या खुर्चीचा जनक बेन फ्रँकलिनच होय.

फ्रँकलिननें ज्या अनेक ॲटलांटिकपार सफरी केल्या, त्या सफरींत त्याला पुष्कळ गोष्टी बघायला मिळाल्या. इंग्लंडला जायला खूप आठवडे लागत आणि फ्रँकलिनचें संशोधनाचें साधन जहाजापुरतें मर्यादित असे. धुक्यामुळें जहाज एखाद् वेळेस वाट चुकलें तरी बेन सर्द हवेबद्दल कधीं तक्रार करीत नसे; उलट दीपगृहांचें मूल्य व महत्त्व किती आहे आणि अमेरिकेंत आपल्याला आणखी दीपगृहें कशीं बांधवून घेतां येतील याविषयीं त्याच्या मनांत विचार घोळूं लागत.

पुराणकाळीं ग्रीक खलाशी वादळ झालें असतां लाटांना थोपवण्यासाठीं समु-द्रावर तेल ओतीत असत असें त्यानें एकदा वाचलें होतें. एकदा लंडनला जातांना त्याला काफल्यांतल्या जहाजांपैकीं एकाच्याच मागें जास्त सफाईदार जल-मार्ग उमटलेला दिसला. जहाजावरील सैंपाकघरांतलें तेल चरबी वगैरे ओशट

पदार्थ बबर्जींनीं ओतले असल्यामुळें समुद्राचा तेवढा पृष्ठभाग सफाईदार बनला असें कप्तानानें सांगितलें.

ही माहिती ऐकून बेनला फारच नवल वाटलें. त्यानें बांबूची एक पोकळ छडी बनवून घेतली आणि तिच्यांत तेल भरलें. आपल्या मित्रांबरोबर तळ्याच्या कांठीं फिरत असताना त्यांची थट्टा करण्यासाठीं तो ही काठी वापरीत असे. तो पैज मारून म्हणे, "तळ्यांतले तरंग मी थांबवतों, बघा." हें त्याचें आव्हान लोक नेहमींच स्वीकारीत. मग बेन काय करी-हातांतली छडी तळ्याच्या पाण्यावरून जादूमंतर केल्यासारखी फिरवी आणि मग ती हवेंत तीन वेळां मागें पुढें हलवी. तरंग हळुहळू विरून जात आणि तळ्याचा पृष्ठभाग सफाईदार बने. त्याच्या काठींतल्या तेलामुळेंच पाण्याचा पृष्ठभाग साफ होत असे.

ॲटलांटिकपार प्रवास करतांना त्याला बाकीच्या समुद्रापेक्षां वेगळ्या रंगाचा एक पाण्याचा पट्टा दिसला. हा पट्टा म्हणजे अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्याला उष्णता देणारी गल्फ स्ट्रीम होय, ही गोष्ट आतां आपल्याला माहीत झालेली आहे. पण फ्रँकलिननें या चमत्काराचा पहिल्यानेंच जेव्हां अभ्यास केला तेव्हां दुसऱ्या कोणाही शास्त्रज्ञाला 'गल्फस्ट्रीम' बद्दल गंधवार्तासुद्धा नव्हती. या प्रवाहाचा फायदा घेऊन गलबत जास्त त्वरेनें हाकारतां यावें म्हणून दर्यावर्दी कप्तानांच्या उपयोगासाठीं फ्रँकलिननें एक नकाशा बनवला. यामुळें इंग्रज तांडेलांपेक्षां अमेरिकन तांडेल आपलीं गलबतें जास्त द्रुतगतीनें नेऊं लागले—कारण दिवसानुदिवस प्रवाहाच्या विरुद्ध जाण्याचा प्रयत्न करण्याऐवजीं ते आपलीं जहाजें गल्फ स्ट्रीमबरोबर नेत.

महासागर ओलांडतांना फ्रँकलिन नेहमीं 'गल्फ स्ट्रीम'चा अगोदर तपास घेत असे. या 'गल्फ स्ट्रीम'मध्यें देवमासे मुळींच नसतात असें त्याला आढळून आलें. महासागरांतल्या इतर ठिकाणच्या पाण्यापेक्षां वेगळ्या रंगाचें पाणी या प्रवाहांत असतें आणि त्यांत वाढणाऱ्या वनस्पतींचें प्रमाण अधिक असतें असेंही त्याला दिसून आलें. रात्रींच्या वेळीं गल्फ स्ट्रीम चकाकत नाहीं, बाकीच्या पाण्यापेक्षां या पट्ट्यांतल्या पाण्याचें उष्णतामान वेगळें असतें असाही अनुभव त्याला आला. या सर्व गोष्टींमुळें त्यानें असा निष्कर्ष काढला कीं, जमिनीवरून वाहणाऱ्या जशा नद्या असतात तशीच पण महासागरांतून वाहणारी ही एक खरीखुरी नदी असावी! या गोष्टी पूर्वीं कोणाच्याही ध्यानांत आलेल्या नव्हत्या.

१७७६ सालीं वसाहतींचें इंग्लंडशीं युद्ध सुरू झालें तेव्हां फ्रँकलिन फ्रान्सला

नों. दि. वाचनालय

निघालेच होता. 'रीप्रिझाल' हें त्याचें जहाज त्या वेळी इंग्लंडच्या हातांत सांपडलें असतें तर राजद्रोहाच्या आरोपाखालीं त्याला फाशीची शिक्षा झाली असती. पण या गोष्टीची त्याला भीति वाटत नव्हती. तो आपला 'गल्फ स्ट्रीम'चें उष्णतामान घेण्यांत गर्क झाला होता !

त्या काळांतील दुसऱ्या संशोधकांना बेन म्हणजे एक समाधानाची जागा वाटली असेल यांत शंका नाहीं. कारण पुष्कळदा अशीं माणसें लोकांच्या, इतकेंच नाहीं तर कुटुंबीयांच्या व मित्रांच्या मतें जरा चक्कर समजलीं जातात. बेनला कोणतीही गोष्ट अशक्य वाटत नसे; आणि एक प्रभावी व्यक्ति म्हणून त्याचा स्वतःचा जगभर लौकिक झालेला असल्यामुळें संशोधकाच्या एखाद्या कार्यांत त्यानें लक्ष घातलें कीं लगेच त्या कार्याला सार्वजनिक महत्त्व येत असे. पॅरिसमध्यें जेव्हां पहिलें बलून आकाशांत उडवण्यांत आलें तेव्हां तो प्रसंग पाहण्यासाठीं फ्रँकलिनची स्वारी त्या ठिकाणीं हजर होती.

हें बलून रेशमाचें केलेलें होतें आणि लोखंडाच्या किसावर मोरचूद ओतून तयार होणारा गॅस त्यांत भरला होता. या प्रकाराची खूप थट्टा नि हसें झालें होतें. पन्नास हजार लोक केवळ टिंगल करण्यासाठीं जमा झाले होते. मुसळधार पाऊस पडत असतां हे लोक हसत उभे होते. तोंच बलूननें जमिनीवरून उड्डाण केलें आणि वर जात जात तें नारिंगाएवढें दिसूं लागलें आणि अखेरीस ढगांआड दिसेनासें झालें.

जमलेले लोक आश्चर्यचकित झाले; पण तरी आपली चूक कबूल करायला ते तयार नव्हते.

"वर गेलं हो—" कोणीतरी म्हणालें, "पण पुढें काय? त्याचा उपयोग काय?"

बेननें ताडदिशीं प्रश्न केला, "नवीन जन्मलेल्या अर्भकाचा तरी काय उपयोग असतो? तें मोठं होईपर्यंत नाहीं तरी तुम्हांला थांबावंच लागतं."

प्रवासाचें साधन म्हणून आकाशांतून उड्डाण करणारीं हवेंतलीं जहाजें केव्हां ना केव्हां उपयोगांत येतील आणि त्यामुळें ढगांवरून ठेचकाळत प्रवास करण्याचा प्रसंग टळेल असें भविष्य फ्रँकलिननें केलें होतें. अर्थात् ही गोष्ट त्याच्या आयुष्यांत घडणार होती असें नाहीं; पण केव्हां ना केव्हां घडणार होती! तो असेंही म्हणे कीं या उडणाऱ्या जहाजांमुळें युद्धाची निरर्थकता राष्ट्रांना पटूं लागेल, कारण हवाई हल्ल्यांविरुद्ध कोणतेंही राष्ट्र आत्मसंरक्षण करूं शकणार नाहीं. तो म्हणे, एक वेळ अशी येईल कीं सैन्येंच्या सैन्यें बलूनमधून नेतां येतील आणि या

रीतीनें एखाद्या देशावर फारच कमी खर्चांत स्वारी करतां येईल. म्हणजे आजकालच्या छत्रीधारी सैन्याचा संभव फ्रँकलिनला त्याच वेळीं स्पष्ट दिसलेला होता. पण त्यानें भाकीत केल्याप्रमाणें युद्धाची निरर्थकता राष्ट्रांना अजून पटूं नये ही मात्र अत्यंत खेदाची गोष्ट आहे.

फ्रँकलिन जेव्हां इतर गोष्टींत गुंतलेला नसे, तेव्हां संगीत ऐकायला त्याला फार आवडे. त्यानें एक वाद्य शोधून काढलें होतें आणि एका काळीं तें अतिशय लोकप्रियता पावलें होतें हें ऐकून तुम्हांला आश्चर्य वाटणार नाहीं. हें वाद्य म्हणजे कांचेच्या संगीत प्याल्यांचा एक ताफा असे! त्यांतला प्रत्येक प्याला अर्धगोलाकार असून त्याला मध्यभागीं एक छिद्र असे. सर्वांत मोठा प्याला नऊ इंच व्यासाचा असून सर्वांत छोटा प्याला तीन इंच व्यासाचा असे.

बेननें असे सदतीस प्याले घेतले आणि घासून घासून त्यांच्यांतून वेगवेगळ्या पट्टींतले सूर निघतील असें केलें. त्यांतून अगदीं योग्य ते सूर मिळावेत म्हणून तो हार्पिसकॉर्ड हें वाद्य पुढें ठेवी. हे प्याले त्यानें एका लोखंडी चातीवर ठेवले —मोठे प्याले चातीच्या दोन टोकांना आणि सर्वांत लहान मधोमध. नंतर ही चाती चार खूर असलेल्या एका खोक्यांत आडवी बसवली. झालें वाद्य तयार! हें वाजवणारा चातीच्या समोर बसायचा, एका पेडलनें चाती फिरवायचा—सूत कांतायच्या चरख्याला त्या काळीं असें पेडल असे—आणि मग प्याल्यांना गति मिळाली कीं आपल्या बोटांनीं त्यांच्या कांठांवर आघात करायचा.

फ्रँकलिन म्हणतो, "या वाद्यापासून होणारे फायदे हे कीं एकतर दुसऱ्या कोणत्याही वाद्यांतून निघणाऱ्या स्वरांपेक्षां याचे स्वर—अगदीं कल्पनातीत मधुर असतात. बोटें कमीअधिक जोरांत दाबण्यानें ते सूर कठोर किंवा मृदु करतां येतात. आणि एकदा हे स्वर ठरवले गेले कीं त्यांत कधींही बेसूरपणा येत नाहीं, दुरुस्ती करावी लागत नाहीं."

फ्रँकलिननें या वाद्याला 'आर्मोनिका' असें नांव दिलें. पुढें त्याचें 'हार्मोनिका' असें रूपान्तर झालें. त्या काळीं तें इतकें लोकप्रिय झालें कीं मोठमोठे गवई त्यावर आपले जलसे बसवीत. फ्रँकलिन हार्मोनिकाप्रमाणें हार्प किंवा वीणा, गीतार आणि व्हायोलिन हीं वाद्येंही वाजवीत असे. तो आणि त्याची मुलगी सॅली पुष्कळदा द्वंद्वगीतें वाजवीत. सॅली हार्पिसकॉर्ड वाजवी आणि बेन हार्मोनिका.

विद्युत् विषयीं फ्रँकलिननें प्रथमतः ऐकलें तें १७४६ सालीं. त्यावेळीं तो बॉस्टनला कांहीं दिवस पाहुणा म्हणून गेलेला होता. तिथें डॉ. स्पेन्स यांच्याशीं

त्याची गांठ पडली. हे डॉक्टरसाहेब प्रयोगाचीं कांहीं उपकरणें घेऊन नुकतेच स्कॉटलंडहून आलेले होते. फ्रँकलिनला या विषयाबद्दल इतकें कुतूहल वाटलें कीं घरीं परतल्यानंतर तो स्वतः विद्युद्विषयक प्रयोग करायला लागला. डा. स्पेन्स जेव्हां फिलॅडेल्फियांत आले तेव्हां त्यांचीं उपकरणें बेननें विकत घेतलीं.

जगांत हा जो एक नवा चमत्कार अवतीर्ण होत होता, त्यानें केवढी खळबळ उडवली असेल याची कल्पना करणें कठीण आहे. बेन तर त्यामुळें इतका मोहित झाला कीं त्याला दुसरें कांहीं सुचेना. घरांतल्या लहानसान चिजा नि तुकडे घेऊन सुरवातीचे प्रयोग करण्यांत त्यानें आपला बहुतेक वेळ घालवला. या वस्तूंत मिठाचें पात्र होतें, शिरका वगैरे मसाल्याचे पदार्थ ठेवण्याचें पंचपाळें होतें, पंपाची मूठ होती आणि एका पुस्तकाच्या वेष्टणावरची काढलेली सोन्याची भुकी होती. विद्युत् स्फुलिंग पकडतां यावा म्हणून त्यानें स्वतः लहान लहान यंत्रें बनवलीं होतीं आणि आपल्या मित्रांना त्यावर प्रयोग करून दाखवला होता. हें नवल पाहण्यासाठीं लवकरच त्याच्या घरांत लोक गर्दी करूं लागले; डोळे फाडफाडून ते हा प्रकार पाहूं लागले. त्यामुळें दुसरें कांहीं करायला त्याला वेळही मिळेना.

फिलडेल्फियांत एक कांचा फुंकणारा होता, त्यानें डॉ. स्पेन्सच्या उपकरणांची स्वतः नक्कल केली आणि मग लवकरच बेनचे कित्येक मित्र हेच प्रयोग करूं लागले. मिसेस फ्रँकलिनला यामुळें जरा हायसें वाटलें असणार; कारण सर्वच भार तिच्या घरावर पडत होता, तो आतां कमी झाला.

एका वर्षाच्या आंत फ्रँकलिननें आपले दोन अत्यंत महत्त्वाचे शोध लावले —विद्युत् हें एकच प्रकारचें एक प्रवाही द्रव्य आहे ही त्याची कल्पना आणि या प्रवाहात धन आणि ऋण असे दोन प्रकारचे गुण असतात हा त्याचा शोध. टोकेरी वस्तु विद्युत् स्फुलिंग टाकतात आणि आकर्षून घेतात असेंही तो पुष्कळदा म्हणे. त्याच्या सुप्रसिद्ध विजेच्या कांवीच्या प्रयोगाची ही सुरवातच होती.

अर्थात् त्यानें चुकाही पुष्कळ केल्या; पण त्या मोकळ्या मनानें कबूलही केल्या. त्यानें जे प्रयोग केले ते प्रयोगशाळेंत नसून आपल्या घरांतल्या साध्या खोलींत केले; आणि प्रयोग करण्यासाठीं त्याच्याजवळ साधनेंही जवळजवळ नव्हती. कांचेचीं अकरा तावदानें, थोडेसे पातळ शिशाचे पत्रे, रेशमाची दोरी आणि शिशाची तार एवढी सामुग्री घेऊन फ्रँकलिननें इतिहासांतला पहिला विद्युत् घट (बॅटरी) तयार केला. हा शोध केवढें महत्त्व धारण करणार आहे हें कळायला त्याच्यापुढें त्या वेळीं कोणताही मार्ग नव्हता.

विजेबद्दल बेनला एक मोठी विवंचना वाटत असे, ती म्हणजे—विजेचा उपयोग लोकांना कसा करून देतां येईल याची एकही युक्ति त्याला सांपडेना. विजेनें मनुष्यजातीचें कांहींतरी कल्याण केलें पाहिजे, केवळ कुतूहल वाटणाऱ्यां-साठीं जादूचे किंवा चमत्काराचे खेळ करून दाखवणें एवढीच तिची भूमिका राहूं नये असें त्याला वाटे. पण बेन फ्रँकलिननें आपले प्रयोग जर चालू ठेवले नसते, तर आज माणसें हरघडीच्या व्यवहारांत विजेचे शेंकडों उपयोग करतांना आढळलीं नसतीं.

त्या प्रारंभाच्या काळांत विद्युत् म्हणजे एक थेर समजलें जात असे—एखादा नवीन खेळ असावा तसें कांहींतरी. विजेच्या शक्तीची कोणाला कल्पना नव्हती—बेनला तर मुळींच नव्हती. तो आणि त्याचे मित्र विजेशीं खेळ करीत तेव्हां यांत कांहीं धोका असेल याची त्यांना कल्पना नसे. उन्हाळ्यांत ते या खेळांकडे फारसें लक्ष देत नसत, कारण उन्हाळ्यांत दुसरे अनेक उद्योग मागें असत. पण उकाड्याचे दिवस जवळ येत चालले कीं आपला प्रयोगांचा हंगाम बंद करण्या-पूर्वी ते एक वनविहार साजरा करीत. त्याला त्यांनीं 'इलेक्ट्रिकल पिकनिक' असें नांव दिलें होतें.

शुइलकिल नदीच्या कांठांवर एक जागा त्यांनीं निवडली आणि तिथें आपलीं उपकरणें मांडून ठेवलीं. त्यांचा बेत असा होता कीं विद्युत्स्फुल्लिंग पाडून एक मोठें कोंबडें मारायचें. नंतर तें, विजेच्या बाटलींत विस्तव निर्माण करून विजेच्या सांडशीवर तें भाजायचें. या सर्व प्रयोगाचा प्रमुख बेन होता; आणि विजेची ठिणगी पाडून कोंबडें मारण्याच्या उद्योगांत असतांना आपण काय करतों आहों तिकडे त्याचें लक्षच राहिलें नाहीं; जो तो बोलण्यांत नि हसण्यांत निमग्न होता.

अकस्मात् पिस्तुलाच्या बारासारखा 'ठो' असा आवाज झाला, भयंकर जाळ पेटला आणि तो सगळा विद्युत्प्रवाह मि. फ्रँकलिन यांच्या अंगांत शिरला. सुदैव एवढेंच कीं हा प्रवाह कोंबडें मारण्याला पुरेसा असला तरी माणूस मारण्याला पुरेसा नव्हता. डोक्यापासून पायापर्यंत वज्राघात झाल्यासारखा बेन तत्क्षणीं बेशुद्ध पडला. ज्या हातांत विद्युच्चलित सांखळी धरलेली होती तो एकाएकीं पांढरा फटक व बधिर बनला होता. ती जवळ जवळ संबंध रात्र त्याची बधिरावस्थेंत गेली. या वेळीं खरें म्हणजे बेन विजेच्या धक्क्यानें मरायचा, पण थोडक्यांत बचावला.

आकाशांतली वीज आणि मनुष्यनिर्मित विद्युत् या दोन्ही एकच होत असा बेनला संशय होता आणि त्याचीं बारा कारणें तो देई. एकतर दोन्ही प्रकाश

देतात. दुसरें, रंगानेंही दोन्ही सारख्याच असतात. दोन्हींचा गतिमार्ग वाकडा वाकडा असतो. दोन्ही द्रुतगतीनें जातात. दोन्ही धातूंमधून वाहतात. स्फोट होतांना दोन्ही आवाज करतात. दोन्ही पाण्यांत किंवा बर्फांत वास्तव्य करतात असें दिसतें. ज्या पदार्थांतून जातील त्यांचा दोन्ही छेद करतात. प्राण्यांचा नाशही दोहोंच्याकडून होतो. दोहोंच्या मुळें धातु वितळतात, ज्वालाग्राही पदार्थ पेट घेतात आणि दोन्हींना गंधकासारखा वास येतो.

इतकें असूनही आकाशांतली वीज व कृत्रिम विद्युत् एकच होत याचा आपल्याजवळ कांहीं पुरावा नाहीं असें फ्रँकलिनला वाटे. विद्युत् नेहमीं टोकांकडे आकर्षित होत असते. बेननें असें ठरवलें कीं आकाशांतली वीजदेखील टोकांकडे ओढली जाते का हें पाहावें. या संबंधांत त्यानें बरेच लेख लिहिले आणि त्यांपैकीं बऱ्याच लेखांतून त्यानें, इमारतीवर अणकुचीदार कळस आणि त्यांना जोडून खालीं जमिनींत नेलेली तार असणें कसें आवश्यक आहे तें पटवून देण्याचा प्रयत्न केला. या त्याच्या मताचेंच पर्यवसान पुढें ‘ विजेच्या कांबी ’च्या शोध लावण्यांत झालें. पण तो आपल्या माजघरांत बसून जे प्रयोग करीत असे ते जितके लोकांना समजूं शकत, तितकें हें सोपें नव्हतें. त्यामुळें लोकांनीं तिकडे फारसें लक्ष दिलें नाहीं.

ढगांत वीज खालीं ओढून दाखवली म्हणजेच ती वीज कृत्रिम विद्युत्—इलेक्ट्रिसिटी—सारखी आहे हें आपल्याला सिद्ध करतां येईल असें बेनला वाटलें. हें कसें साधायचें याचा तो विचार करूं लागला. एखादा अणकुचीदार टोकाचा जिन्नस उंच आकाशांत न्यायला हवा—देवळाच्या कळसावर नेऊन ठेवला तर? पण त्याहीपेक्षां सोपी अशी एक युक्ति त्याला सुचली. त्यानें पतंग उडवण्याचें ठरवलें.

हा इतिहासकारक प्रसंग नक्की कोणत्या दिवशीं व कोणत्या तासाला घडला हें कोणालाही माहीत नाहीं. बेननें स्वतःच्या कोणत्याही लिखाणांत त्याचा उल्लेख केलेला नाहीं. पण ती वसंतऋतूंतली एक दुपार असावी. हवा वादळी असणार. बेन आणि त्याचा मुलगा वुइल्यम्, वय एकवीस वर्षें (बहुतेक चित्रांतून दाखवतात तसा लहान मुलगा नव्हे)–पतंग घेऊन शेतें ओलांडीत निघाले. आकाश ढगांनीं काळवंडलेलें होतें आणि चौकस लोकांचा ससेमिरा चुकवण्यासाठीं पतंग एका बाजूला धरून बापलेक चालले होते. दोघांचेंही वय पतंग उडवण्याइतकें लहान नव्हतें आणि त्यामुळें त्यांनीं प्रयोग अतोनात गुप्तपणें चालवला होता. हा

असला आचरट उद्योग पाहून लोक आपली फारच टर उडवतील अशी बेनला भीति वाटत होती.

सेडर किंवा देवदार लाकडाच्या दोन काटक्यांची फुली करून त्यावर रेशमी हातरुमाल ताणून बसवून हा पतंग बनवलेला होता. रुमालाचीं चार टोकें फुलीच्या चार टोकांना पक्कीं बांधलेलीं होतीं. पतंगाला एक शेपटी होती, आणि दोरीचें एक कडें केलेलें होतें. पतंग उडवण्यासाठीं दोरीचा एक सबंध गुंडा बरोबर घेतलेला होता. पतंगाच्या काटक्यापकीं लांब काटकीच्या टोकाला एक टोकदार तार जोडलेली होती. ती आडव्या काटकीच्या वर एक फूट उभी राहिलेली दिसत होती. दोरीचें जें टोक हातांत धरायचें होतें त्याला बेननें एक रेशमी फीत आणि धातूची बनवलेली किल्ली बांधली होती.

आकाशांत उग्ररूप धारण करणारे वादळी ढग जमत होते, त्यांच्याकडे बेननें पाहिलें. किल्ली वुइल्यमजवळ देऊन तो म्हणाला, "बेटा, तूं या कुरणावरून धावत दूर जाऊन उभा राहा. आपण हा प्रकार आतां हवेंत उडवूं या !"

वुइल्यम् उड्या मारीत निघाला; आणि लवकरच पतंग आकाशांतून तरंगत त्या काळ्याकभिन्न ढगांकडे जात असलेला दिसला. त्यांपैकीं आतां गडगडतात कीं मग गडगडतात असे भासणारे जे विद्युन्मेघ होते त्यांच्या दिशेनें यांनीं कितीदा तरी पतंग उडवला; पण कांहीं परिणाम झाला नाहीं. बेन निराश झाला. पतंग परत खालीं ओढून मांज्या गुंडाळून घरीं जाऊन कोरडे कपडे घालावेत अशा विचारांत तो होता......

इतक्यांत त्याला असें दिसलें कीं आपण हातांत धरलेल्या दोरीचे धागे ताठ उभे राहायला लागले आहेत—एखाद्या भ्यालेल्या कुत्र्याच्या पाठीवरचे केस जसे उभे राहतात तसे !

"हें बघ—!" बेन वुइल्यमला उद्देशून ओरडला. "जमायला लागलं, बरं का ?"

हें तो म्हणतो आहे तोंच त्यानें हातांत धरलेल्या किल्लींतून बारीकसा विद्युत्-प्रवाह सुरू झाला आणि त्याला एक सूक्ष्म धक्का बसला. अशा वेळीं मनुष्याच्या मनांत ज्या भावना उचंबळत असतील त्याचें वर्णन कोणी करूं शकेल का ? बेनला विजयाची भावना झाली असेल, अत्यानंद झाला असेल; आश्चर्य, भयाकुलता, विस्मय वाटला असेल. पण तें जाणून घेण्याचा आपल्याजवळ कांहीं मार्ग नाहीं. त्यानें ज्या ज्या गोष्टी केलेल्या होत्या त्या सर्वांत अत्यंत दूरगामी

महत्त्वाची कामगिरी बहुधा हीच असणार !


पाऊस धो धो पडूं लागला आणि दोरी भिजून ओली चिंब झाली तेव्हां किल्लीमधून विजेचा मुक्त प्रवाह सुरू झाला. बेन फ्रँकलिन नेहमींच मोठा व्यवहारी दृष्टीचा. जरूर पडली तर हाताशीं असावी म्हणून त्यानें एक कांचेची बाटली बरोबर आणलेली होती. या बाटलींत वीज कोंडून ठेवण्याचा खटाटोप त्यानें सुरू केला.

विजेच्या इतिहासांतला हा अत्यंत महत्त्वाचा क्षण होता. बेन स्वतःही त्या वेळीं अत्यंत विस्मयचकित होऊन गेलेला असणार. कारण त्याबद्दल तो कधींही फारसें कांहीं बोलणार नाहीं. त्याच्या या शोधाचें वृत्त कित्येक वर्षेंपर्यंत बाह्यजगाला कळलें नाहीं.

त्याच्या प्रयोगाची माहिती होतांच बेनला हार्वर्ड व येल विद्यापीठांनीं आणि वुइल्यम् अँड मेरी कॉलेजनें सन्माननीय पदव्या दिल्या. विजेमुळें दळणवळणाची जीं द्रुतगतीचीं साधनें त्यानंतर उपलब्ध झालीं आहेत त्यांचा त्या काळीं पत्ताही नव्हता, आणि तरी बेनची कीर्ति वेगानें पसरत चालली. तुम्हीं ज्या खेळण्याचा कितीदा तरी उपयोग केलेला असेल असल्या एका साध्या घरगुती खेळण्याच्या म्हणजे पतंगाच्या साह्यानें बेन फ्रँकलिननें स्वर्गांतला अग्नि पृथ्वीवर आणला होता. आणि पृथ्वीवरच्या लोकांनीं साहजिकच याबद्दल त्याचा गौरव केला.

आणखीही एक, पूर्वीं अनेकदा सिद्ध केलेली गोष्ट त्यानें पुनश्च सिद्ध केली होती. ती ही कीं अगदीं साधेसुधे साहित्य घेऊनही इतक्या गोष्टी करतां येतात कीं त्यांना अंतच नाहीं ! दुसऱ्या लोकांनीं नंतर फ्रँकलिनचें अनुकरण केलें. त्यानें लावलेले शोध आणि वापरलेल्या पद्धति यांचा उपयोग करून त्यांनीं नवे नवे चमत्कार आपल्याला शिकवले. पण चमत्कारांचें युग अद्यापि संपलेलें नाहीं आणि जोंवर जगांत सुधारणेला वाव आहे तोंवर तें संपणारही नाहीं !

# ८



## मुत्सद्दी

मुत्सद्दी म्हणजे कोण? जो मनुष्य इतका सुज्ञ आणि निर्भय वृत्तीचा असतो कीं सबंध देशापुढील समस्यांची उकल करण्याच्या कामीं त्याची मदत मागितली जाते, तो. बेन फ्रँकलिन हा थोर अमेरिकन मुत्सद्दी म्हणून ओळखला जाऊं लागला हें स्वाभाविकच होय. फिलॅडेल्फियांतल्या लोकांसाठीं त्यानें इतक्या चांगल्या गोष्टी केलेल्या होत्या कीं त्यानें राज्यकारभारांत भाग घ्यावा आणि आपल्या आयुष्यांतल्या सर्व लढाया लढण्यांत त्यानें आपल्याला मदत करावी असें त्यांना वाटूं लागलें.

राज्यकारभारांत भाग घेण्याची कल्पना बेनच्या डोक्यांत कधीं फारशी आलेली नव्हती. एक चांगला नागरीक या नात्यानें पुरेसे उद्योग त्यानें स्वतःला लावून घेतले होते—नव्या शोधांचा विचार करीत राहणें आणि उपजीविकेसाठीं धडपडणें हीं कामें त्याला पुरेशीं होतीं. भाषणें करण्यांत तो फारसा चतुर नव्हता.

सभांना गेला कीं शांतपणें बसून ऐकायचा; कोणी त्याला मत विचारीपर्यंत तो स्वतः कांहीं बोलत नसे. त्याच्या अंगीं वक्तृत्व नव्हतें. पण धंद्यांत त्याची भरभराट झाली आणि त्याला अधिक फुरसत मिळूं लागली तेव्हां, एखादें कार्य घडवून आणायचें असलें कीं बेनचें नांव लोकांच्या डोक्यांत प्रथम येऊं लागलें.

गव्हर्नरांनीं त्याची 'जस्टिस ऑफ् दि पीस' (जे. पी.) म्हणून नेमणूक केली तेव्हां त्याच्या सार्वजनिक जीवनाला प्रारंभ झाला. या नव्या भूमिकेंत त्याला न्यायाधीश म्हणून बसून खटले चालवावे लागत. फिलॅडेल्फियाच्या कॉर्पोरेशननें त्याला 'सिटी कौन्सिल' चा सभासद निवडलें आणि नंतर नगरपाल—आल्डरमन—म्हणून त्याची नेमणूक केली. १७५१ सालीं तो पेनसिल्व्हॅनिया असेंब्लीचा सभासद म्हणून निवडून आला.

पेनसिल्व्हॅनिया असेंब्लीबद्दल त्याला आधींपासून बरीचशी माहिती होतीच. त्या असेंब्लीनें मंजूर केलेले कायदेही त्याला माहीत होते. ते कायदे आपल्या हस्ताक्षरांत लिहून काढणारा कारकून म्हणून त्यानें पंधरा वर्षें काम केलें होतें. असेंब्लीचा क्लार्क असणें हें मोठें खडतर आणि पुष्कळदा नीरस वाटणारें काम होतें. कारण सभासद आपसांत वाद घालीत, भांडत आणि सभांमधून आज लोक जसे वेळ फुकट घालवतात तसें करीत. चर्चा रेंगाळूं लागली कीं बेन कधीं कधीं अंकगणितांतले आपले 'जादूचे चौकोन' काढून स्वतःची करमणूक करून घेई. इतकें असूनही, पगार मिळे म्हणून खर्डेघाशीचें काम त्यानें कष्टानें पार पाडलें होतें. शिवाय या नोकरीमुळें त्याला मतदानपत्रिका, कायद्याचे मसुदे, नोटा आणि इतर स्टेशनरी साहित्य छापण्याचें काम सरकारकडून मिळत गेलें होतें.

बेन जेव्हां असेंब्लीचा सभासद झाला आणि जनतेनें निवडून दिलेला व जनतेचा प्रतिनिधि म्हणून सभागृहांत बसूं लागला, तेव्हां, चाललेल्या चर्चेकडे तो बारकाईनें लक्ष देऊं लागला. प्रत्येकाला हितकारक होतील असे कायदेही पास करण्याचा त्यानें प्रयत्न केला; पण शाळेंत नवख्या विद्यार्थ्याची जशी स्थिति होते तशी त्याची झाली होती. त्याच्याकडे कोणीं फारसें लक्ष दिलें नाहीं. ज्या कायद्यांसाठीं त्यानें धडपड केली ते क्षुल्लक स्वरूपाचे कायदे होते. उदाहरणार्थ—फिलॅडेल्फियाच्या नगरसीमेंत किती कुत्र्यांना हिंडायला परवानगी असावी, शुयकिल् नदीवर कोणत्या ठिकाणीं पूल बांधावा इ. पण लवकरच सबंध असेंब्लीचें लक्ष बेनकडे वेधलें आणि त्यांना असें वाटूं लागलें कीं हा जेव्हां कांहीं बोलतो तेव्हां त्याला खरोखरच कांहीं अर्थ असतो.

दोन वर्षांच्य अल्पावधींत तो पुढारी बनला आणि रेड इंडियन लोकांशीं समेट घडवून आणण्यासाठीं त्याला कार्लाइल येथें पाठवण्यांत आलें. बेननें ही कामगिरी ज्या तऱ्हेनें पार पाडली ती नेहमींपेक्षां अगदीं वेगळी होती, पण त्यामुळें तह घडून आला. रेड इंडियन लोक रमचे शौकिन होते आणि खूपशी दारू झोक-लेली असली कीं ते वाटेल तसे गैरशिस्तपणें वागत. फ्रँकलिननें, त्यांना दारू विकण्यांत येऊं नये अशी बंदी घातली.

कार्लाइल शहराबाहेर एका मोकळ्या चौकाभोवतीं तात्पुरत्या झोपड्या बांधून जे शंभरावर रेड इंडियन राहात होते, त्यांनीं याविरुद्ध जोराची तक्रार केली. बेननें त्यांना सांगितलें कीं "एवढं काम पुरं झाल्यानंतर तुम्हांला भरपूर रम मिळेल." रेड इंडियन लोकांनीं तें कबूल केलें आणि मग अगदीं व्यवस्थित रीतीनें आणि कधीं नव्हेशा त्वरेनें हें कराराचें काम पार पडलें.

करारावर सह्या झाल्यावर रम वांटण्यांत आली. त्या रात्रीं बेन आणि त्याच्या मंडळाचे इतर सभासद भोजनाला बसताहेत तोंच अतिशय भयंकर असा आरडा-ओरडा आणि जगली आरोळ्या इंडियन लोकांच्या छावण्यांतून निघालेल्या ऐकूं आल्या. हा काय प्रकार आहे म्हणून पाहण्यासाठीं ही मंडळी धावतच तिकडे गेली.

रेड इंडियन लोकानीं चौकाच्या मध्यभागीं एक जंगी शेकोटी पेटवली होती आणि ते तिच्याभोवतीं बेभानपणे धावत होते धावतां धावतां एकमेकांना जळक्या लाकडांनीं मारीत काय होते, नाचत काय होते! एकंदरींत भयंकर गोंधळ त्यांनीं घातला होता! एखाद्याला तें नरकाचें दृश्य वाटलें असतें. पण या बाबतींत कांहींच करतां येण्यासारखें नाहीं असें वाटून बेन आपल्या मित्रांसह आपल्या खाणावळींत परत आला आणि झोंपीं गेला. मध्यरात्रीच्या सुमारास दरवाजावर धडका बसूं लागल्या. रेड इंडियन लोक आणखी रम मागण्यासाठीं आलेले होते. पण बेन मुळींच जागा झा उठला नाहीं.

या करारानें असेंब्लीचें फार समाधान झालें. बेननें परिस्थिति फार चातुर्यानें हाताळली असें त्यांचें मत पडलें. बेनच्या राजनैतिक जीवनाची ही सुरवात होय. ही सुरवात रानटी आणि असंस्कृत पद्धतीनें झाली हें खरें असलें तरी बेन रानटी व असंस्कृत देशांतच राहात होता.

१७५४ सालीं फ्रान्सबरोबर युद्ध जुंपण्याचा रंग दिसत होता. त्या वेळीं पुन्हा रेड इंडियन लोकांशीं तडजोड करण्यासाठीं बेनला पाठवण्यांत आलें. सर्व वसा-हतींतील प्रतिनिधींची एक परिषद भरली आणि ती सहा रेड इंडियन राष्ट्रांच्या

प्रमुखांना भेटण्यासाठीं आल्बनीला गेली. त्यांत पेनसिल्व्हॅनियाच्या प्रतिनिधींपैकीं एक म्हणून बेन फ्रँकलिनही गेला होता.

आल्बनीच्या प्रवासांत असतांना बेननें अमेरिकेच्या एकीकरणाचा पहिला मसुदा तयार केला. त्यांत संरक्षणाच्या व सार्वत्रिक कल्याणाच्या दृष्टीनें सर्व अमेरिकन वसाहती एका राज्यतंत्राखालीं याव्यात असें सुचवलें होतें. ही योजना वसाहतींच्या विधिमंडळांनीं आणि इंग्रज सरकारनें झिडकारली. पण संयुक्त राज्यांची—किंवा 'युनायटेड स्टेट्स'ची कल्पना प्रथमतः याच योजनेमुळें पुढें आली.

मुत्सद्दी या नात्यानें बेन फँकलिननें जे गुण प्रगट केले त्यांतला एक म्हणजे प्रत्येकाशीं मिळतें घेण्याचें कौशल्य. पेनसिल्व्हॅनियाच्या विधिमंडळांत इंग्रज राजप्रतिनिधींचे प्रतिपक्षाशीं नेहमीं खटके उडत असत. फ्रँकलिन वसाहती-तर्फेचा म्हणजे विरोधी पक्षाचा सभासद म्हणून बसे. गव्हर्नर किंवा इंग्लंडहून आलेले दुसरे सरकारी अंमलदार यांच्याशीं ज्या राजकीय कटकटी उद्भवत त्यांत फ्रँकलिननें वैयक्तिक द्वेष कधींही प्रकट केला नाहीं. विधिमंडळाचीं गाऱ्हाणीं सरकारी अधिकाऱ्यांपर्यंत पोचवण्याचें काम बहुधा त्याच्याचकडे येत असे.

पेनसिल्व्हॅनियाचें विधिमंडळ शेवटीं अशा निर्णयाला येऊन पोचलें कीं गव्हर्नर व इतर अंमलदारांकडून आपल्याला वेळोवेळीं मिळणाऱ्या आज्ञा व सूचना पेनसिल्व्हॅनियाच्या जनतेला फार त्रासदायक होत आहेत. तेव्हां हें प्रकरण राजेसाहेबांपर्यंत न्यावें असें ठरवून असेंब्लीनें लंडनला पाठवण्यासाठीं आपला प्रतिनिधि म्हणून बेनची निवड केली.

ही कामगिरी फार महत्त्वाची होती; आणि बेनला त्यामुळें जरा काळजीच वाटूं लागली. जंगली रेड इंडियन लोकांशीं बोलणीं करणें निराळें, आणि इंग्लं-डच्या राजाच्या मंत्र्यांबरोबर वाटाघाटी करणें निराळें! आपल्याला राजाचें दर्शन कधीं घडेल अशी त्याची अपेक्षा नव्हतीच, इतकेंच नव्हे तर इंग्रज सरकारच्या कोणाही श्रेष्ठ व्यक्तीच्या दारांत पाऊल टाकायचें म्हटलें तरी आपल्याला कितीतरी काळ घालवावा लागेल हें तो जाणून होता. आणि तरी, काय वाटेल तें करण्याची बेनची तयारी होती; कारण आपलें उद्दिष्ट न्याय्य आहे असें त्याला वाटत होतें.

त्याची बायको डीबोरा म्हणाली, "आतांतरी तुम्ही आपल्यासाठीं कांहीं चांगले चांगले कपडे शिवून घ्या. आणि हें बघा, पा! तिथें इंग्लंडमध्यें म्हणे हवेंत फार गारठा व दमटपणा असतो. आपल्या जिवाला जपा, बरं का?"

"मी वुइल्यमला बरोबर घेऊन जातों. तिथें त्याला शाळेंत घालीन. मलाही

त्याची सोबत होईल."

"तुम्ही परत कधीं येणार ?" जरा खिन्नपणें डीबोरानें विचारलें.

"फार उशीर नाहीं लागणार" बेन म्हणाला. "हिंवाळ्यापर्यंत येतोंच बहुतेक."

तो १७५७ सालचा मार्च महिना होता.

बेन आणि वुइल्यम मोठ्या उत्साहानें निघाले होते; पण न्यूयॉर्कमध्यें त्यांची फार काळ खोटी झाली आणि नंतरचा प्रवासही फार भयंकर झाला. धुक्यानें आणि वादळांनीं गलबताचा पिच्छा पुरवला आणि फ्रेंच चांचे लोकही हात धुवून मागें लागले. पुष्कळदा तर असें दिसूं लागलें कीं बेनचें पाऊल कधींही इंग्लंडच्या किनाऱ्यावर पडणार नाहीं! पण तो एकदाचा तिथें पोचला आणि पोचल्यावर आज अमेरिकन प्रवासी जी गोष्ट करतात तीच त्यानें केली. इंग्लंडच्या दक्षिण भागांतील स्टोनहेंज येथील प्रेक्षणीय खडक पाहण्यासाठीं तो गेला; आणि वाटेंत सॅलिसबरीचें सुंदर कॅथीड्रल पाहण्यासाठीं थांबला. इंग्लंडवर त्याचें फार प्रेम होतें आणि तिथें त्याला मित्रही खूप होते.

बेन आणि वुइल्यम् लंडनला २६ जुलै १७५७ रोजीं पोचले. (फिलॅडेल्फिया त्यांनीं ४ एप्रिल रोजीं सोडलें होतें.) क्रेव्हन स्ट्रीटवर मिसेस मार्गरेट स्टीव्हन्सन नांवाच्या एका विधवा बाईकडे ते मुक्कामाला राहिले; आणि वुइल्यम् फ्रँकलिनचें नांव कायद्याचा अभ्यास करण्यासाठीं मिडल् टेंपलमध्यें दाखल करण्यांत आलें.

या पितापुत्रांकडे चार खोल्या होत्या आणि दोन नोकर त्यांच्या दिमतीला होते. राजेसाहेबांकडे अर्ज घेऊन येणाऱ्या प्रतिनिधीला शोभेशा थाटानें ते राहात होते. बेनच्या हिशोबाच्या वह्यांत चांदीचे बूट व गुडघ्यांवरचे बकल, केसांचे टोप, तलवारी, शर्टासाठीं कॅंब्रिक कापड, हातरुमाल, वस्तरे इत्यादि खरेदी केल्याची नोंद सांपडते. तसेंच दोन खोके भरून भेटीच्या वस्तु त्यानें घरीं आपली बायको डीबोरा व मुलगी सॅली यांच्याकडे पाठवल्या. या भेट वस्तूंत किरमिजी रंगाचे साटिनचे झगे (क्लोक), हातमोजे, कुंच्या, इंग्लिश चिनी मातीचें सामान, कापड, वेषभूषेच्या वस्तु, लोकरीचीं पांघरुणें, मेजपोस, नॅपकिन आणि 'सर्वोत्तम खोली' (दिवाणखाना) साठीं एक जाजम, अशा जिनसा होत्या.

थोड्याच महिन्यांत बेननें एक घोडागाडी भाड्यानें ठेवली आणि अल्पावधींतच तो लंडनच्या राहणीला रुळला. आणखी कांहीं महिन्यांत फिलॅडेल्फियाला परत जायचें अशा बेतानें तो आलेला होता; पण तो प्रत्यक्ष परत जाईपर्यंत पांच वर्षें

लोटलीं. या काळांत जेव्हां जेव्हां आणि जिथें जिथें म्हणून संधि मिळाली तिथें व तेव्हां त्यानें पेनसिल्व्हॅनिया असेंब्लीची बाजू मांडली.

वसाहतवाल्यांकडून मात्र कर उकळायचे आणि स्वतःच्या प्रतिनिधींना तेवढें त्यांतून वगळायचें हें धोरण राजेसाहेबांनीं पत्करलें होतें आणि बेन फ्रँकलिन-पुढचे प्रश्न बहुतांशीं या संबंधांतच होते. तसेंच इंग्रज गव्हर्नर आणि असेंब्लीचे सभासद यांच्यांतील संघर्ष मिटावेत या दृष्टीनेंही त्यानें प्रयत्न चालवला होता.

कधीं कधीं मुत्सद्यांना जें उत्कृष्ट यश मिळतें तें भाषणें करण्यानें मिळत नसून केवळ चिकाटी दाखवल्यानें आणि एका वेळेस एकेक मुद्दा जिंकून मिळवलेलें असतें. बेंजामिन फ्रँकलिनची पद्धत हीच होती आणि त्यानें प्रगति केलीही. ती करतांना त्याला आपल्या फुरसतीच्या वेळेचा होम करावा लागला. त्याच्या कर्तव्य-परायणतेमुळें त्याला कित्येक वर्षें घरापासून व कुटुंबापासून दूर राहावें लागलें.

यानंतर जेव्हां असेंब्लीनें त्याला युरोपला पाठवलें तेव्हां तो चार वर्षें तिकडे राहिला. हा वेळ पावेतों, इंग्लंडकडून सतत लादल्या जाणाऱ्या करांमुळें अमेरिकन वसाहतवाले खरोखरच त्रस्त झालेले होते. फ्रँकलिननें पूर्वीं ज्याप्रमाणें वेताच्या छडींतून तेल ओतून खवळलेल्या तळ्यांतले तरंग शांत केले होते, त्याप्रमाणें आतांही त्यानें स्निग्ध उपायांनीं क्षोभ शांत करण्याचा प्रयत्न केला. इंग्लंडमधल्या ज्या ज्या बड्या लोकांची भेट घेतां येईल त्यांच्याकडे तो रोज चकरा मारीत होता आणि अमेरिकेच्या बाबतींत कांहींतरी चांगलें निष्पन्न व्हावें म्हणून खटपट करीत होता.

आपलें घर, कुटुंब आणि मित्रपरिवार सोडून इतकीं वर्षें दुसऱ्या देशांत राहणें आणि वसाहतींच्या हक्कांसाठीं झगडत राहूनही शांतता टिकवणें ही सोपी गोष्ट नव्हती. त्याचा पक्ष लोकप्रिय होता असेंही नाहीं. इंग्लंड व अमेरिका या दोन्ही देशांत त्याला अनेक शत्रु होते. इंग्लंडमध्यें जेव्हां स्टँप ॲक्ट मंजूर झाला तेव्हां वर्षानुवर्षें मोठ्या काळजीपूर्वक आंखलेल्या योजना उध्वस्त झाल्यासारखें त्याला वाटलें; आणि तिकडे अमेरिकेंत त्याच्या हितशत्रूंनीं त्याच्या घराला आग लावण्याची धमकी दिली. आपण अपेशी ठरलों असें त्याला वाटूं लागलें. अमेरिकेंत त्याच्या मुलाला जाणारें टपाल कोणींतरी मधल्यामध्यें अडवूं लागले; त्याला घराकडून येणारीं पत्रें कोणींतरी मध्येंच लांबवलीं. त्याला घराची मधूनमधून तीव्र ओढ लागून तो विमनस्क बने. आणि आपण हें सर्व सोडून घरीं जाणार असें बोलून दाखवी. पण तरी लढा देण्याचें त्यानें सोडलें नाहीं. अमेरिकेंत आपल्या लोकांनीं धीर धरावा म्हणून त्यानें सतत उपदेश केला; आणि वसाहतवाल्यांचा संताप जास्त भडकवला

तर त्याचे कसे दुष्परिणाम होतील याचा विचार करण्याचा सल्ला इंग्लंडमधल्या आपल्या संबंधित लोकांना त्यानें दिला.

बॉस्टनचें 'चहाप्रकरण' जेव्हां उद्‌भवलें तेव्हां आगींत तेल पडलें. बेन लंडनमध्यें होता; आपण या वेळीं अमेरिकेंत असावें असें त्याला फार वाटत होतें. "मला वाटतें," त्यानें लिहिलें, "आपण वसाहतवाले बनलों तेव्हांपासून इंग्लंडमधल्या आपल्या मित्रांची संख्या आज घटली आहे तेवढी पूर्वी कधीं घटलेली नव्हती."

पण खऱ्या मुत्सद्द्याला शोभेल असें वर्तन ठेवून फ्रॅंकलिननें इंग्लंडमध्येंच राहून लढा देणें चालू ठेवलें. त्याचें आतां उतारवय होत होतें आणि अस्थिवात, सर्दीखोकला आणि अशाच दुसऱ्या दुखण्यांचा त्याला नेहमीं त्रास होई. त्याला एकलकोंडें वाटत होतें, घराची ओढ लागली होती; तरी पण इंग्लंडमधले अमेरिकेचे मूठभर मित्र तरी सरकारच्या डोळ्यांत अंजन घालतील अशी निरर्थक आशा तो बाळगून होता.

आणि मग त्याची पत्नी डीबोरा फिलॅडेल्फियांत मरण पावली आणि पुढचेंच गलबत पकडून दुःखी अंतःकरणानें तो घरीं परत निघाला. युद्ध सुरू होणार हें तो ओळखून होता आणि तें दीर्घकाळ रेंगाळणारें युद्ध ठरणार अशी त्याला भीति वाटत होती. या युद्धाविरुद्ध दहा वर्षांपेक्षांही अधिक काळ त्यानें लढा दिलेला होता; कारण इंग्लंड आणि वसाहती या दोहोंच्याही दृष्टीनें शांतता त्याला सर्वांत हितावह वाटत होती. पण या आपल्या अंगीकृत कार्यांत त्याला अपयश आलें होतें. आतां भावी काळांत जें दुःख वाढून ठेवलें होतें त्याची कल्पना येऊन बेननें अश्रु ढाळले खरे; पण एक गोष्ट तो जाणून होता. ती ही कीं आपलें अंतःकरण सर्वदा अमेरिकेच्याच बाजूला राहील.

९



# देशभक्त

ज्याचे प्रतिध्वनि पुढें जगभर उमटले तो लेक्सिंग्टनचा गोळीबार झाला त्या वेळीं बेन फ्रँकलिनच्या वयाचीं सत्तर वर्षें उलटून गेलीं होतीं. सत्तर वर्षांचीं म्हातारीं माणसें राज्यक्रान्त्यांना फारशीं अनुकूल नसतात. पण फ्रँकलिन हा असाधारण मनुष्य होता. त्याला अजून वार्धक्याची भावना झालेली नव्हती. हें युद्ध टळावें म्हणून कित्येक वर्षें त्यानें धडपड चालवली होती; पण कांहीं केलें तरी तें टाळतां येणें अशक्य आहे असें एकदा स्पष्टपणें कळून चुकल्यावर त्यानें अमेरिकेच्या बाजूनें आपली भूमिका घेतली.

'कॉंटिनेन्टल कॉंग्रेस'चा तो सर्वांत वयस्क सभासद होता. पण तो फिलॅडेल्फियाला परत येतांच त्याची 'डेप्युटी' किंवा प्रतिनिधि म्हणून कॉंग्रेसमध्यें निवड करण्यांत आली.

अमेरिकन राज्यक्रांतींत फ्रँकलिननें बंदूक हातांत धरण्याखेरीज बाकी सर्व प्रकारचीं कामें केलीं असें म्हटलें तरी चालेल. जरूर पडली असती तर त्यानें तेंही केलें असतें. त्याची ताबडतोब 'सुरक्षा-समिति' वर नेमणूक झाली. युद्ध

चालू होतें तोंवर ही समिति अविरत काम करीत होती. रेड इंडियन प्रश्नांवरील समितींतही बेन होताच. संरक्षक दलाची संघटना त्यानेंच केली. 'गृह-संरक्षण' —होम डिफेन्स—खातें त्याच्याकडेच देण्यांत आलें. परराष्ट्रीय प्रकरणांवरील समितीचाही तो सदस्य होता आणि 'परदेशांतील स्नेह्यांशीं पत्रव्यवहार' करण्यासाठीं जी एक खास समिति नेमलेली होती तिच्यावरही त्यानें काम केलें. अमेरिकेच्या परराष्ट्रखात्याची किंवा 'स्टेट डिपार्टमेंट' ची ही सुरवात होती.

वसाहतवाल्यांच्या कल्याणासाठीं त्यानें निधि जमवला. स्वतः पैसे कर्जाऊ दिले, देणगी म्हणून दिले. अमेरिकन सैन्यासाठीं त्यानें औषधें, अन्न व तोफा मिळवून दिल्या. त्यानें कितीतरी पत्रें, अहवाल, ठराव लिहून काढले; आणि नव्या राष्ट्राला जीं जीं महत्त्वाचीं कागदपत्रें करणें आवश्यक, तीं करण्याच्या कामीं मदत केली. वयाच्या सत्तराव्या वर्षी सुद्धा खडतर प्रवास करणें त्यानें चालू ठेवलें होतें.

फ्रँकलिनच्या परराष्ट्रीय प्रकरणांवरील समितीनें जें पहिलें इतिवृत्त तयार केलें —आणि जें फ्रँकलिननें स्वतःच्या हस्ताक्षरांत लिहिलें, तें असें होतें कीं कॅनडांतील लोकांना अमेरिकनांबद्दल सहानुभूति वाटत नाहीं. त्यांची या बाबतींत समजूत घालणें आवश्यक होतें. १४ फेब्रुवारी १७७६ रोजीं हें वृत्त आलें आणि मार्चमध्यें फ्रँकलिनची स्वारी कांहीं तरुण सहकाऱ्यांना बरोबर घेऊन कॅनडाला जायला निघाली.

साराटोगामध्यें सहा इंच जाडीचा बर्फाचा थर असतांना त्यांना तिथें एक आठवडा मुक्काम करावा लागला. गलबताला जाण्याला मार्ग सांपडावा म्हणून जॉर्ज सरोवरांतलें बर्फ वितळण्याची ते वाट पाहात होते. अशा कडक गारठ्यांत आणि कष्टदायक राहणीमुळें बेनला वार्धक्य जाणवूं लागलें होतें; आणि या प्रवासांतून आपण जिवंतपणें बाहेर पडूं असें त्याला वाटत नव्हतें. एक दिवस त्यानें बैठक मारली आणि आपल्या अनेक मित्रांना निरोपाचीं पत्रें लिहिलीं.

अखेरीस सरोवरातल्या बर्फाला भेगा पडूं लागल्या आणि मग पुरेसें पाणी दिसतांच कशाबशा बनवलेल्या ओबड धोबड सपाट तळाच्या नौकांत बसून ही मंडळी पलीकडे निघाली. या नौकांमध्यें ऊब येण्यासाठीं कांहीं सोय नव्हतीच, पण त्यांच्यावर छपरेंसुद्धा नव्हतीं. हवा ओली आणि झोंबरी होती आणि या लोकांना पुनःपुन्हा कांठावर उतरून शेकोटी पेटवण्यासाठीं लाकडें तोडून आणावीं लागत होतीं. असें केलें नसतें तर ते गारठून गोठून गेले असते. या मंडळी-

पैकीं बहुतेकजण रात्रीं रानांतच झोपत असत. वेन मात्र, कापड ताणून बनवलेल्या तात्पुरत्या छपराखालीं नौकेवरच झोपत असे.

जॉर्ज सरोवराचें पैलतीर गांठल्यावर ही मंडळी खालीं उतरली आणि चँपलेन सरोवरापर्यंत पायीं गेली. तिथून त्यांनीं पुन्हा होड्यांतून प्रवास सुरू केला. पहाटे उजाडण्याच्या आंतच उठून ते प्रवासाला निघत; गारठा असह्य झाला कीं होड्या कांठाशीं नेऊन, उतरून शेकोटी पेटवीत आणि मग पुन्हा पुढें जात. अखेरीस ते सेंट जॉन्स येथें येऊन दाखल झाले. तिथें घोड्याच्या गाड्या ठरवून त्यांनीं सेंट लॉरेन्स नदीपर्यंतचा प्रवास केला. मग पुन्हा आणखी एक नौका ठरवली. अशा रीतीनें मजल दरमजल करीत, फिलॅडेल्फिया सोडल्यापासून सुमारें एक महिन्यानें ते मॉंट्रिआलला पोचले आणि जनरल अरनॉल्ड यांना भेटले.

या कामगिरीसाठीं फ्रँकलिननें आपले प्राण वेचले होते असें म्हटलें तरी चालेल. पण जनरल अरनॉल्ड यांच्याशीं ज्या क्षणीं त्याची मुलाखत सुरू झाली त्याच क्षणीं तो ओळखून चुकला, कीं आपल्याला यश मिळणें शक्य नाहीं. अमेरिकन वसाहतींजवळ पैसाही नव्हता आणि पतही नव्हती. या प्रवासाचा जवळ जवळ सबंध खर्च फ्रँकलिननें आपल्या खिशांतून केला होता. क्वीवेकमध्यें ब्रिटिश कुमक येऊन उतरत होती. फ्रँकलिनला स्वतःला गळवें झालीं होतीं. त्यानें परत जायचें ठरवलें. तो आणि त्याच्या बरोबरची मंडळी तो उद्वेगजनक परतीचा प्रवास कसाबसा पार पाडून फिलॅडेल्फियाला जाऊन पोचली आणि मग वृद्ध फ्रँकलिन कितीतरी आठवडे बिछान्याला खिळून राहिला.

गळवें बरीं झाल्यावर पुन्हा त्याला उत्साह वाटू लागला आणि कॉंटिनेंटल कॉंग्रेसच्या कामांत त्यानें पुनश्च उडी घेतली.

वेनला आतां लोक आदरानें व पूज्य बुद्धीनें डॉ. फ्रँकलिन म्हणत असत. सर्व जगांत त्याच्याइतकी प्रसिद्ध अमेरिकन व्यक्ति दुसरी नव्हती. अमेरिकेंतल्या इतकाच युरोपमध्यें, राजकीय क्षेत्राइतकाच विज्ञानाच्या क्षेत्रांत आणि मुत्सद्दी मंडळांइतकाच साहित्यिक वर्तुळांत तो प्रसिद्ध होता. सर्वंकष कीर्ति त्याला लाभली होती. स्टेट हाऊसमध्यें कॉंटिनेंटल कॉंग्रेसच्या बैठका चालू असत, तेव्हां डॉ. फ्रँकलिनचे गणवेषधारी भोई त्याचा मेणा घेऊन दरवाजाशीं आले कीं लोक वेनचें नुसतें दर्शन घेण्यासाठीं गर्दी करीत.

पाश्चात्य पद्धतीचा मेणा किंवा 'सेडन चेअर' ही फिलॅडेल्फियांतली त्या वसाहत काळांतली टॅक्सी होती! वर छप्पर किंवा आच्छादन असलेली ही खुर्ची

दोन आडव्या तुळयांवर बसवलेली असे आणि मजबूत अंगापिंडाचे नोकर ती खांद्यांवर वाहून नेत. वस्तुतः बेनला पायीं चालण्याइतकी दुसरी कोणतीही गोष्ट प्रिय नव्हती. पण अस्थिवातामुळें त्याला मेणा वापरणें आतां भाग पडत होतें.

चार्ल्स्टन येथें राहणारा फिलिप मॅकेंझी नांवाचा तरुण १७७६ च्या उन्हाळ्यांत फिलॅडेल्फियाला गेला होता. त्यानें आपल्या एका मित्राला लिहिलेल्या पत्रांत बेंजामिन फ्रँकलिनचें पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे—

"ते पांच फूट नऊ इंच उंच आहेत. उंचीच्या मानानें त्यांचें वजन जास्तच आहे. त्यांचे डोळे घारे असून तीक्ष्ण व तलवारीसारखे धारदार आहेत. त्यांचें डोकें चांगलेंच मोठें आहे. कपाळ उंच असून डाव्या गालावर तीळ आहे. टोप वापरीत नाहींत, लांब केस ठेवतात, ते त्यांच्या खांद्यांपर्यंत पोचतात. सांगण्याचा चमत्कार हा कीं सत्तर वर्षांचें वय झालें असूनही हे केस अजून पांढरे झालेले नाहींत; पांढुरकी छटा आलेली आहे एवढेंच. माझी ही कदाचित् चुकीची समजूत असेल, पण मला वाटतें कीं त्यांना मनांतल्या मनांत कसलीतरी गंमत वाटत असते आणि ती ते दुसऱ्याला न सांगतां तशीच चोरून ठेवीत असतात. नेहमीं त्यांच्या डोळ्यांत असा भाव दिसतो. जगांतल्या बहुतेक मोठमोठ्या व्यक्तींशीं त्यांनीं संभाषण केलेलें आहे आणि तरी मी जें आचरटपणें कांहींतरी बोलत होतों तें त्यांनीं लक्षपूर्वक ऐकून घेतलें; जणूं कांहीं माझ्या बोलण्यांत त्यांना स्वारस्यच वाटत होतें! ते निघून गेल्यावर एट रटलेजजवळ मी हे बोलून दाखवलें तेव्हां तो म्हणाला, "त्यांत तुला काय वाटलं एवढं? डॉ. फ्रँकलिनना खरोखरच तुझ्या बोलण्यांत स्वारस्य वाटत होतं. तूं त्यांना ओळखत नाहींस! प्रत्येक गोष्टींत अन् प्रत्येक व्यक्तींत त्यांना स्वारस्य वाटतं...तूं कोण आहेस, आयुष्यभर तूं काय केलं आहेस, साऱ्या साऱ्या गोष्टींबद्दल त्यांना आस्था आहे."

अमेरिकन राज्यक्रान्तीचा पक्ष बेंजामिन फ्रँकलिननें उचलून धरला या एका गोष्टीमुळें जगाचें त्या क्रान्तीकडे अधिक लक्ष वेधलें. हें तर खरेंच कीं वसाहतींत राहणारे कित्येक लोक असे होते कीं त्यांनीं या क्रान्तींत भाग घेतला नाहीं; ते इंग्लंडशीं राजनिष्ठ राहिले. फ्रँकलिनचे इंग्लंडमध्यें किती तरी दृढ ऋणानुबंध होते आणि युद्धाला त्यानें तत्त्वतः विरोध केलेला होता. पण स्वातंत्र्याचा प्रश्न उद्भवतांच त्याला विचार करण्याची देखील जरूर भासली नाहीं. तो नेहमींच स्वातंत्र्याच्या बाजूचा होता.

युद्ध सुरू झालें त्याच्या जरा आधींच्या काळांत फिलॅडेल्फिया हें एक मोठें

कुतूहलजनक स्थळ होतें. अमेरिकन वसाहतींमधलें तें अजूनही सर्वांत मोटें शहर गणलें जाई—लोकसंख्या ४०,००० होती! बेंजामिन फ्रँकलिननें दृढनिश्चयपूर्वक नगर सुधारणेचे जे प्रयत्न केले त्यामुळें तें एक सर्वोत्कृष्ट शहरही बनलें होतें. शहरांतल्या रस्त्यांवरून दिवे असत, रस्ते दगडी असत आणि बाजूनें पायीं चालणारांसाठीं विटांचे पायरस्ते बांधलेले असत. आग विझवण्यासाठीं एक स्वयंसेवक दलही होतें.

गांवांतल्या बहुतेक दुकानांना व घरांना रंग दिलेला असे. लोक नीटनेटके कपडे घालीत; आणि चांगलें अन्न खात. दोन्ही गोष्टी नागरिकांना प्रिय असत. दिवसांतून चार वेळां खाणें होई. पहिल्यानें सात वाजतां कॉफी आणि रोलपाव; अकरा वाजतां ब्रेकफस्ट किंवा लंच; चार वाजतां मुख्य जेवण किंवा डिनर आणि रात्रीं दहा वाजतां रात्रीचें जेवण—सपर. कॉंटिनेन्टल कॉंग्रेसला वसाहतीच्या कोनाकोपऱ्यांतून जे प्रतिनिधि जमले होते त्यांच्या निमित्तानें भोजनसमारंभ वगैरे घडवून आणायला बरी सबब सांपडली होती!

लोक छानछोकीचे कपडे घालीत—चांदीचीं बटनें, सोन्याच्या लेसीचें नक्षीकाम केलेलीं लालभडक जाकिटें, कोकीच्या टोप्या, खालीं लोंबून छान दिसावेत म्हणून आंत शिसें भरलेले आंगरख्याचे लेस लावलेले कफ, असा त्यांचा पोशाख असे. तपकिरीच्या सोन्याच्या डब्या लोक जवळ बाळगीत, कंबरेला तलवार लटकावलेली असे, गुडघ्यापर्यंत घट्ट मांडचोळणे—ब्रीचेस्—आणि खालीं सबंध पाय झाकणारे रेशमी पायमोजे असत. स्त्रिया आंतून कामट्या घालून तयार केलेले मंडलाकार घागरे घालीत. ते इतके रुंद असत कीं दरवाजांतून जातांना त्यांना तिरकें चालावें लागे. डोक्यावर त्या चित्रविचित्र प्रकाराचीं टोपरीं किंवा बॉनेट घालीत. भोजनसमारंभांत पुष्कळदा चौदा 'कोर्स' असत—म्हणजे चौदा वेळां वेगवेगळे खाद्यपदार्थ वाढायला येत. परिणामीं बऱ्याच लोकांना वाताचा विकार जडायचा!

फ्रँकलिनला एवढी कीर्ति मिळाली असूनही तो असल्या भपक्याच्या विरुद्ध होता. मोठें प्रसन्न आणि आरामशीर असें त्याचें घर होतें. घरीं त्याच्याभोवतीं नेहमीं मित्रांचा आणि फिलॅडेल्फियाला येणाऱ्या अनेकविध प्रकारच्या माणसांचा घोळका जमलेला असे. अनेक वर्षे परदेशांत काढल्यानंतर त्याला घर अतिशय आवडूं लागलें होतें. कॉंटिनेंटल कॉंग्रेसला आलेल्या प्रतिनिधींचा सहवासही त्याला आवडत होता.

स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यावर कोणीं कोणीं सह्या केल्या तें तुम्हांला आठवत असेल तर फिलॅडेल्फियांत त्या वर्षी किती तऱ्हेतऱ्हेचे बुद्धिमंत जमलेले होते याची तुम्हांला कल्पना करतां येईल. फ्रँकलिन म्हणजे कॉंग्रेसमधला एक ज्येष्ठ व अत्यंत धीट मुत्सद्दी होता; पण त्यानें फारसें भाषण केलें नाहीं.

थॉमस जेफर्सन म्हणतो, "डॉ. फ्रँकलिननीं कधीं दहा मिनिटांवर भाषण केलेलं मीं ऐकलं नाहीं; किंवा एखाद्या प्रश्नावरील निर्णायक मुद्द्याला सोडून दुसरं कांहीं ते बोलले आहेत असंही मला आठवत नाहीं."

पण कांहीं ना कांहीं मजेदार गोष्टी सांगून सर्वांचीं मनें प्रसन्न ठेवावींत तर बेननेंच! एखाद्या लुकलुकत्या चांदणीच्या प्रकाशासारखा त्याचा विनोद होता आणि थट्टामस्करी करणें त्याला फार आवडे.

स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्याची भाषा कशी असावी यावर कॉंग्रेसमध्यें खडाजंगी चालू असतां, बेन, या जाहीरनाम्याचा जनक जो जेफर्सन त्याच्याजवळ बसलेला होता. जेफर्सन खिन्न दिसत होता; कारण त्याला वाटत होतें कीं जाहीरनाम्यांत कांहीं ना कांहीं फरक करण्याची प्रत्येकाची जणूं अहमहमिका चाललेली आहे! तो भव्य देखणा पुरुष आपलें मस्तक दोन्ही हातांत धरून विमनस्कपणें आपण लिहिलेला मसुदा टरकावणारीं भाषणें ऐकत होता.

फ्रँकलिन म्हणाला, "या प्रसंगानें मला जॉन थॉमसनची आठवण होते."

"कोण हा जॉन थॉमसन?" जेफर्सननें पृच्छा केली.

बेननें सांगितलें. जॉन थॉमसन हा बेनचा एक मित्र होता. टोप्या तयार करणाऱ्या एका गृहस्थाकडे तो शिकाऊ नोकर म्हणून राहिला होता. शेवटीं त्याची मुदत संपल्यावर त्यानें स्वतःचें दुकान उघडलें. आपण टोप्या तयार करतों हें लोकांना कळावें अशी पाटी त्याला तयार करायची होती. म्हणून त्यानें हॅटचें एक चित्र काढलें आणि आपली जाहिरात लिहिली ती अशी—"जॉन थॉमसन, हॅटवाले, हॅट्स् बनवणार आणि रोख किमतीला विकणार." नंतर हा मजकूर कसा काय वाटतो म्हणून त्यानें आपल्या मित्रांना विचारायला सुरवात केली. पहिल्या मित्रानें सांगितलें, "आपण हॅटवाले आहों हें म्हणण्याची काय जरूर आहे? हॅट्स् बनवणार आणि विकणार असे शब्द पुढें आहेतच कीं!" थॉमसननें 'हॅटवाले' शब्द काढून टाकला. दुसरा मित्र म्हणाला, "लोकांना हॅट्स् विकत घेण्याशीं कर्तव्य. त्या कुणीं बनवल्या याच्याशीं त्यांना कांहींच करायचं नसतं. तेव्हां 'बनवणार' शब्द काढून टाकला तर?" थॉमसननें तसें केलें. तिसरा

मित्र म्हणाला, " 'रोख किमतीला' हे शब्द मूर्खपणाचे वाटतात. कारण तूं कधींच उधार देत नाहींस." थॉमसननें लगेच ते शब्द उडवून टाकले. राहतां राहिले: 'जॉन थॉमसन : हॅट्स् विकणार.' नंतर आणखी एक मित्रवर्य असें म्हणणारे भेटले कीं "हॅट्स् विकणार' असं तरी कशाला पाहिजे? तूं हॅट्स् फुकट वांटणार आहेस असं का कुणी समजतोय् ?" थॉमसन म्हणाला, "अगदीं खरं आहे तुमचं म्हणणं." पुढें पाटीवर शिल्लक राहिलें : 'जॉन थॉमसन : हॅट्स्.' : आतां हॅटचें तर चित्र काढलेलें होतेंच; मग 'हॅट्स्' हा शब्द अर्थशून्यच नव्हता का ! तेव्हां थॉमसननें त्याचीही हकालपट्टी केली. अखेरच्या स्वरूपांत पाटीवर हॅटचें चित्र व खालीं जॉन थॉमसनचें नांव एवढेंच शिल्लक राहिलें.

फ्रँकलिन म्हणाला, "सुंदर भाषा लिहिणारे जेव्हां दुसऱ्यांचं मत विचारायला जातात तेव्हां त्यांच्या भाषेचे असे धिंडवडे उडतात." हें ऐकून सर्वांना हसूं आलें. जेफर्सनही हसला. स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यांत जेफर्सननें भाषेचा जो सुंदर विलास साधलेला होता त्याला आणखी कात्री लावण्यापासून कॉंग्रेसचे सभासद कदाचित् यामुळेंच परावृत्त झाले असतील !

शेवटीं एकदाचा स्वातंत्र्याचा जाहीरनामा कॉंग्रेसला पटेल अशा स्वरूपांत तयार झाला. त्याला जेव्हां मंजुरी मिळाली, तेव्हां त्या काळांतले ते सर्वश्रेष्ठ अमेरिकन लोक गंभीर आणि चिंतामग्न अशा मनःस्थितींत उभे राहिले. त्यांच्या मनांत विचार येत होते कीं भविष्यांत ही धाडसी उडी आपण घेतली आहे खरी; पण तिचे परिणाम पुढें काय काय होणार आहेत, कुणास ठाऊक!

'इंडिपेंडन्स हॉल' मधल्या त्या प्रसंगाचें दृश्य तुम्हीं कल्पनेनें आपल्या डोळ्यांपुढें रंगवूं शकाल का? जुलै महिन्यांतला उकाड्याचा दिवस, जमलेल्या लोकांची तंग मनःस्थिति (दोन किंवा तीन दिवस आणि रात्री या जाहीरनाम्यावर त्यांचें मतदान चालू होतें), भवितव्यांत साठलेला काळोख! लोकांचें सर्वस्व—जमिनी, कामधंदा, बायकांमुलांची सुरक्षितता, खुद्द त्यांचे पंचप्राण—सारेंच डावाला लागलें होतें. त्यांच्या जवळ पैसे अगदींच थोडे होते, शस्त्रबळ जवळजवळ अजिबात नव्हतें; सैन्याची नुकती कुठें जुळवाजुळव होत होती. आणि तरी या किरकोळ गोष्टींनिशीं ते इंग्लंडसारख्या महान् राष्ट्राच्या प्रस्थापित श्रेष्ठतेला टक्कर देणार होते! त्या जाहीरनाम्यावर सही करण्यासाठीं वाट पाहात उभा असलेला प्रत्येक मनुष्य अंतर्यामीं तेव्हां किती कांपत असेल!

या एकंदर भयभीत मनःस्थितीचा वेन फ्रँकलिनही वांटेकरी असणारच.

आपल्या आयुष्याचे उरले सुरले दिवस इंग्लंडच्या राजेसाहेबांच्या आश्रयाखालीं आपण घालवू अशी त्याची अपेक्षा. आपल्या देशाचा प्रतिनिधि म्हणून इंग्लंड मध्यें असतांना त्यानें केलेलीं एक सुरवातीची कामगिरी ही होती, कीं पेन-सिल्व्हॅनिया हा राजेसाहेबांच्या खास मालकीचा प्रांत (रॉयल प्रॉव्हिन्स) म्हणून जाहीर करावा यासाठीं इंग्रज लोकांचीं मनें वळवण्याचा त्यानें प्रयत्न केला. पैसे मिळवण्यासाठीं त्याला बाळपणापासून काबाडकष्ट करावे लागले होते आणि आतां शांततेंत आणि आरामांत राहायला मिळावें अशी इच्छा होण्याइतकें त्याचें उतार-वयही झालेलें होतें. पण तो स्वातंत्र्यप्रेमी होता—देशभक्त होता. आणि या आपल्या वृत्तीला अनुसरून शेवटपर्यंत वागण्याचें धैर्य व उत्साह हे गुण त्याच्या अंगीं होते.

बेननें एकंदर परिस्थिति हेरली आणि अमेरिकेचें नवराष्ट्र प्रसवावस्थेंत थर-थर कांपत असतांना, बेन प्रत्येकाला हसण्याची एखादी संधि देऊन त्याच्या मनःस्थितीवरचा ताण कमी करूं लागला. त्या वेळीं त्यानें एक असें वाक्य उच्चारलें कीं ज्याचें कोटी किंवा शब्दश्लेष म्हणून वर्णन करतां येईल. अठराव्या शतकांतलें तें तंग वातावरण निवळण्याला त्यामुळें मदत झाली आणि प्रत्येकाच्या अंगांत धैर्य संचारलें. कधीं कधीं कोटिबाज मनुष्याच्या हातूनच हें कार्य होऊं शकतें.


फिलॅडेल्फियांतील इंडिपेंडन्स हॉलच्या त्या निःस्तब्ध वातावरणांत, एक एक सभासद त्या क्रांतिकारक मसुद्यावर सही करण्यापूर्वी थोडासा घुटमळत असलेला पाहून फ्रॅंकलिननें स्मित केलें आणि तो म्हणाला, "आपण सर्वांनीं या पाशांत आतां आपल्याला एकत्र बांधून घेतलं पाहिजे. नाहींतर मग प्रत्येकाला लटकण्या-साठीं वेगवेगळा पाश ठेवलेला आहेच!" *

आणि मग त्यानें जाहीरनाम्यावर सही केली.

* "We must all hang together, or, assuredly, we shall all hang separately!"

अनुक्रम १८५
विभाग
क्रमांक २००
नों. ३३१४५
वाचनालय

# १०



# राजनैतिक वकील

फ्रान्समधल्या पॅरिससारख्या विलासी नगरींत साध्यासुध्या व म्हाताऱ्या बेंजामिन फ्रँकलिननें जाऊन राहणें म्हणजे एखाद्या परीकथेसारखें अद्भुत वाटतें. त्यावेळीं सत्तर वर्षांच्या वयोवृद्ध बेनचें पॅरिसमध्यें जें रोमांचकारी व तुफानी स्वागत झालें, तसें दीडशें वर्षांनंतर चार्ल्स् लिंडबर्ग या एकाच अमेरिकनाचें झालें असेल. फ्रँकलिन १७७६ च्या डिसेंबरांत अमेरिकन वसाहतींतर्फे कमिशनर म्हणून पॅरिसमध्यें पोचला तेव्हांचा हा प्रसंग आहे. आश्चर्याची गोष्ट ही कीं अमेरिकेंतल्या पेक्षांही जास्त लोकप्रियता बेनला फ्रान्समध्यें लाभली.

इंग्लंडविरुद्ध सुरू असलेल्या युद्धांत साहाय्य मिळवण्यासाठीं युरोपला कोणाला तरी पाठवणें आवश्यक होतें आणि त्याकरतां फिलॅडेल्फिया येथील कॉंटिनेंटल कॉंग्रेसचे सभासद, गेले कित्येक दिवस, योग्य माणसाची निवड करण्यांत गुंतले होते. प्रत्येक माणसाचें नांव त्यांनीं विचारांत घेतलें आणि सर्वांत शेवटीं बेंजामिनचें नांव त्यांना सुचलें. पहिली निवड थॉमस जेफर्सनची

झाली. पण त्याची बायको अत्यवस्थ असल्यानें त्यानें जाण्याला नकार दिला. नंतर जॉन ॲडाम्सचें नांव पुढें आलें. तो जायला अतिशय उत्सुक होता; पण तो फार तरुण असल्याचें सभासदांचें मत पडलें. शेवटीं जेव्हां बेनचें नांव निघालें, तेव्हां फ्रँकलिनची लोकप्रियता व कीर्ति यांमुळें त्याच्याबद्दल मत्सर बाळगणारे जे कित्येक सभासद कॉंग्रेसमध्यें होते त्यांनीं, ही सूचना ऐकतांच नाकें उडवलीं.

"हं:!" त्यांच्यापैकीं कांहीजण म्हणाले, "कॉलेजची पदवीसुद्धा नाहीं त्याच्याजवळ!" आणि तें अर्थात् खरें होतें. अत्युच्च गौरवदर्शक अशा कांहीं सन्माननीय पदव्या देण्याचा अधिकार कॉलेजला असतो; तशा कांहीं पदव्यांचा स्वीकार बेननें केला त्या प्रसंगाखेरीज एरवीं तो कॉलेजच्या आसपास कधीं फिरकलेलाही नव्हता. त्यानें स्वतःच स्वतःला शिक्षण दिलें होतें.

"मला आठवतं, त्याच्या खिशांत कधीं कधीं एक पेनीही नसायची!" दुसरे कांहीं शहाणे म्हणाले. हेंदेखील खरें होतें. बेननें स्वतःच्या मेहनतीनें सर्व पैसा कमावलेला होता.

"पण त्यांना फ्रेंच बोलतां येतं कीं!" जॉन विदरस्पून म्हणाला. कॉंग्रेसचा हा सर्वांत तरुण सभासद असून फ्रँकलिनवर त्याचें प्रेम होतें. "कॉलेज पदवी-धराला जर तिथली भाषा येत नसेल तर त्याचा उपयोग काय?" हें पण खरेंच होतें. बेन आपण होऊन फ्रेंच शिकला होता. ती भाषा तो अस्खलित लिहूं शके आणि अशुद्ध बोलूं शके!

शेवटीं फ्रान्सला जाणाऱ्या मंडळावरील तिघां सदस्यांपैकीं एक म्हणून कॉंग्रेसनें जेव्हां बहुमतानें बेनची निवड केली, तेव्हां तो म्हणाला, "ठीक आहे बाबांनो! तुम्हांला हें जुनं खोड तिकडे धाडायचंच असेल तर तें जायला तयार आहे!"

या वेळीं बेनचें जीवन फारसें सुखाचें राहिलेलें नव्हतें. त्याची बायको डीबोरा तीन वर्षांपूर्वी वारली होती आणि तो वियोग त्याला अजूनही जाणवत होता. युद्धामुळें ज्या अनेक इंग्रज मित्रांशीं त्याची ताटातूट झाली, त्यांचीही उणीव त्याला जाणवत होती. इंग्लंडमध्यें तो दीर्घकाळ राहिला होता आणि तिथें त्यानें दृढ स्नेहबंध निर्माण केले होते. अमेरिकेंतलेही त्याचें बरेच चिरपरिचित व प्रिय असे मित्र मरण पावले होतें.

त्याला दुःखांत लोटणारी आणखीही कांहीं कारणें होतीं. त्याचें घर व मालमत्ता वेळोवेळीं शत्रूच्या हातांत पडलीं होतीं. त्याच्या एकुलत्या एका मुलानें अमेरिकन पक्ष सोडला असून तो 'टोरी' बनला होता. त्यामुळें तर बेनला

अतिशयच दुःख झालें होतें. अमेरिकेंतील नव्या पिढीला बेनची कीर्ति व लोकप्रियता सहन होत नसावी असें दिसत होतें. त्यानें कष्टाचें आयुष्य काढलें होतें आणि त्याची शरीरप्रकृति चांगली नव्हती. अस्थिवाताबरोबरच त्याला मुतखड्याचा विकार जडला होता. सत्तर वर्षांचें वय झाल्यानें निवृत्तीचे विचार मनांत घोळायला हवेत; पण या सर्व अडचणींना न जुमानतां बेन कार्य करीत होता.

फ्रान्सला जाण्याची तयारी सुरू झाली, तेव्हां बेनच्या हें लक्षांत आलें कीं तिकडे आपल्याला बरेच दिवस राहावें लागण्याचा संभव आहे. पुन्हा घर बघायला मिळेल कीं नाहीं याचीसुद्धा खात्री नव्हती. त्यामुळें एकटें जाऊं नये असें त्याला वाटलें. त्यानें आपल्या दोघां नातवांना बरोबर घेण्याचें ठरवलें. दोघेही वयानें लहान होते. त्याच्या एकुलत्या एक मुलाचा मुलगा वुइल्यम् टेंपल फ्रँकलिन हा सोळा वर्षांचा होता; आणि सेरा नांवाच्या मुलीचा मुलगा बेंजामिन फ्रँकलिन बॅश हा अगदींच लहान होता.

वसाहतीचें इंग्लंडबरोबर आतां खरेंखुरें शस्त्रयुद्ध सुरू झालेलें होतें. आणि अॅटलांटिक ओलांडणें ही त्या काळांत आधींच अवघड असलेली गोष्ट आतां आणखीच भीतिदायक बनली होती. वारा आणि प्रतिकूल हवामान यांच्या भरीला आतां शस्त्रसज्ज ब्रिटिश आरमार—ज्याच्या कार्यक्षमतेंत कधीं खंड पडलेला नाहीं, तें आरमारही प्रवाशांना विचारांत घेणें जरुरीचें झालें होतें.

बेन आणि त्याचे दोघे नातू ' रीप्रिझाल ' जहाजावर बसून २६ ऑक्टोबर १७७६ रोजीं निघाले. फ्रँकलिन येत आहे हें फ्रेंचांना माहीत होतें; आणि इंग्रजांनाही माहीत होतें. ब्रिटिश हेरांनीं तेवढी दक्षता ठेवलेली होतीच. ब्रिटिश आरमारानें जर ' रीप्रिझाल ' जहाज पकडलें असतें, तर त्यांत बेन फ्रँकलिन असल्यामुळें त्यांना तो एक नजराणा वाटला असता ! बेन गिरफदार झाला असता तर देशद्रोही म्हणून त्याला फासावर लटकवण्यांत आलें असतें.

अॅटलांटिकवर आजच्याप्रमाणें त्याही काळीं हिंवाळ्यांत जोराचे वारे वाहात, वादळें होत. सर्व गोष्टी विचारांत घेतां ही सफर भयंकर संकटांनीं भरलेली होती. पहिल्यानें एक खराब वादळ झालें. जहाजाच्या बाजूच्या गोल खिडक्या बंद करण्यांत आल्या आणि बेनला केबिनमध्यें बसून राहावें लागलें. त्याला व्यायाम घेतां येईना. तेव्हां हा वेळ त्यानें नातवांना फ्रेंच शिकवण्यांत घालवला. डेकवर कधीं यायला मिळालेंच तर तेवढ्यांत तो गल्फस्ट्रीमचें निरीक्षण करी.

पण अशी संधि फार वेळां मिळत नव्हती. 'रीप्रिझाल' चा कप्तान विल्कीज़ ब्रिटिश युद्ध नौकांना टाळण्यांत दंग होता. मधून मधून त्याला थोड्याशा चकमकीही द्याव्या लागल्या. त्यामुळें आपल्या जहाजावरच्या या प्रख्यात पुरुषानें पुन्हा पुन्हा आपलें डोकें डेकवर काढावें हें त्यालाही पसंत पडण्यासारखें नव्हतें.

तेहतीस दिवस लोटल्यानंतर फ्रान्सचा किनारा दूर अंतरावर दिसूं लागला. ब्रिटनीच्या जवळपास दोन ब्रिटिश व्यापारी गलबतांबरोबर 'रीप्रिझाल'ची थोडी चकमक झाली आणि या मंडळींनीं तीं दोन्ही गलबतें कैद केलीं. क्विवेरॉनच्या उपसागरांत त्यांनीं प्रवेश केला तो ही लूट बरोबर घेऊनच. पण प्रत्यक्ष किनाऱ्यावर उतरतेवेळीं बेन आपल्या केबिनमधल्या 'स्थानबद्धते'मुळें इतका अशक्त झालेला होता कीं त्याला चालवतही नव्हतें.

"मला पॅरिसला गेलं पाहिजे" बेन म्हणाला. "माझ्यापुढें कितीतरी कामं आहेत. वुइल्यम्, जा आणि एक गाडी ठरव."

"पण, डॉ. फ्रँकलिन—" कॅप्टन विल्कीज म्हणाला. "फार लांबचा प्रवास आहे तो!"

"जंगलांत दरोडेखोर असतात म्हणे! मीं असं ऐकलं आहे" वुइल्यम म्हणाला.

"माझ्याजवळ सोनंचांदी आहे कुठें?" बेननें उत्तर केलें. "पाळी आली तर आपणच चोरांना लुटूं झालं!"

"पण—" कॅप्टन विल्कीज म्हणतो, "वाटसरू दरिद्री आहे असं दिसलं तर त्याचा खून करायला हे दरोडेखोर मागेंपुढें पाहात नाहींत."

"हंः!" बेन म्हणाला. "मला अजूनही वाटतं कीं माझा मृत्यु चोराच्या हातून होणार नसून अंगांत भरलेल्या या वाताकडूनच होणार आहे. जा—जा अगोदर आणि गाडी ठरवून या."

घोडागाडी आली आणि तिच्याकडे पाहून बेन नवल करायला लागला कीं हिच्यांतून आपण पॅरिस गांठीपर्यंत ती धड राहिली म्हणजे झालं!

"मला बरी आहे म्हणा!" तो म्हणाला, "माझ्याच सारखी जीर्ण नि खिळखिळी झाली आहे. कदाचित् वयानेंही माझ्या एवढीच असेल."

या मोडकळीस आलेल्या जुन्यापान्या गाडींत सर्व कांहीं कोंबण्यांत आलें—बेन, त्याचे दोघे नातू, ट्रंका, ब्यागा, गांठोडीं, पेट्या आणि असल्या यात्रेंत जें जें कांहीं बरोबर घेतात तें सर्व! छोट्या बेंजामिन बॅशला हा सोहळा फार गमतीदार वाटला. ती भिकार गाडी वुइल्यमला फारशी लोभनीय वाटली नाहीं. आणि

त्या भयंकर रस्त्यावरच्या खांचखळग्यांतून, घनदाट अरण्यांतून आणि डोंगर-दऱ्यांतून ठेचकाळत जाणाऱ्या बेनचे चांगलेच हाल झाले. रात्रीं तो झोंपतसुद्धा नसे. जंगलांत जर खुनी लोक, डाकू लोक असतील तर आपण जागें राहायला पाहिजे, आपल्यावर जबाबदाऱ्या आहेत; आपल्यावर अवलंबून असणारीं दोन कोंवळीं पोरें बरोबर आहेत; इतकेंच नाहीं तर अमेरिकेंतले सर्व वसाहतवाले आपल्यावर विसंबून आहेत; ही त्याची भावना.

मोठ्या कष्टानें पॅरिसची वाट ही मंडळी आक्रमीत असतां एक चमत्कार घडला. गाडी जाऊं लागली कीं फ्रेंच लोक सडकेच्या दुतर्फा उभे राहूं लागले. आपलीं शेतांतलीं, दुकानांतलीं व घरांतलीं कामें टाकून ते बाहेर येऊं लागले आणि खडखड आवाज करीत जाणाऱ्या या गाडीकडे व आंत बसलेल्या त्या पिंगट कोटवाल्या म्हाताऱ्याकडे पाहून जयजयकार करूं लागले.

बेनला तर विलक्षणच आश्चर्य वाटलें. यापूर्वी दोनदा तो फ्रान्समध्यें आलेला होता. त्या देशावर आणि तिथल्या जनतेवर त्याचें प्रेमही होतें. पण त्याचा स्वभाव इतका विनयशील, कीं आपलें नांवसुद्धा या लोकांनीं ऐकलेलें नसणार असेंच त्याला वाटत होतें.

सुसंस्कृत जगांतल्या जवळजवळ प्रत्येक माणसानें डॉ. फ्रँकलिनबद्दल ऐकलेलें होतें; आणि अमेरिकन वसाहतींनीं पुकारलेल्या बंडामुळें फ्रेंच जनता रोमांचित झाली होती. आपण स्वतःही क्रांति घडवून आणली पाहिजे असे विचार त्यांच्या मनांत घोळत होते. रेड इंडियन लोकांनीं व्यापलेल्या एका विराट जंगली भूखंडांतून आलेला हा माणूस! मूटभर लोकांचा प्रतिनिधि! पण ते मूटभर लोक कसे? तर ज्यांनीं श्रीमान् व बलाढ्य अशा इंग्लंडला विरोध करण्याचें धैर्य प्रगट केलें—अधिकृत सत्तेविरुद्ध शस्त्र उगारून स्वतःकरतां नव्या जगाची स्थापना करण्यासाठीं कंबर कसली! फ्रेंच लोकांचीं अंतःकरणें यामुळें कौतुकानें भरून गेलीं होतीं.

फ्रँकलिनचा गाडा खडखडत चालला असतां त्याच्या आगमनाची वार्ता त्याच्यापुढेंच पसरत चालली. नॉन्त गांवीं तर नगरपित्यांनीं एक समारंभ घडवून आणला.

"डॉ. फ्रँकलिन!" ते हर्षभरानें उद्गारले, "आज रात्रीं तुमच्या स्वागतार्थ मोठी मेजवानी देणार आहों आम्ही. आणि मग नृत्याचाही कार्यक्रम आहे."

"फार मेहेरबानी आहे तुमची!" फ्रँकलिननें विनयानें उत्तर दिलें. त्यानें

काठीवर भार दिला होता; कारण आत्यंतिक थकव्यामुळें उभें राहण्याची त्याच्या अंगांत ताकद उरली नव्हती. "पण कृपा करून ही अनाठायीं तसदी घेऊं नका. मला शक्य तेवढ्या त्वरेनें पॅरिसला गेलं पाहिजे."

"आजच्या रात्रीपुरतेच थांबा ना!" लोकांनीं एकमुखानें आग्रह केला आणि फ्रँकलिन एकदाचा तयार झाला.

बेनची प्रकृति इतकी नादुरुस्त होती कीं त्याला खाववत नव्हतें आणि शरीर इतकें दुबळें झालें होतें कीं त्याला नाचणें शक्य नव्हतें. पण त्याचा आवाज ज्यांनीं ऐकला त्यांना धन्य झाल्यासारखें वाटलें. त्यांच्यावर मोहिनी पडली. झाडावर बसलेल्या पक्ष्यालाही मोहित करून तो जवळ बोलावीत असे ना?

नॉन्त शहर सोडून गाडी पुढें निघाली आणि बेनची स्वागतपरंपरा जास्त जास्तच जोर धरूं लागली. टेकडीवरून खालीं घसरणाऱ्या बर्फाच्या गोळ्याप्रमाणें किंवा गडगडत जाणाऱ्या लाकडाप्रमाणें या स्वागताला आणखी आणखी गति येऊं लागली. वाटेंतल्या प्रत्येक मोठ्या गांवीं निशाणें फडकूं लागलीं. लोक रस्त्याच्या कडेला उभे राहून बेनच्या अंगावर फुलांचा वर्षाव करूं लागले. त्याची गाडी चालली कीं लोक "डॉ. फ्रँकलिन! डॉ. फ्रँकलिन!" म्हणून ओरडत, लहानग्या बाळांना उंच उचलून धरीत, धावत त्याच्या गाडीजवळ जात आणि त्याच्या त्या जीर्ण पिंगट कोटाच्या बाहीला स्पर्श करीत.

हें जें कौतुक होत होतें त्यामुळें बेन आणखी आणखीच चकित झाला. इंग्लंडमध्यें या गृहस्थावर राजद्रोहाच्या आरोपाखालीं खटला व्हायचा, पण तो थोडक्यांत बचावला. अमेरिकेंत याचें घर शत्रूंनीं जाळण्याचा खटाटोप चालवला होता, पण फ्रान्समध्यें मात्र तो वीर ठरला होता! आतां पुढें आणखी काय होणार होतें कोणास ठाऊक!

बेन रूपानें देखणा नव्हता. त्याचा पोशाखही एका गरीब, अर्धकच्च्या नवख्या देशांतल्या माणसाला शोभेसा साधासुधा होता—पिंगट रंगाचा कोट, क्वेकरपंथीय घालीत तसला. त्याच्या डोक्यावर थोडें टक्कल असल्यामुळें अटलांटिकची सफर करतांना वाऱ्यापासून आपल्या डोक्याचें रंक्षण करण्यासाठीं एक जुनी फरची हॅट त्यानें वापरायला काढली होती. त्याला ती जरा मोठी व्हायची आणि कपाळावर—जवळजवळ चष्म्यापर्यंत खालीं घसरायची.

त्याचा चष्मा ही आणखी एक अजब गोष्ट होती. तो सर्वकाळ चष्मा लावून असे. कारण चष्म्यावांचून त्याला कांहीं दिसत नसे आणि कांहींसुद्धा

पाहिल्याशिवाय त्याला चैन पडत नसे. चारचौघांत चष्मा लावून हिंडणें ही अठराव्या शतकांत एक अजब गोष्ट गणली जाई. चष्मा लावून घराबाहेर पडलेलें दुसऱ्यांनीं पाहण्यापेक्षां आंधळ्यासारखें चाचपडत जाणें लोकांना बरें वाटे!

फरहॅटच्या खालून बेनचे तुरळक, पांढुरके, पावडरसुद्धा न लावलेले ताठ केस बाहेर डोकावतांना दिसत. त्या काळीं खानदानी लोक बाळगीत तशी तलवार त्याच्याजवळ नसे; साधी वेताची काठी असे. निःशस्त्रपणें हिंडण्याच्या त्याच्या या चालीवर फ्रेंच वृत्तपत्रांनीं बराच जोर देऊन लिहिलें. केसांना पावडर आणि अंगाला अत्तर फासणाऱ्या, साटिणीचे मांडचोळणे, कशिद्याचे आंगरखे नि कलाबूतूच्या फुगीर बाह्या मिरवणाऱ्या सोकाजींचा तो काळ होता. त्यामुळें बेन ही व्यक्ति कुतूहलाचा विषय बनली तर त्यांत नवल नाहीं.

प्रवास संपला आणि जुन्या पॅरिसच्या अरुंद, नागमोडी रस्त्यावरून गाडी जाऊं लागली तेव्हां स्वागताचा उत्साह अगदीं शिगेला पोचला. प्रत्येक दुकानाच्या खिडकींत डॉ. फ्रँकलिनचीं चित्रें दिसूं लागलीं, आणि लवकरच शहरांतल्या प्रत्येक घरीं कट्टयावर बेनची तसबीर विराजूं लागली. त्या तसबिरींतल्या बेनची साधी-सुधी विनोदप्रिय चर्या प्रत्येकाकडे आपुलकीनें पाहूं लागली. गरीब-श्रीमंत, प्रसिद्ध-अप्रसिद्ध, वृद्ध-तरुण या सर्वांनीं–पॅरिसच्या एकूणएक जनतेनें बेनला आपल्या अंतःकरणांत स्थान दिलें.

तो एका हॉटेलमध्यें मुक्कामाला गेला. पण जेव्हां जेव्हां तो रस्त्यावर येई तेव्हां रस्त्यांतली वाहतुक बंद पडे! लोक त्याच्याभोवतीं गर्दी करीत, त्याच्या कोटाची बाही ओढीत, त्याला नांवानें हाका मारीत, कांहीं ना कांहीं प्रश्न विचारीत. त्याच्या हॉटेलबाहेर ते उभे राहात आणि तो बाहेर केव्हां येतो म्हणून मार्गप्रतीक्षा करीत. आणि लवकरच त्याला स्पष्ट कळून चुकलें, कीं हा प्रकार जर असाच चालू राहिला तर आपल्या हातून कांहींच काम होणार नाहीं.

ल रे द शोमाँ नांवाचा त्याचा एक श्रीमंत फ्रेंच मित्र होता. त्यानें पॅसी येथल्या आपल्या मळ्यावर राहण्यासाठीं फ्रँकलिनला व त्याच्या नातवांना पाचारण केलें. पॅसी हें पॅरिसच्या सीमेबाहेरचें एक लहानसें खेडें होतें. तिथें द शोमाँच्या मळ्यावरील एका उद्यानांतल्या छोटया घरांत या अमेरिकन पाहुण्यांना जागा मिळणार होती.

लगेच आपलें सामानसुमान घेऊन बेन पॅसीला गेला आणि तिथं राहिला. पॅरिसच्या फॅशनेबल रस्त्यांवरून तो एकाएकीं अंतर्धान पावल्यामुळें त्याच्या

भोवतीं आपोआप एक रहस्यजाल विणलें गेलें आणि त्याच्याबद्दलचें लोकांचें कुतूहल आणखीच वाढलें. लवकरच पॅसीला लोक मुद्दाम दूरदूरच्या भागांतून येऊं लागले आणि बंगल्याच्या भिंतीवरून आंत चिठ्ठया व पत्रें टाकूं लागले

यांतील कांहीं पत्रें 'बागेंतले मॉसिअ फ्रँकलिन यांना' उद्देशून लिहिलेलीं असत. तीं लिहिणारांत सैनिक असत, साहसी लोक असत, व्यापारी असत, स्वातंत्र्यासाठीं लढण्याची तळमळ लागलेले उष्ण रक्ताचे तरुण असत; शाळकरी मुलगे असत आणि निव्वळ त्याची ओळख करून घेण्यासाठीं उत्सुक बनलेल्या स्त्रिया असत. नुसतीं पत्रें लिहून लोकांचें समाधान होईना. पुढें पुढें ते भिंतीवरून चढून बागेंत उतरूं लागले आणि त्यांनीं घरावरही हल्ला चढवला. फ्रँकलिनला प्रत्येकाबद्दल नेहमींच आस्था वाटायची. त्यामुळें ज्याला ज्याला भेटण्याची इच्छा असे त्याला तो भेट देई. यामुळें त्याच्या कामाचा खोळंबा होऊं लागला.

बेनच्या अंगांत असें काय होतें कीं ज्यामुळें तो एवढा लोकप्रिय झाला, तें सांगणें कठीण आहे. खरें म्हणजे तो कौटुंबिक वृत्तीचा माणूस. शास्त्रज्ञ म्हणून त्याची कीर्ति जरी झालेली असली तरी शास्त्रांचा अभ्यास करून त्यांत विद्वत्ता मिळवण्याची संधि प्राप्त झालेले दुसरे कितीतरी लोक होते आणि अर्थात् बेन-पेक्षां त्यांचें शास्त्रीय ज्ञानही अधिक होतें. त्या काळीं वाचनापेक्षां लेखन तो अधिक करी. त्यामुळें प्रचलित पुस्तकांवरही तो सहजगत्या बोलूं शकत नसे. पण तो प्रामाणिक होता; आणि तो जें कांहीं बोले त्यांत भरमसाट विधानें कधीं करीत नसे. तो म्हणे-"मला वाटतं, हें असं असावं—" किंवा "हें अशा प्रकारें करायला हवं अशी माझी कल्पना आहे-" आणि पुस्तकांपेक्षां त्याचा जनतेशींच अधिक परिचय होता. त्याचा मंद, मृदु स्वर ऐकण्याचें प्रत्येकाच्या अंगवळणीं पडत चाललें होतें.

बेनशीं ज्या फ्रेंच लोकांचा परिचय झाला, त्यांच्यापैकीं अनेकांना असें वाटूं लागलें कीं फ्रान्सनें उघड उघड अमेरिकन वसाहतींची बाजू घ्यावी आणि इंग्लंडशीं युद्ध करावें. पण सर्वंकष युद्ध फ्रेंच सरकारला परवडण्यासारखें नव्हतें.

पॅरिसमध्यें आपले सहकारी सिलॅस डीन व आर्थर ली यांच्या मदतीनें बेन वसाहतींसाठीं काम करीत होता. फ्रेंच राजधानींत पोंचल्यावर लवकरच फ्रान्सचा परराष्ट्रमंत्री चार्लस् ग्रॅव्हिये, व्हर्जिनेचा काऊंट यानें या तिघांना मुलाखत दिली. व्हर्जेनीनें त्यांना सांगितलें कीं फ्रान्सनें तटस्थच राहिलें पाहिजे. पण त्यानें बेनला एकीकडे घेऊन एवढें सांगितलें कीं "तुझ्या कार्याबद्दल मला सहानुभूति आहे

आणि शक्य होईल तेवढी मदत मी करीन."

"सरदारसाहेब!" वेन एक दिवस म्हणाला, "सरकारी शस्त्रागारांतून कितीतरी तोफा हलवण्यांत आल्या असून त्या जहाजांवर चढवण्याचं काम चालू आहे."

"म्हणतां तरी काय?" व्हर्जिने उद्गारला. "आणि हीं जहाजं कुठें निघालीं आहेत?"

"तें कुणालाच माहीत नाहींसं दिसतं" वेन म्हणाला.

"ठीक" व्हर्जिनें म्हणाला. "मीं याबद्दल कांहींच ऐकलेलं नाहीं."

वेन म्हणाला, "मीही कांहीं बोललों नाहीं."

व्हर्जिने म्हणाला, "हीं जहाजं जर माझ्या घरावरून गेलीं तर माझी नजर त्या वेळीं दुसरीकडे कुठेंतरी असेल!"

अशा प्रकारें वॉशिंग्टनच्या सैन्यास लागणाऱ्या तोफा, दारूगोळा आणि रसद वेन फ्रँकलिननें मिळवली. ही मदत जर मिळाली नसती तर सैन्यानें टिकाव धरला असता कीं नाहीं याची शंकाच आहे.

व्हर्जिनेशीं जडलेल्या मैत्रीमुळें फ्रँकलिनला पुष्कळदा व्हरसायला जावें लागे. व्हरसायच्या सुंदर राजवाड्यांत राजा सोळावा लुई आणि राणी मारी आंतुआनेत राहात. आणि फ्रँकलिनला एक दिवस त्यांच्या भेटीसाठीं नेण्यांत आलें.

राजेसाहेबांशीं झालेल्या या पहिल्या मुलाखतींत वेनबरोबर त्याचे वीस देशबांधव होते आणि त्यांच्यांतल्या दोघांतिघांनीं गणवेष घातलेला होता. फ्रँकलिननें तांबूस पिंगट रंगाचा मलमली पोशाख केलेला होता. पायांत पांढरे लांब रेशमी पायमोजे होते आणि काखेंत पादरी हॅट धरलेली होती. त्याचे लांबसडक पांढुरके केस खांद्यांवर मोकळे लोंबत होते आणि त्यानें डोळ्यांना चष्मा लावलेला होता.

वेन राजेसाहेबांना काय म्हणाला याची कुठें नोंद नाहीं; पण राजेसाहेबांनीं दिलेल्या उत्तरांत मात्र बेंजामिन व त्याचा देश यांच्याबद्दल गौरवोद्गार काढले होते. वेनच्या धोरणाची राजेसाहेबांनीं स्तुति केली.

त्या वेळेपासून वेन दर मंगळवारीं दरबारांत जायचा आणि इतर देशांच्या राजप्रतिनिधींबरोबर बसायचा. पण त्याचा हुद्दा संशयास्पद होता. फ्रेंच लोक त्याला वकील—ॲंबॅसॅडर—म्हणत; अमेरिकन लोक 'कमिशनर' म्हणत.

राजा लुई याच्याबरोबर त्याच्या अनेक मुलाखती झाल्या आणि दोघांची दोस्ती जमली. फ्रँकलिन नेहमीं राजाचा उल्लेख प्रेमानें 'तो तरुण इसम' म्हणून करीत

असे. राजा त्या वेळीं पंचविशीच्या आसपास असेल. वयाच्या मानानें शरीराची फाजील वाढ झालेल्या या तुंदिलतनु मुलाला यंत्रांशीं—मग तीं कुलपें असोत, घड्याळें असोत—लुडबुड करायला फार आवडत असे. त्यामुळें हा अमेरिकन शास्त्रज्ञ म्हणजे त्याला अगदीं आपल्या 'जातीचा' माणूस वाटे.

फ्रेंच दरबार व सरकार यांच्याशीं असें निकट स्नेहाचें नातें जडल्यामुळें बेननें अमेरिकन वसाहतींसाठीं साडेचार कोटि फ्रेंच लिव्ह्र एवढ्या रकमेचें कर्ज मिळवलें. यांत भर म्हणून राजेसाहेबांनीं स्वतः एकदम एक कोटि लिव्ह्र एवढी रक्कम देणगी म्हणून दिली!

फ्रान्सच्या राजेसाहेबांच्या वतीनें बोलतांना व्हर्जिने म्हणाला, "डॉ. फ्रँकलिन यांच्याविषयीं आमचं मत तुम्हांला विचारण्यांत आलं तर तुम्ही असं निःसंदिग्धपणें म्हणूं शकतां कीं त्यांच्या शहाणपणाच्या धोरणाइतकाच त्यांच्या देशभक्तीबद्दलही आम्हांला आदर आहे. आणि बहुतांशीं याच कारणामुळें आणि डॉ. फ्रँकलिन यांच्या सत्यप्रियतेवर आमचा विश्वास असल्यामुळेंच, कॉंग्रेसनें त्यांना ज्या आर्थिक पेचप्रसंगांत टाकलें आहे त्यांतून त्यांना मुक्त करण्याचा आमचा निर्धार आहे."

या वक्तव्याचा साध्या भाषेंत अर्थ करायचा म्हणजे, बेन जर नसता तर फ्रान्सनें अमेरिकेला कदापि पैसे दिले नसते.

याखेरीज फ्रेंच सरकारशीं ज्यांना कांहींच कर्तव्य नव्हतें अशा अनेक लोकांनाही फ्रँकलिनच्या या कामासाठीं उसने पैसे देण्याची बुद्धि झाली.

त्याच्या जवळच्या मित्रमंडळींपैकीं मादाम हेल्वेशियस या श्रीमंत स्त्रीनें असें बोलून दाखवलें कीं, "त्या सत्प्रवृत्त फ्रँकलिनला मी माझी सगळी संपत्ति देऊन टाकणार आहें!"

बेननें जें कार्य चालवलें होतें त्यांत त्याला जवळजवळ कोणाचीही मदत नव्हती. अमेरिकेंतून जी मंडळी साहाय्य देत होती त्यांची बेनवर नाराजी होती, ती कां हें समजणें सोपें आहे. बेन वीर बनला होता, पण त्या अमेरिकेंतील सहायकांचीं नांवेंही कोणीं ऐकलीं नव्हतीं किंवा त्यांचा उल्लेख कोणी करीत नव्हता. त्यामुळें आपल्याला अगदींच महत्त्व मिळत नाहीं अशी त्यांची भावना झाली होती. मानी लोकांना अर्थात् हें आवडत नाहीं.

बेनचा नातू बुइल्यम् अजून वयानें मुलगेलाच होता. तो त्याचा चिटणीस म्हणून काम पाहात असे. पण बेंजामिन बॅश मात्र फारच लहान असल्यामुळें

शाळेंत जाण्याखेरीज तो दुसरें कांहीं करूं शकत नसे. फ्रँकलिनला येत तेवढीं पत्रें त्यापूर्वीं फारच थोड्या लोकांना आलीं असतील आणि फ्रँकलिनला असें वाटे कीं यांतल्या प्रत्येक पत्राचें उत्तर आपण जणूं कांहीं दिलेंच पाहिजे!

अनेक प्रकारच्या पार्ट्यांना, समारंभांना त्याला निमंत्रणें येऊं लागलीं. त्यांना आपण हजर राहिलें पाहिजे असें त्याला वाटे; कारण कोणत्या वेळीं कोणाची गांठ पडेल आणि त्याला अमेरिकेला मदत देण्याची बुद्धि होईल याचा नेम नव्हता.

फ्रान्सच्या सर्व थोर चित्रकारांना बेनचें चित्र काढावेंसें वाटे आणि त्यांच्यापैकीं कांहींजणांपुढें तो चित्रासाठीं बसलाही. त्यांला पूर्वीं कधीं कल्पनाही झाली नसेल इतक्या विविध रूपांत त्याची प्रतिकृति जिकडे तिकडे दिसूं लागली. स्त्रियांचे ब्रूच आणि कांकणें यांवर, गळ्याभोवतीं घालण्याच्या पदकांवर, पेट्यांच्या झाकणांवर आणि पात्रांच्या बाह्यांगावर, भिंतीवर टांगण्याच्या मुद्रांवर, तसबिरींमधून आणि शिल्पाकृतींतून बेन फ्रँकलिनचा मुखवटा दिसूं लागला.

"सारखं सारखं स्वतःचं तोंड पाहून तुम्हांला कंटाळा नाहीं येत?" त्याच्या मुलीनें—सॅली बॅशनें एकदा विचारलें. "पपा! जिकडे नजर टाकावी तिकडे मला तुम्हीच दिसतां!"

"त्यांत एक बरं आहे" बेन फ्रँकलिन म्हणाला. "मी या गोष्टीमुळें भला बनतों आहे!"

"अहंमन्य बनतां आहां!" मुलीनें त्याला खिजवण्यासाठीं म्हटलें.

"छे ग! मी नीतिमान् बनतों आहें" बेन म्हणाला. "कोणतीही वाईट गोष्ट करणं मला आतां परवडणारच नाहीं."

"तें कसं?"

"कारण—" तिच्या पित्यानें सांगितलें, "माझा चेहरा—जो काय आहे तो—सगळ्यांच्या ओळखीचा झालेला आहे. पोलीस मला तासाभरांत पकडूं शकतील."

फ्रान्समधल्या सर्व मोठमोठ्या लोकांना फ्रँकलिनची ओळख करून घ्यावी असें वाटे. फ्रेंच तत्त्ववेत्ता व्हॉल्टेअर यानें त्याला एकदा आपल्या घरीं बोलावलें. फ्रँकलिन आपला नातू वुइल्यम् याला बरोबर घेऊन गेला. त्यांनीं खोलींत प्रवेश केला तेव्हां रुग्णाईत वृद्ध व्हॉल्टेअर एका प्रचंड खुर्चींत बसलेला होता. हे दोघे येतांच तो पुढें वाकला आणि मग इंग्रजींत म्हणाला, "स्वतंत्रते! स्वर्गीय तेजानें प्रकाशणाऱ्या देवते!"*

---

* "O Liberty, thou Goddess heavenly bright."

बेन विनीतपणें म्हणाला, "हा माझा नातू वुइल्यम्. त्याला आशीर्वाद देतां का आपण?"

"देव आणि स्वतंत्रता" व्हॉल्टेअरनें उत्तर दिलें. "मि. फ्रँकलिनसारख्याच्या नातवाला शोभेसा आशीर्वाद हाच."

याबद्दल व्हॉल्टेअरनें पुढें जेव्हां लिहून ठेवलें तेव्हां त्यांत तो म्हणतो, "जमलेल्या सर्वांनीं त्या वेळीं कोमल भावनेनें अश्रु ढाळले."

अशी एक आख्यायिका आहे कीं एखाद्या शनिवार-रविवारीं, शाळा नसेल अशा दिवशीं आपण छोट्या बेंजामिन बॅशला आणलें तर चालेल का असें बेननें व्हॉल्टेअरला विचारलें.

"मला आणखी एक नातू आहे" बेन म्हणाला. "त्याला द्याल का आपण आपला आशीर्वाद?"

"जरूर-जरूर!" व्हॉल्टेअर म्हणाला.

स्वतःच्याच नांवाच्या आपल्या या नातवाला बेन घेऊन आला, तेव्हां व्हॉल्टेअरनें त्याला वर उचलून त्याचा मुका घेतला.

"स्वातंत्र्य आणि समता!" तो म्हणाला. असें सांगतात कीं पुढें फ्रेंच राज्यक्रांतींत जें "स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव" हें घोषवाक्य वापरण्यांत येत असे, त्याची उत्पत्ति ही अशी आहे. पण खरें खोटें कोणास ठाऊक! ही केवळ एक आख्यायिका आहे.

लोकांनीं वेळोवेळीं जो प्रेमाचा वर्षाव चालवला होता त्याची फेड पार्ट्या-समारंभांच्या रूपानें करूं म्हटलें तर फ्रँकलिनजवळ तेवढे पैसेही नव्हते आणि प्रशस्त जागाही नव्हती. आणि तरी तो फार आतिथ्यशील वृत्तीचा होता. आणि आपल्या शक्तीनुसार तो आपल्या मेजाभोंवतीं मंडळी जमवीत असेच. दुसऱ्या राष्ट्रांचे वकील नेहमीं देत तशा प्रकारच्या या मेजवान्या नसत. हल्लीं अमेरिकेंतील घरांतून जे भोजनसमारंभ होतात, तसे ते असत. लोकांनीं एकत्र जमावें आणि मोकळेपणीं बोलावें हा त्यांतला मुख्य हेतु.

खरें सांगायचें म्हणजे हल्लीं 'बफेट सपर' म्हणून जो भोजनाचा प्रकार रूढ झाला आहे त्याचा शोध फ्रँकलिननेंच लावला असावा असें दिसतें. भोजनाला मंडळी जास्त असली कीं पॅसी येथील त्याचें लहानसें घर अपुरें पडे. आणि फ्रान्समधला वसंतऋतु व उन्हाळा तापदायक नसल्यामुळें बेन आपल्या बागेंतच लाकडी घडवंच्या उभ्या करून त्यांवर फळ्या टाकी; आणि वरती मेज-

पोस पसरून देई. या टेबलांवर मग भोजनाचे पदार्थ मांडतां येत.

आणि मग राजनैतिक वर्तुळांत कधीं न आढळणाऱ्या अनौपचारिक पद्धतीनें पाहुणे मंडळी आपल्याला हवे असलेले पदार्थ उचलून घेत आणि उभ्या उभ्या किंवा फुलझाडांभोंवतीं खुर्च्यांवर बसून ते खात. फ्रेंचांना वाटे, ही एक विचित्र अमेरिकन चाल दिसते आहे! त्या काळच्या बऱ्याच पत्रांमधून याचा उल्लेख आढळतो.

तसा एक औपचारिक असा भोजनसमारंभ फ्रँकलिनकडे झाला; नाहीं असें नाहीं. ४ जुलै १७७८ रोजीं अमेरिकन स्वातंत्र्याचा दुसरा जन्मदिन साजरा करण्यासाठीं फ्रँकलिननें पन्नास निवडक लोकांना एक जेवण दिलें होतें. फ्रँकलिनबरोबर काम करण्यासाठीं पाठवण्यांत आलेला जॉन ॲडाम्स हा या समारंभांत बेनच्या जोडीनें यजमान होता; आणि त्यामुळेंच त्याला एवढी औपचारिकता आली होती. जॉन ॲडाम्स हा शिष्टाचारप्रिय माणूस. बेनचें वागणें त्याला मुळींच आवडत नसे. त्यानें एखादी 'पार्टी' दिली तर तींत शिष्टाचाराच्या दृष्टीनें चूक राहिलेली त्याला खपली नसती.

या जन्मदिन-समारंभासाठीं टेबल फुलांनीं शृंगारलें होतें आणि मध्यभागीं अमेरिकन ध्वज व फ्रान्सची स्वातंत्र्यमुद्रा ठेवलेलीं होतीं. टेबलावर ठेवलेल्या फुलांच्या एका मोठ्या परडींतून प्रत्येक पाहुण्याला एक तुरा देण्यांत येत होता; आणि त्या तुऱ्याला बांधलेल्या कागदावर कांहीं ना कांहीं संदेश लिहिलेला होता. भोजन झाल्यावर मद्याचे प्याले तेरा वेळां भरून अमेरिकेच्या तेरा मूळ वसाहतींच्या नांवें शुभचिंतन करण्यांत आलें.

## ११



# मित्र

बेंजामिन फ्रँकलिननें ज्या सर्व गोष्टी केल्या त्यांत सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यानें मित्र जोडले. मित्र मिळवण्याचा एकमेव मार्ग म्हणजे स्वतः मित्र बनणें हा होय हें सर्वश्रुतच आहे; आणि फ्रँकलिनचे मित्र शेंकड्यांनीं मोजण्याइतके होते. जीवनाच्या सर्व क्षेत्रांतून त्याला मित्र मिळाले होते. फ्रान्सच्या लागोपाठ दोन राजांचा जसा तो मित्र होता, तसाच, ज्यांचीं नांवेंही आतां स्मरणांतून गेलीं आहेत अशा गरीब कामकऱ्यांचाही तो मित्र होता. त्याच्या मित्रवर्गांत खाटीक होते, भटारी होते, मेणबत्त्यांचीं शामदानें बनवणारे होते; खलाशी होते, बँकर होते, गव्हर्नर होते आणि भिकारी होते; सम्राज्ञी होत्या आणि गुलामही होते. फिलॅडेल्फियांत त्याच्या घरासमोरचा रस्ता झाडणाऱ्या म्हातारीशीं तो जितक्या मोकळेपणानें बोले तितक्याच मोकळेपणानें शास्त्रज्ञांशीं आणि राजनैतिक वकिलांशीं बोले.

त्याच्या सबंध दीर्घायुष्यांत जनतेविषयींचें त्याचें प्रेम कधीं आटलें नाहीं. लोकशाहीच्या बाबतींत तो प्रतिसूर्यच होता. त्याच्या स्नेहभावना कुठेंही जाऊन

पोचत. एखादा माणूस जोंवर क्रूर किंवा अन्यायी आहे असें सिद्ध झालेलें नाहीं तोंवर बेन फ्रँकलिनकडून त्याची कधींही अवहेलना व्हायची नाहीं. त्याच्या आयुष्याच्या प्रारंभापासून अंतापर्यंत फ्रँकलिनच्या मित्रांनीं त्याच्या जीवनांत फार मोठी कामगिरी केली.

मैत्री म्हणजे काय तें बेन फ्रँकलिन पूर्णपणें जाणत होता. मैत्रींत देवाणघेवाण आवश्यक असते हें त्याला माहीत होतें. आपल्या मित्रांना जें जें हवें असेल तें बेन त्यांना देई—आपला वेळ, आपला पैसा, साहाय्य, विश्वास, प्रेम, आपल्या जीवनांतला एक हिस्सा, सर्व सर्व देण्याची त्याची तयारी असे. आणि मित्र त्याला जें जें देण्याचें ठरवीत तें स्वीकारण्याची त्याची तयारी असे.

त्याला कधीं खिन्न किंवा त्रस्त वाटलें तर तो एखाद्या मित्राकडे जाई. अमेरिकन राज्यक्रान्तीच्या पूर्वीं, इंग्लंडमध्यें फ्रँकलिननें केलेली शांततेची शिष्टाई जेव्हां विफल ठरली, तेव्हां लंडनमध्यें त्यानें आपला अखेरचा दिवस जोसेफ प्रीस्टलेच्या सहवासांत घालवला. जें युद्ध टळावें म्हणून त्यानें धडपड केली होती तें जवळ येत चालल्यानें त्याला चिंता वाटत होती. वसाहतींच्या भवितव्याबद्दल त्याला दारुण भीति वाटूं लागली होती. त्याला असें वाटत होतें कीं युद्ध कदाचित् कित्येक वर्षें रेंगाळेल आणि त्याचा शेवट पाहण्याला आपण जिवंत राहणार नाहीं. तो आणि प्रीस्टले दिवसभर बोलत होते आणि डोळ्यांत पुनः पुन्हा दाटून येणाऱ्या अश्रूंमुळें फ्रँकलिनला दिसत नव्हतें. अनोळखी लोकांना कधीं कधीं फ्रँकलिन थंड वृत्तीचा आहे असें वाटे; पण त्याच्या मित्रांना त्याचा स्वभाव जास्त चांगला माहीत होता.

एवढीं महत्कार्यें जरी फ्रँकलिननें केलेलीं असलीं ज्याला सौख्य, मनोविनोद, मित्रांचा सहवास हीं सदैव प्रिय वाटलीं असाच तो शेवटपर्यंत राहिला. त्याला वाचन जितकें आवडे, जवळजवळ तितकेंच पटावर ' चेकर्स ' किंवा ' ड्राफ्ट्स् ' खेळणें, बुद्धिबळें, पत्त्यांचा ' क्रिबेज ' डाव खेळणें वगैरे आवडे; आणि संभाषण त्याला फार प्रिय असे. क्लबांत जाणें त्याला फार आवडे. आणि मित्रांचीं टोळकीं जमवून त्यांच्या संघटना तयार करणें आणि अशा रीतीनें परस्परांच्या कल्पनांचा व स्नेहाचा प्रसार करणें हा त्याचा नेहमींचा उद्योग होता. " ज्या ज्या बुद्धिमान् आणि गुणी लोकांनीं मला आपला मित्र मानून माझा बहुमान केला आहे त्यांच्याशीं मोकळ्या मनानें चर्चा करायला मला आवडते " असें तो म्हणे.

बेननें जीं अनेक मंडळें स्थापन केलीं त्यांतलें पहिलें म्हणजे फिलॅडेल्फियांतला

'लेदर-एप्रन क्लब'. या क्लबाचा प्रारंभ त्यानें अगदीं तरुण वयांत केला; पुढें तो 'जंटो' या नांवानें ओळखला जाऊं लागला आणि बेनच्या जीवनावर त्यानें फार दूरगामी परिणाम केले. 'जंटो' चे सदस्य हे त्याचे पहिलेवहिले, खरे-खुरे आणि तावून सुलाखून निघालेले मित्र होत आणि बेनच्या व त्यांच्या आयुष्याच्या अखेरपर्यंत ते खरोखरच परस्परांचे मित्र राहिले. लोकांचें नेतृत्व करण्याचा पहिला धडा तो याच छोट्या मंडळांत शिकला. याच ठिकाणीं त्याच्या असें अनुभवाला आलें कीं एकट्यानें काम करण्यानें जेवढें कार्य साधतें त्यापेक्षां कितीतरी अधिक कार्य, लोकांनीं जर एकमेकांवर विश्वास टाकला आणि एकोप्यानें काम केलें तर साधूं शकतें. या मित्रांचें साहाय्य होतें म्हणूनच फ्रँकलिन एवढ्या महत्पदाला इतक्या त्वरेनें पोचूं शकला. एरवीं इतक्या अल्पावधींत त्याला हें शक्य झालें नसतें. अर्थात् क्लब स्थापन करण्यांत त्याचा हा उद्देश नव्हता ही गोष्ट वेगळी. त्यानें क्लब सुरू केला तो एकाच कारणास्तव—आपल्याला आवडणाऱ्या लोकांच्या सहवासांत राहायला मिळावें म्हणून.

त्याच्या आयुष्यांतले अनेक महान् प्रसंग, तसेंच त्याच्या राष्ट्राच्या जीवनावर परिणाम करणारे कित्येक प्रसंग फ्रँकलिनच्या मैत्रीच्या संबंधांमुळें घडून आले होते. लोकांचीं मनें जिंकून घेण्याचें जें कौशल्य त्याच्या अंगीं होतें त्यामुळें अमेरिकेचें स्वातंत्र्याचें उद्दिष्ट लवकर साध्य होण्याला मदत झाली.

प्रारंभापासूनच बेनच्या मित्रांना असें वाटायचें कीं याच्यासाठीं किती करूं नि किती नाहीं! ज्या अॅप्रेंटिसगिरीचा त्याला अतोनात तिटकारा आला होता तिच्यांतून मुक्त होण्याला त्याला जॉन कॉलिन्सनें मदत केली. ह्यू मेरिडिथबरोबर त्यानें धंद्यांत भागी केली. मेरिडिथला फ्रँकलिनच्या मैत्रींत इतका आनंद वाटे कीं त्यामुळेंच त्यानें वडिलांचें मन वळवून छपाई-दुकान उघडण्यासाठीं लागणारा पैसा त्यांच्याकडून मिळवला. त्याला पहिलीं गिऱ्हाइकें मित्रांनींच मिळवून दिलीं आणि त्याच्या धंद्याची भरभराट होण्याला मदत केली.

बेनला जे अनेक थोर सन्मान प्राप्त झाले त्यांतले बहुतेक, त्याच्यावर प्रेम करणाऱ्या मित्रांनीं तसा योग जुळवून आणल्यामुळेंच होत. तो हयात असतांना त्याला इतके सच्चे मित्र लाभले होते कीं त्याच्या कोणाही समकालिनाला तेवढे लाभले नसतील; आणि त्याच्या मृत्यूनंतरही त्यानें आपल्या पुस्तकांच्या व लेखांच्यामुळें जे मित्र जोडले आहेत तेच त्याची कीर्ति तेवती ठेवीत आहेत.

फ्रँकलिन आपल्या सर्वच मित्रांवर प्रेम करी; पण मुलांमुलींवर त्याची विशेष

मर्जी असे. आपल्या स्वतःच्या मुलांशीं, इतकेंच नाहीं तर जीं जीं मुलें त्याच्या आयुष्यांत आलीं त्या सर्वांशीं त्यानें गट्टी केली होती. बालकांचा तो कैवारी होता आणि त्यांच्याशीं वागतांना, ही एक वेगळी जात आहे असा भाव तो आणीत नसे; तर मोठ्या माणसांप्रमाणेंच त्याना वागवी. जेवढ्या आस्थेनें तो गव्हर्नरांचीं व पंतप्रधानांचीं बोलणीं ऐके तेवढ्याच आस्थेनें मुलांना काय सांगायचें असेल तें तो ऐकून घेई. त्यांचें बोलणें तर तो ऐकेच; पण त्यांच्यापासून कांहीं नवें शिकूनही घेई. यामुळें ऐशीं वर्षांपेक्षां जास्त काळ तो जगला; पण मनानें आणि हृदयानें कधीं म्हातारा झाला नाहीं.

फ्रँकलिनला जेव्हां कर्तव्याखातर इंग्लंड व फ्रान्समध्यें राहावें लागलें, तेव्हां तिथें त्याच्याभोवतीं सदैव मुलांचा गराडा असे; कारण त्यांच्याशिवाय त्याला सुखच वाटत नसे. इंग्लंडमध्यें तो पुष्कळदा जोनाथन शिपले नांवाच्या बिशपच्या घरीं जात असे. या गृहस्थांना एक मुलगा आणि पांच मुली होत्या. तेवीस ते अकरा अशीं मुलींचीं वयें होतीं आणि त्या सर्वांची बेंजामिन फ्रँकलिनवर भक्ति होती. एकदा अकरा वर्षांच्या किटी शिपलेला त्यानें लंडनला भटकायला नेलें. या शिपले मुलींना भेट म्हणून त्यानें फिलॅडेल्फियाहून मुद्दाम एक जिवंत खार मागवून घेतली आणि ती खार पुढें घरांतल्या सर्वांची लाडकी बनली. तिचें नांव स्कग असें ठेवलें होतें आणि एक कुत्र्यानें तिला अखेर ठार मारलें. मुलींच्या विनंतीवरून फ्रँकलिननें या खारीवर पुढील प्रमाणें मृत्युलेख लिहिला—

इथें करितसे स्कग आराम
जसा घोंगडीमाजीं मत्कुण *

फ्रान्सच्या दरबारांतला अमेरिकन वकील म्हणून पॅसी येथें राहात असतांना, फ्रँकलिनच्या मांडीवर पुष्कळदा त्याचा नातू बेंजामिन बॅश बसलेला असायचा. आपल्या एका पत्रांत तो म्हणतो कीं आपल्याला काम खूप असतें आणि त्यामुळें थकल्यासारखेंही होतें; तरी पण आठवड्यांतून एकदा बेंजामिनच्या छोट्या मित्रांना आपण रात्रींच्या जेवणाला बोलावीत असतों. पॅसीमधल्या त्याच्या फरेंच मित्रांच्या एकूण एक मुलांचा फ्रँकलिन प्यार होता आणि बहुतेक सर्व मुलें त्याला 'पपा' म्हणत.

---

* Here Skug
Lies snug
As a bug
In a rug

फ्रान्समधली शाळकरी मुलें त्याला लांब लांब पत्रें लिहीत आणि फ्रँकलिन त्यांचीं उत्तरें देई. फ्रँकलिनचा एक मित्र जॉन जे हा कांहीं महिन्याकरतां त्याच्या घरीं पाहुणा म्हणून आला होता, तेव्हां जे याची दीड वर्षांची मुलगी मारिया हिला फ्रँकलिनचा फारच ळळा लागला. एखाद्या कुत्र्याच्या पिल्लाप्रमाणें ती त्याच्या मागें मागें हिंडायची.

फ्रँकलिनचे हे लहानगे मित्र जेव्हां मोठे झाले, त्यांचीं लग्नें झालीं, संसार झाले; तेव्हां त्यांच्या मुलांबाळांचें कौतुक करण्यांत, त्यांना खिजवण्यांत बेनला गंमत वाटायची. एखादा उन्हाळा, किंबहुना एखादें वर्ष, नव्हे कितीतरी वर्षें 'आमच्या घरीं राहायला या' म्हणून एकदम तीन चार मुलांना निमंत्रण देणें म्हणजे बेनला कांहींच वाटत नसे. त्याचें घर सदैव छोट्या मित्रांच्या आरड्या ओरड्यानें भरलेलें असें.

बेन फ्रँकलिननें जीं अत्यंत सुंदर पत्रें लिहिलीं त्यांतलीं कांहीं मुलांना उद्देशून होतीं. मुलांना कांहीं ना कांहीं छोट्या देणग्या नि गमतीजमती देण्याचे विचार नेहमींच त्याच्या मनांत घोळत असत. आपल्या मृत्युपत्रांत त्यानें बॉस्टनमधल्या मोफत शाळांना देणगी म्हणून कांहीं रक्कम ( शंभर पौंड ) राखून ठेवली होती. या पैशांच्या व्याजांतून मुलांना सन्माननीय पारितोषिकें म्हणून चांदीचीं पदकें विकत घ्यायचीं होतीं. बॉस्टन लॅटिन स्कूलमध्यें आणि बॉस्टन शहरांतल्या हाय-स्कुलांतून अजूनही हीं बक्षिसें दिलीं जातात. आजतागायत अशीं चार हजारांवर बक्षिसें देण्यांत आलेलीं आहेत. म्हणजे मुलांशीं जडलेली त्याची मैत्री त्याच्या पश्चात्‌देखील टिकून राहिली आहे.

फ्रान्समधली बेनच्या मित्रांची संख्या तिथल्या लोकसंख्येएवढी होती असें म्हटलें तरी चालेल ! त्यांत राजाराणीपासून गरीब मजुरापर्यंत सर्व प्रकारचे लोक होते.

" या लोकांच्या गोड सहवासांत जीं नऊ वर्षें मी घालवलीं त्यांचा मला कधींही विसर पडणं शक्य नाहीं. " असें फ्रँकलिन म्हणे.

'युनायटेड स्टेट्स्'च्या कॉंग्रेसनें शेवटीं एकदाचा त्याचा राजीनामा जेव्हां स्वीकारला आणि त्याला घरीं परत यायला परवानगी दिली तेव्हां त्याच्या वयाला एेंशीं वर्षें होऊन गेलीं होतीं. तें १७८५ साल होतें. १७८३ सालीं इंग्लंड व फ्रान्स यांच्यांतला तहनामा त्यानें आपल्या मध्यस्थीनें घडवून आणला होता; आणि त्यावर व्हरसाय येथें सह्या झाल्या होत्या. आपलें काम आतां पूर्ण झालेलें

आहे आणि आतां अमेरिकेंतल्या तरुण पिढीनें पुढें आलें पाहिजे असें त्याला वाटत होतें. फ्रान्समधल्या त्याच्या मित्रांना त्याच्या प्रयाणाची कल्पना दुस्सह झाली. शेवटीं निरोप घेण्याच्या मोहिमेवर तो निघाला.

सोळाव्या लुईनें त्याला निरोप देते वेळीं नजराणा म्हणून त्याला एक पदक दिलें. त्यांत राजेसाहेबांची छोटी प्रतिकृति होती आणि सभोवार चारशें हिऱ्यांचें कोंदण होतें.

"तुम्ही जाणारच म्हणतां, तर समुद्र किनाऱ्यापर्यंत तुम्हांला सुरक्षित पोचवण्याची जबाबदारी आम्ही घेतों" लुई म्हणाला, "खुद्द आमचीं शाही खेचरें तुमची गाडी ओढून नेतील."

हा केवढा मोठा सन्मान होता याची तुम्हीच कल्पना करा!

बेन घरीं जायला निघाला तेव्हां त्याच्या या गाडीमागें आणखी कितीतरी गाड्यांची मालिका लागली होती. पॅरिसच्या प्रचंड उत्तर वेशीपर्यंत त्याला पोचवायला कितीतरी मित्रांची रीघ लागली होती. त्या वेशीवर पोचल्यावर, नऊ वर्षें फ्रान्समध्यें ज्यांचा पाहुणा म्हणून तो राहिला होता त्या मॉसिअ ल शोमाँ आणि त्यांची मुलगी यांचीं मनें परत जायला घेईनात. तेव्हां त्यांनीं थेट समुद्रकिनाऱ्यापर्यंत बेनला सोबत केली.

आणि ही मिरवणूक किती आस्ते आस्ते चालली होती! प्रत्येक खेड्यांत, शहरांत स्वागत समित्या पुढें येत होत्या आणि गाडी रोखत होत्या. अश्रुमोचन, भाषणें, गुलाबाचे मोठमोठे गुच्छ, मुलांनीं हातांत कोंबलेल्या छोट्या छोट्या भेटवस्तु! वार्धक्यानें व आजारपणानें जर्जर झालेला असूनही फ्रँकलिननें धैर्यानें सर्व 'अत्याचार' सहन केले. गाडी फारच हळू चालत असल्यानें त्याचें आंग ठणकत होतें; पण बाह्यतः तो हसत होता, लोकांचीं बोलणीं ऐकत होता. मधून मधून गाडींतून खालीं उतरून हस्तांदोलनासाठीं पुढें झालेले हात हलवीत होता.

मध्यंतरीं एका प्रतिष्ठित फ्रेंच गृहस्थानें आपल्या नोकरांना सांगून गाडी उभी केली आणि बेनला रात्रीच्या मुक्कामासाठीं आपल्या वाड्यांत नेलें; त्यामुळें त्याला अत्यंत आवश्यक असलेली विश्रांति मिळाली. शेवटीं त्यानें इंग्लिश खाडी गांठली आणि इंग्लंडकडे प्रयाण केलें. तिथें कांहीं दिवस राहिल्यावर त्याचा ॲटलांटिकचा जलप्रवास सुरू झाला.

त्याच्या आयुष्याचीं शेवटचीं वर्षें शांततेचीं गेलीं. त्याच्या ज्या मुलानें अमेरिकेचा पक्ष सोडून त्याच्या मनाला तीव्र यातना दिल्या होत्या त्याच्याशींही

त्याचा सलोखा झाला. परदेशांत त्याला जो बहुमान मिळाला होता तो अखेरीस स्वदेशांतही मिळूं लागला. पेनसिल्व्हेनियाच्या लोकसत्ताक राज्याचा अध्यक्ष म्हणून त्याची निवड झाली आणि मग तीन वेळां त्याची फेरनिवडणूक झाली. अमेरिकेच्या संयुक्त राज्यांची घटना तयार करणाऱ्या परिषदेला त्याला प्रतिनिधि म्हणून पाठवण्यांत आलें आणि आजही ज्या राज्यघटनेनुसार अमेरिकन राष्ट्र चालत आहे ती तयार करण्याच्या कामांत त्यानें महत्त्वाचा वांटा उचलला.

या सर्व काळांत तो आपली मुलगी सॅली बॅश आणि तिचा नवरा व कुटुंबांतली मंडळी यांच्याकडे राहात असे. सर्वांत आनंदाची गोष्ट म्हणजे त्याचे नवेजुने सर्व मित्र त्याच्या भोवतीं जमले आणि त्यांच्या संगतींत त्याला राहायला मिळालें. इहलोकीं त्यानें केलेलें एक अखेरचें शतकृत्य म्हणजे 'गुलामगिरीवर घातलेली बंदी' हें होय. या बाबतींत त्यानें काळाच्याही पुढें उडी मारली होती असें म्हटलें पाहिजे; कारण त्याच्या मृत्यूनंतर जवळजवळ एक शतकापर्यंत गुलामगिरी अस्तित्वांत होतीच !

एवढें म्हातारपण झालें असूनही बेननें आपले नित्याचे व्यवसाय चालू ठेवले होतेच. आणि सतत कांहीं ना कांहीं करीत राहण्याच्या त्याच्या निर्धाराचाच परिणाम म्हणून कीं काय, एक दिवस तो जिन्यावरून पाय घसरून पडला. आणि मग त्या दुखण्यांतून बरें व्हायला त्याला फार दिवस लागले. १७ एप्रिल १७९० रोजीं, थोड्याशा आजारानंतर, त्याच्यावर मृत्यूनें आपलें पाश टाकले आणि सबंध सुसंस्कृत जगावर शोककळा पसरली.

जिथें जिथें लोकांच्या सभा जमत, तिथें दुंदुभींवर दुःखनिदर्शक आवरणें घालण्यांत येत, ध्वज अर्ध्यावर उतरले जात आणि शोकवट्याच्या तोफा डागण्यांत येत. बेनचा जुना मित्र मिराबो यानें फ्रेंच असेंब्लींत मांडलेल्या आणि मार्की द लाफायेत यानें दुजोरा दिलेल्या ठरावानुसार फ्रान्समध्यें तीन दिवसांचें सुतक जाहीर करण्यांत आलें. हा बहुमान अगदीं अभुतपूर्व असाच होता.

फ्रँकलिनच्या शवपेटिकेच्या मागें फिलॅडेल्फियांतल्या सर्व थोर प्रतिष्ठित व्यक्ति चालत होत्या; आणि त्यांच्या मागें वीस हजार शोकाकुल लोक होते. एवढा मोटा समुदाय यापूर्वी फिलॅडेल्फियांत कधीं एकत्र जमला नव्हता. तत्कालीन सर्व थोर लेखकांनीं त्याच्या गौरवपर लेख लिहिले आणि तत्कालीन सर्व थोर वक्त्यांनीं सार्वजनिक सभांतून त्याच्या गौरवपर भाषणें केलीं. साधेसुधे गरीब लोक रस्त्यारस्त्याच्या कोपऱ्यांवर उभे राहून किंवा पथिकाश्रमांत बसून त्याच्या स्मृतीला

आपली नम्र तिलांजलि वाहूं लागले. स्त्रिया भर रस्त्यांत उघड उघड रडूं लागल्या; मुलांना एकदम चुकल्यासारखें नि एकाकी वाटूं लागलें. मानवजातीचा एक मित्र जगांतून नाहींसा झाला होता.

पण असा मनुष्य खऱ्या अर्थानें कधींच मरत नाहीं; कारण त्याचीं कृत्यें व वचनें त्याच्या पश्चात् जिवंत असतातच. बेंजामिन फ्रँकलिननें काय म्हटलें, काय केलें, त्याचे विचार काय होते यांविषयीं कोणीं ना कोणीं आठवण काढली नाहीं असा एक क्षणही बहुधा जात नसेल; आणि यावत्काळपर्यंत जगाला आपलें स्मरण असतें तावत्काळ आपण जिवंत असतों हेंच खरें नाहीं का? फ्रँकलिननें कांहीं विशिष्ट गोष्टींचें मनन केलें, अनुभव घेतला, शोध केला आणि अभ्यास केला म्हणूनच आपल्या ज्ञानांत भर पडली. त्यानें ज्या अनेक गोष्टी केल्या त्यामुळेंच आपण आज अधिक चांगलें जीवन जगतों आहों.

# १२



## अमेरिकन

बेननें आपल्या देशासाठीं काय काय केलें, त्या सर्व गोष्टींचा आढावा घ्यायचा म्हटलें तर या पुस्तकापेक्षां मोठा ग्रंथ लिहावा लागेल. एवढेंच सांगितलें तर पुरे आहे, कीं तो जन्मला नसता तर 'युनायटेड स्टेट्स् ऑफ् अमेरिका' हें राष्ट्र जगांत आज ज्या महत्पदावर पोचलें आहे, तें पद त्याला प्राप्त झालें नसतें. त्याचें सबंध जीवन कार्यसिद्धींच्या परंपरेनें भरलेलें होतें आणि त्यापैकीं बहुतेक कार्यें, आपला देश सुधारण्याच्या उद्देशानें केलेलीं होतीं.

या पाहा बेंजामिन फ्रँकलिननें केलेल्या कांहीं गोष्टी—

अमेरिकेंत कागदी चलन सुरू करण्याचा आणि अशा रीतीनें धंद्यांना चालना देण्याचा त्यानें सल्ला दिला.

अमेरिकेंतलें पहिलें फिरतें वाचनालय त्यानें स्थापन केलें.

फिलॅडेल्फियांत आग विझवणाऱ्या स्वयंसेवक दलाची पहिली संघटना त्यानेंच केली.

वाचनालय
३३०५४

पेनसिल्व्हेनियांतल्या पहिल्या रुग्णालयाच्या संस्थापकांपैकीं तो एक होता.

तो पोस्टमास्तर झाला आणि टपाल पद्धतीची त्यानें पुनर्घटना केली. त्यामुळें हें खातें कार्यक्षम व स्वावलंबी बनलें. हल्लींची पोस्टखात्याची पद्धत मूलतः त्याच्याच कल्पनांवर आधारलेली आहे.

'अमेरिकन फिलॉसॉफिकल सोसायटी' ची त्यानें स्थापना केली. ही सोसायटी अजूनही अस्तित्वांत आहे.

दगडी रस्ते बांधावेत ही सूचना प्रथम त्यानेंच मांडली; आणि रस्तेसफाईची पद्धतही त्यानेंच रूढ केली.

रस्त्यांवर दिवे लावण्याचा प्रघातही त्यानेंच सुरू केला.

गृह-संरक्षक दलाची कल्पना त्याचीच. पेनसिल्व्हेनिया सैनिकदल त्यानेंच स्थापन केलें.

मूळच्या तेरा अमेरिकन वसाहतींचें एकीकरण—युनियन—करण्याची कल्पना फ्रँकलिनच्याच डोक्यांतून निघाली. याबद्दल त्यानें एक प्रबंधही लिहिला.

'फ्रँकलिन स्टोव्ह्' त्यानें शोधून काढला आणि त्यामुळें घरांतली हवा उष्ण राखण्याच्या पद्धतींत सुधारणा झाली.

पहिला विद्युत् घट (बॅटरी) त्यानें तयार केला.

विद्युत् किंवा 'इलेक्ट्रिसिटी' संबंधांत त्यानें एक नवा सिद्धान्त मांडला. विद्युत्प्रवाह दोन प्रकारचा असतो: घन (पॉझिटिव्ह्) आणि ऋण (नेगेटिव्ह्) असें यांत दाखवलें होतें हे शब्द आजदेखील प्रचारांत आहेत.

विजेची कांब (लायट्निंग रॉड) त्यानेंच शोधून काढली. वीज कोसळण्यापासून होणारे दुष्परिणाम या कांबीमुळें टाळतां येऊं लागले आणि त्यामुळेंच बहुधा लक्षावधि डॉलर किमतींची मालमत्ता व कितीतरी जीव वांचले. विजेच्या कांबा आजदेखील वापरल्या जातात.

पेनसिल्व्हेनियाच्या विधिमंडळांत त्यानें चौदा वर्षे काम केलें आणि त्या असेंब्लीचा सर्वप्रमुख सभासद तोच होता.

अमेरिकेंत प्रसिद्ध झालेल्या पहिल्या कादंबरीचा प्रकाशक तोच. सॅम्युएल् रिचर्डसनकृत 'पामेला' ही ती कादंबरी.

त्या काळातील सर्वांत महत्त्वाच्या वर्तमानपत्राचा मालक व प्रकाशक तोच होता. हें पत्र म्हणजे 'पेनसिल्व्हेनिया गॅझेट'—आजच्या 'सॅटरडे ईव्हिनिंग पोस्ट'चा पूर्वज.

ग्रंथ संग्रहा

पेनसिल्व्हेनियाचें विद्यापीठ त्यानेंच स्थापन केलें. त्याला प्रथम ‘ॲकॅडेमी’ म्हणत, पुढें ‘युनिव्हर्सिटी’ म्हणूं लागले.

देवीची लस टोचण्याची प्रथा सार्वत्रिक होण्याच्या कितीतरी वर्षें अगोदर बेननें या उपायाची शिफारस केली. नेहमीं होणाऱ्या सर्दीबाबत त्यानें जी मीमांसा केली ती आजदेखील सयुक्तिक समजली जाते.

राज्यक्रान्तीपूर्वीच्या बिकट काळांत तो इंग्लंडमध्यें वसाहतींचा प्रतिनिधी म्हणून राहिला. या काळांत ‘स्टँप ॲक्ट’ रद्द करून घेण्यांत त्याला यश मिळालें. आपल्या राष्ट्राकरतां हें साध्य व्हावें म्हणून त्यानें आपल्या उच्च पदाचा आणि अत्यंत यशस्वी जीवितक्रमाचा त्याग केला.

स्वातंत्र्याचा जाहीरनामा तयार करून त्यांत योग्य त्या सुधारणा करण्याच्या कामीं त्यानें साहाय्य केलें.

अमेरिकन संयुक्त राज्यांची राज्यघटना लिहून काढणें आणि तिला मंजुरी मिळवणें या कामीं त्यानें साहाय्य केलें. यांच्या राज्यघटनेनुसार आज अमेरिकन राष्ट्र चालत आहे.

फ्रान्समध्यें वसाहतींचा कमिशनर म्हणून सेवा करीत असतां त्यानें अमेरिकन सैन्यासाठीं पैसा, शस्त्रें, दारूगोळा आणि रसद मिळवलीं.

ज्या वेळीं वसाहतींना पैशाची तीव्र निकड होती त्या वेळीं त्यानें फ्रेंच सरकारकडून बरेंच मोठें कर्ज मिळवलें.

युद्ध संपतांच ‘युनायटेड स्टेट्स्’ व इंग्लंड यांच्या दरम्यान त्यानें तहनामा घडवून आणला.

गुलामगिरीचें उच्चाटन करण्याचा त्यानें सल्ला दिला आणि या संबंधांत पुस्तिका लिहिल्या.

बेन फ्रँकलिननें आपल्या देशासाठीं केलेल्या गोष्टींपैकीं या केवळ ठळक व प्रसिद्ध गोष्टी होत. आपल्या उद्योगरत अशा दीर्घायुष्यांत त्यानें आणखी किती गोष्टी केल्या याची खरी कल्पना कोणालाच नाहीं. तो केवढाही उद्योगी असला, महत्त्वपूर्ण व्यक्ति असला, तरी आपल्या देशाची हाक कानीं पडल्यावर त्यानें कोणताही उद्योग किंवा स्वतःचें उच्च पद, धन, आरोग्य किंवा आत्मसुख यांवर पाणी सोडण्यांत स्वाभिमानामुळें किंवा गर्वामुळें मागेंपुढें पाहिलें असें कधींही झालें नाहीं.

अमेरिकन वसाहतींचा पक्ष घेतांना त्यानें प्रसंगीं आपले मित्र व कुटुंबीय

यांच्याकडेही पाठ फिरवली. युद्धाच्या ऐन धामधुमींत 'रीप्रिझाल' जहाजावरून फ्रान्सकडे तो जीव धोक्यांत घालून निघाला. कॉंटिनेंटल कॉंग्रेसला त्यानें आपली खाजगी संपत्ति देऊं केली; आणि जेव्हां जेव्हां पैशाची मदत लागली तेव्हां तेव्हां ती केली.

अमेरिकेचा तारकांकित ध्वज जिथें जिथें फडकत असतो, त्या प्रत्येक ठिकाणीं अमेरिकन जनता कृतज्ञतापूर्वक बेंजामिन फ्रँकलिनचें स्मरण करते. कारण त्यानें पाहिलेल्या स्वप्नांमुळें हा ध्वज मूर्तरूपाला आलेला आहे. अमेरिकन भूमीवर त्याचें प्रेम होतें हें तर खरेंच; पण त्या भूमीला ज्या विशिष्ट प्रणालीमुळें थोरवी आली आहे त्या विचारांवर त्याचें अधिक प्रेम होतें. बेन फ्रँकलिननें उच्चारलेलीं कितीतरी वचनें संस्मरणीय बनलीं आहेत; पण पुढील वचनापेक्षां अधिक मोलाचें वचन त्याच्या तोंडून कधीं निघालें नसेल—

"ज्या ज्या ठिकाणीं स्वातंत्र्य आहे, त्या त्या ठिकाणीं माझा देश आहे."

● ● ●

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय शाखा
REFBK-0008922

# विश्व साहित्य

| | | |
|---|---|---|
| १ | धडधडतें काळीज | २। |
| २ | आरोपी | २॥ |
| ३ | एकटा | २॥ |
| ४ | अमेरिकन संस्कृति | २ |
| ५ | रशिया असा आहे | २ |
| ६ | ध्रुवाचा अस्त | ५ |
| ७ | मी विजयी आहें | २ |
| ८ | अखेरचा रामराम | २॥ |
| ९ | स्वातंत्र्य आणि संस्कृति | (लौकरच प्रसिद्ध होईल) |

ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, मुंबई ४